सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित



## वृद्धेला वैद्यकीय मदत

मुंबई : गंभीर अपघातामुळे उपचारासाठी आर्थिक अडचणीत सापडलेल्या १०० वर्षीय सरूबाई मुंजवार यांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून अवघ्या २४ तासांत आर्थिक सहाय्य मंजूर करण्यात आले. या सहाय्यामुळे त्यांच्यावर आवश्यक शस्त्रक्रिया वेळेत पार पडून पुढील उपचार तातडीने सुरू करणे शक्य झाले. सरूबाई मुंजवार या रस्ता ओलांडत असताना भरधाव दुचाकीच्या धडकेत गंभीर जखमी झाल्या. या अपघातात त्यांच्या डाव्या मांडीला गंभीर दुखापत झाली. त्यानंतर त्यांना फलटण येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. वैद्यकीय तपासणीनंतर डॉक्टरांनी तातडीने शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिला. उपचारासाठी सुमारे सव्वा लाख रुपयांचा खर्च अपेक्षित असल्याने त्यांच्या कुटुंबासमोर आर्थिक अडचण निर्माण झाली होती. पण तात्काळ मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीमुळे ती अडचण दूर झाली.

## भिकेतही टक्केवारी !

अहमदाबाद : अहमदाबदच्या रस्त्यावर, ट्रॅफिक सिग्नल, मंदीर, मॉल्स आणि हॉस्पिटलबाहेर जी एखादुसरी लहान मुले भीक मागताना दिसतात त्याच्या मागे त्यांची हतबलता नसून ते एक मोठं ट्रॅफिकिंग नेटवर्क आहे. अहमदाबादच्या क्राईम ब्रांचने महानगरपालिकेच्या मदतीने शहर भिकारी मुक्त करण्याची मोहीम उघडली होती. अहमाबादमध्ये २०३० मध्ये राष्ट्रकुल स्पर्धांचे आयोजन होणार आहे. त्या पार्श्र्वभूमीवर ही मोहीम हाती घेतली होती.मात्र या मोहिमेदरम्यान, एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. राजस्थान आणि मध्य प्रदेशातील ग्रामीण भागातील सरपंच किंवा गावातील प्रमुख व्यक्ती या भीक मागणाऱ्या मुलांचे दलाल झाले आहेत. ते गावातील गरीब कुटुंबातील मुले भीक मागण्याच्या या धंद्यात भरती करून घेतात. त्यानंतर त्यांना गुजरातमध्ये भीक मागण्यासाठी पाठवलं जातं.पोलिसांनी या रॅकेटद्वारे शहरात २७६ मुलांची तस्करी करण्यात आल्याचे शोधले आहे. अधिकाऱ्यांनी सांगितलं की, या मुलांना आता सरकारी शाळेमध्ये प्रवेश देण्यात आला आहे. तसेच त्यांना जेवण आणि राहण्याची सोय करण्यात आली आहे. त्यानंतर आथा ज्यांनी या मुलांचे शोषण केले त्यांची चौकशी सुरू असून त्यांच्याविरूद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे सांगितलं.

## ७ कामगार ठार

बंगळुरू : बंगळुरू दक्षिण जिल्ह्यातील तवरेकेरे जवळील मादपट्टण येथे एका दगड खाणीत (क्वारी) गुरूवारी (दि.२) मोठी दुर्घटना घडली. कावेरी क्रशरच्या मालकीच्या या खाणीत काम करत असताना अचानक एक मोठा खडक कोसळल्याने बिहारमधील सात कामगारांचा जागीच मृत्यू झाला.ढिगाऱ्याखाली आणखी काही कामगार अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे.जेसीबीच्या साहाय्याने मृतदेह बाहेर काढण्याचे काम सुरू आहे.

# 'उबाठा'सोबत आता पुन्हा प्रेम जुळणे कठीण! : देवेंद्र फडणवीस



तभा वृत्तसेवा

मुंबई : माना के तेरे जहाँ में यह नही की प्यार नही मिलता... वो जब चाहिए तब नही मिलता! उद्धव ठाकरेंनी जे प्रेम आता दाखवले, ते मला २०१९ मध्ये हवे होते. तेव्हा आमचा प्रेमभंग झाला. प्रेमभंगानंतर आम्ही दुसरे लग्न केले, नवा संसार थाटला आणि त्या लग्नाचे वाढदिवस झाले! त्यामुळे आता पुन्हा प्रेम जुळणे कठीण आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी स्पष्ट केले. एका खासगी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी स्ध्याच्या राजकीय स्थितीवर विस्तृत भाष्य केले. शिवसेनेच्या बंडखोर खासदारांबाबत मोठा खुलासा करताना फडणवीस म्हणाले, जे ६ खासदार शिंदेंच्या शिवसेनेत गेले, ते मूळचे शिवसेनेचेच असल्याने त्यांनी तिथेच जावे ही आमची भूमिका होती. भाजपचे दार कोणासाठीही उघडे नव्हते. उलट, त्या ६ पैकी एक-दोन खासदारांची भाजपमध्ये येण्याची इच्छा होती; मात्र सध्या भाजपमध्ये अशी कोणतीही व्यवस्था नसल्याचे आम्ही त्यांना स्पष्ट सांगितल्यामुळे ते शिंदेंच्या शिवसेनेत गेले.उपमुख्यमंत्री यांची पुन्हा मुख्यमंत्री होण्याची मनिषा असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात कायम सुरू असते. त्याबाबत विचारले असता मुख्यमंत्री म्हणाले, महायुतीमध्ये कोणाच्या अपेक्षांची उड्डाणे कुठे चालली आहेत यावर चर्चा करण्यापेक्षा राज्यातील सध्याची राजकीय वस्तुस्थिती (पॉलिटिकल रिॲलिटी) समजून घेतली पाहिजे. ज्या राज्यामध्ये बहुमतासाठी १४५ जागांची आवश्यकता असते, तिथे ज्या पक्षाकडे स्वतःचे १३७ आमदार निवडून आलेले आहेत, त्याच पक्षाचा मुख्यमंत्री होणार की दुसऱ्या पक्षाचा? १३७ आमदार असलेल्या पक्षाचे नेतेत्यांच्याच नेत्याला मुख्यमंत्री करत असतात. हीच खरी वास्तविकता आहे आणि ती मला व एकनाथ शिंदे दोघांनाही नीट माहिती आहे.'ऑपरेशन टायगर' मध्ये भाजपचा किती सहभाग होता? यावर बोलताना फडणवीस म्हणाले, अशा ऑपरेशन्समध्ये काय घडले हे सुज्ञ राजकारणी व्यक्ती जाहीरपणे सांगत नाही. आमच्या मित्रपक्षांनी ते ऑपरेशन केले, त्यांना आमचा पूर्ण पाठिंबा आणि आवश्यक ती मदत होती. तर शिंदेंच्या दिल्ली दौऱ्यांवर बोलताना ते म्हणाले, दिल्लीत अशा छोट्या-मोठ्या स्थानिक गोष्टींचे भांडण सुटत नाही. दिल्लीला खूप कामे आहेत, ते अशा गोष्टी एंटरटेन करत नाहीत. जे काही निर्णय व्हायचे ते महाराष्ट्रातच होतात आणि हा मेसेज सर्वांपर्यंत पोहोचला आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर अर्थखाते सध्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आहे. हे खाते राष्ट्रवादीला परत मिळणार का? या बाबत विचारले असता फडणवीस म्हणाले, सध्यातरी हे खाते माझ्याकडे आहे. पुढे ते कोणाला द्यायचे, यावर मी आमच्या पक्षश्रेष्ठींशी चर्चा करेन आणि त्यांच्या मार्गदर्शनानुसार निर्णय घेईन.विरोधी आमदारांना निधी मिळत नसल्याच्या आरोपावर स्पष्टीकरण देताना मुख्यमंत्री म्हणाले, पक्षांतरासाठी केवळ निधी हे एकमेव कारण असू शकत नाही, तर आपले नेतृत्व आपले भविष्य सुरक्षित करू शकते की नाही, यावर आमदार निर्णय घेतात. आम्ही विरोधी पक्षातील ९० टक्के लोकांना बजेटमधील पीडब्ल्यूडी विभागातून काही ना काही निधी दिला आहे. आम्ही २०१९ ते २०२२ विरोधी पक्षात असताना आम्हाला काहीच मिळत नव्हते, तरीही आमचा एकही आमदार फुटला नाही. कारण गोपीनाथ मुंडे यांच्यासारख्या आमच्या नेत्यांनी कार्यकर्त्यांमध्ये आत्मविश्र्वास निर्माण केला होता. जेव्हा नेत्यावरील विश्र्वास संपतो, तेव्हाच पक्ष संपतो; निधी हा दुय्यम विषय आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

# स्वरसम्राज्ञी आशा भोसले संगीत जीवन गौरव पुरस्कार सुरू करणार



तभा वृत्तसेवा

मुंबई : महाराष्ट्रातील गायन-संगीत क्षेत्रात आयुष्यभर उल्लेखनीय योगदान देणाऱ्या ज्येष्ठ आणि ख्यातनाम कलावंतांचा सन्मान करण्यासाठी सांस्कृतिक कार्य विभागामार्फत स्वरसम्राज्ञी आशा भोसले (̄ीहर इंहीश्रश) संगीत जीवन गौरव पुरस्कार' सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार (̄ीहळीह ड्हशश्ररी छ्शुी) यांनी गुरुवारी विधानसभेत एका निवेदनाद्वारे केली. मंत्री शेलार म्हणाले, महाराष्ट्राला संगीत, नाट्य, साहित्य, चित्रपट, लोककला आणि विविध सांस्कृतिक क्षेत्रांची समृद्ध परंपरा लाभली असून भारतीय संगीताच्या विकासात राज्यातील अनेक नामवंत कलाकारांचे मोलाचे योगदान आहे. या कलाकारांमुळे महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचली आहे. आशा भोसले या भारतीय संगीत क्षेत्रातील अजरामर आणि असाधारण व्यक्तिमत्त्व असून त्यांनी आठ दशकांहून अधिक काळ विविध भारतीय भाषांमध्ये गायन करत संगीत क्षेत्रात अतुलनीय योगदान दिले आहे. विशेषतः मराठीतील बालगीते, भावगीते, चित्रपटगीते, गझल, लावणी आणि लोकसंगीताला त्यांनी आपल्या आवाजाने समृद्ध केले आहे. त्यांच्या गायकीमुळे भारतीय संगीताला जागतिक स्तरावर ओळख मिळाली असून त्यांची कार्यनिष्ठा, सातत्य आणि उत्कृष्टता अनेक कलाकारांसाठी प्रेरणादायी असल्याचेही त्यांनी सांगितले.

या पुरस्काराअंतर्गत गायन-संगीत क्षेत्रात प्रदीर्घ काळ उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कलावंतांचा गौरव करण्यात येईल. पुरस्काराचे स्वरूप १० लाख रुपये रोख, शाल आणि सन्मानचिन्ह असे राहणार आहे. पुरस्कारासाठी पात्रता निकष निश्र्चित करण्यासाठी आणि पुरस्कारार्थींची निवड करण्यासाठी गायन-संगीत क्षेत्रातील तज्ज्ञांचा समावेश असलेली समिती गठित करण्यात येणार असल्याची माहितीही मंत्री ड. शेलार यांनी दिली. हा पुरस्कार दरवर्षी स्वरसम्राज्ञी आशा भोसले यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून ८ सप्टेंबर किंवा त्या तारखेच्या जवळ प्रदान करण्यात येईल, असेही मंत्री शेलार यांनी सांगितले.

# अटल बोगद्यात भीषण अपघात




वृत्तसंस्था

शिमला : हिमाचल प्रदेशच्या प्रसिद्ध अटल बोगद्याच्या बाहेर बुधवारी रात्री भीषण अपघात झाला. रात्री नऊच्या दरम्यान एक स्कॉर्पिओ कार बोगद्यातून भरधाव वेगात बाहेर आली.

कारचा वेग जास्त असल्यानं चालकाचं नियंत्रण सुटलं. कारचा वेग इतका जास्त होता की ती रस्त्याशेजारी असलेले बॅरिकेड्स तोडून थेट एका निर्माणाधीन पिलरच्या ढाच्याला जाऊन धडकली. पिलरचं काम सुरू होतं. स्कॉर्पियो कार पिलरच्या लोखंडी सळयांमध्ये जाऊन अडकली. स्कॉर्पियो कारचा अपघात अतिशय भीषण होता. सिमेंटच्या खांबाच्या टोकदार सळया कारमधून आरपार गेल्या.

या अपघातात कारच्या पुढील भागाचं प्रचंड नुकसान झालं. कारमधून प्रवास करणाऱ्या तरुणाचा जागीच मृत्यू झाला. तो राजस्थानचा रहिवासी आहे. या अपघातात त्याचे तीन मित्र गंभीर जखमी झाले आहेत. ते उत्तर प्रदेशचे रहिवासी आहेत.स्कॉर्पिओमधून प्रवास करणारे तरुण पर्यटनासाठी गेले होते.

मनालीला फिरुन ते लाहोलच्या दिशेनं जात होते. अपघातानंतर घटनास्थळी मोठा आवाज झाला. एकच खळबळ उडाली. अपघाताची माहिती मिळताच पोलीस, अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी पोहोचले. त्यांनी मदत आणि बचाव कार्य सुरू केलं.

स्कॉर्पिओ कार पिलर आणि सळयांच्यामध्ये अतिशय विचित्रपणे अडकली होती. त्यामुळे जखमींना बाहेर काढणं अतिशय अवघड होतं. मदत आणि बचाव पथकानं बरेच प्रयत्न केले.

अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांची मदत घेतली आणि जखमींना बाहेर काढलं. सगळ्या जखमींना तातडीनं जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आलं. तिथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. पोलिसांनी मृताचं शव ताब्यात घेऊन उत्तरीय चाचणीसाठी पाठवलं आहे.

# नागरिकांनी गरज असेल तरच घराबाहेर पडावे !



तभा वृत्तसेवा

मुंबई : राज्यात दमदार पावसाला सुरुवात झाली असून गेल्या दोन दिवसांपासून अनेक भागांत पाऊस सुरू आहे. विशेषतः मुंबईत चांगला पाऊस होत असून आज राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाचा जोर आणखी वाढण्याची शक्यता असल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी दिली.राज्यात गेल्या काही दिवसांपासून पावसाचा जोर वाढला असून अनेक ठिकाणी नद्या, नाले भरून वाहत आहेत. त्यामुळे यंदाच्या पावसाळ्यात संभाव्य आपत्ती परिस्थितीचा सामना करण्यासाठी राज्यातील आपत्ती व्यवस्थापन विभाग आणि सर्व जिल्ह्यांतील आपत्कालीन यंत्रणा पूर्णपणे सतर्क ठेवण्यात आल्या आहेत.

आपत्ती नियंत्रण कक्ष २४ तास कार्यान्वित करण्यात आले आहेत, अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन व जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी दिली.मंत्री महाजन यांनी मंत्रालयातील राज्य आपत्तकालीन नियंत्रण कक्षाला भेट देऊन पाहणी केली आणि अधिकारी आणि कर्मचारी यांच्याशी संवाद साधला. यावेळी त्यांनी शासकीय यंत्रणेस सतर्कतेच्या सूचना दिल्या. याप्रसंगी विभागाच्या प्रधान सचिव विनिता सिंगल, संचालक डॉ भालचंद्र चव्हाण उपस्थित होते. गिरीश महाजन म्हणाले की, भारतीय हवामान विभागाने ३ आणि ५ जुलै रोजी राज्यातील काही भागांत मुसळधार पावसाची शक्यता वर्तविली आहे. या पार्श्र्वभूमीवर नागरिकांनी अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडणे टाळावे तसेच प्रशासनाने जारी केलेल्या सर्व सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. ते म्हणाले, राज्य शासन आणि प्रशासन नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. मात्र प्रत्येक नागरिकानेही स्वतःची आणि आपल्या कुटुंबाची सुरक्षितता लक्षात घेऊन आवश्यक ती खबरदारी घेणे तितकेच महत्त्वाचे आहे.मुंबईतील काही भागांत पावसामुळे पाणी साचण्याच्या घटना घडल्या होत्या. मात्र संबंधित यंत्रणांनी तातडीने उपाययोजना केल्यामुळे सध्या परिस्थिती नियंत्रणात असून बहुतांश ठिकाणी जनजीवन सुरळीत झाले आहे, असेही त्यांनी सांगितले.

महाजन यांनी सांगितले की, मुंबई महापालिका तसेच संबंधित सर्व यंत्रणांच्या सातत्याने संपर्कात राहून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे.वाहतूक व्यवस्था सुरळीत राहावी यासाठी महानगरपालिका प्रशासनाला आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत.राज्यातील सर्व नागरिकांनी सतर्क राहावे, सुरक्षित राहावे आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणांना सहकार्य करावे, असे आवाहन गिरीश महाजन यांनी केले आहे.

## खाजगी, सीबीएसई शाळांच्या मनमानीला बसणार चाप

तभा वृत्तसेवा

मुंबई : खाजगी, सीबीएसई आणि आंतरराष्ट्रीय शाळांकडून पालकांची होणारी आर्थिक लूट आणि शैक्षणिक साहित्याची केली जाणारी सक्ती यावर राज्य सरकारने अत्यंत आक्रमक भूमिका घेतली आहे. विधान परिषदेत विरोधी आणि सत्ताधारी आमदारांनी उपस्थित केलेल्या प्रश्र्नांना उत्तर देताना, प्रभारी मंत्री डॉ. पंकज भोयर यांनी दोषी शाळांवर कायदेशीर वचक बसवण्यासाठी आणि पालकांच्या संरक्षणासाठी राज्य सरकारकडून मोठ्या आणि ठोस उपाययोजनांची घोषणा केली.आमदार भाई जगताप आणि भाजपचे आमदार प्रवीण दरेकर यांनी मुंबईसह राज्यातील ८० ते ९० टक्केशाळांमध्ये पालकांना विशिष्ट दुकानातूनच महागडे साहित्य, पुस्तके आणि गणवेश घेण्याची सक्ती केली जात असल्याचा मुद्दा उपस्थित केला. शाळांच्या या मनमानीवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी शाळांच्या वार्षिक ऑडिट आणि शाळा तपासणीच्या नियमांमध्येच 'शैक्षणिक साहित्य खरेदी' या मुद्द्याचा अंतर्भाव करण्याची मागणी त्यांनी केली. तसेच आमदार डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केंद्रीय बोर्डाच्या शाळांवर राज्याचे नियम पाळण्यासाठी केंद्राच्या माध्यमातून वचक बसवण्याची सूचना केली.आमदारांच्या या तीव्र भावनांची आणि पालकांच्या त्रासाची गंभीर दखल घेत प्रभारी मंत्री डॉ. पंकज भोयर यांनी सभागृहाला आश्र्वस्त केले की, राज्य सरकार अशा मुजोर शाळांपुढे अजिबात झुकणार नाही. शाळांच्या या मनमानीला चाप लावण्यासाठी त्यांनी 'नोडल ऑफिसर्स'च्या नियुक्तीची मोठी घोषणा केली. राज्यातील प्रत्येक उपसंचालक कार्यालयात कार्यरत असणाऱ्या 'सहायक संचालकांना' आता नोडल ऑफिसर म्हणून विशेष अधिकार दिले जातील. कोणत्याही शाळेने पालकांवर महागडे साहित्य किंवा गणवेश खरेदीची सक्ती केल्यास पालकांनी थेट या नोडल ऑफिसरकडे तक्रार करावी, असे आवाहन मंत्र्यांनी केले. तक्रार मिळताच हे अधिकारी थेट शाळेत जाऊन चौकशी करतील आणि दोषी व्यवस्थापनावर थेट कडक कायदेशीर व दंडात्मक कारवाई करतील, असा कडक इशारा डॉ. भोयर यांनी दिला.केंद्रीय बोर्डाच्या शाळांवर वचक ठेवण्याच्या संदर्भात बोलताना डॉ. पंकज भोयर यांनी आमदार डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या सूचनांचे स्वागत केले. सीबीएसई आणि आयसीएसई बोर्डाच्या शाळा राज्याचे नियम धाब्यावर बसवत असतील, तर केंद्र सरकार आणि संबंधित केंद्रीय शैक्षणिक संस्थांशी थेट संवाद साधून तातडीने योग्य ती कायदेशीर पावले उचलली जातील, असे त्यांनी स्पष्ट केले.

# नवा मार्ग ठरला..पुणेकरांसाठी थेट विमानतळापर्यंत मेट्रो !



तभा वृत्तसेवा

पुणे : पुणेकरांसाठी एक आनंदाची बातमी आहे. पुण्यात मेट्रो मार्गाचा विस्तार होणार आहे. हवाई वाहतूक करणाऱ्या प्रवाशांसाठी कल्याणीनगर स्थानक ते लोहगाव विमानतळापर्यंत नवा मेट्रो मार्ग बनणार आहे. केंद्रीय हवाई वाहतूक राज्यमंत्री आणि पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांनी पुणे महानगरपालिका आणि महा मेट्रोसह या मार्गावर मेट्रोचा विस्तार करण्याचा निर्णय घेतला आहे.

यामुळे पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील प्रवाशांसाठी लोहगाव विमानतळापर्यंत पोहोचणं सोपं होणार आहे. महा मेट्रोने या मार्गाची व्यवहार्यता तपासून हा निर्णय घेतला आहे. मंगळवारी झालेल्या बैठकीत याला मंजुरी देण्यात आली. सर्व पर्यायांची तपासणी करूनच हा निर्णय घेण्यात आला असल्याचं अधिकाऱ्यांनी सांगितलं आहे. प्रस्तावित मार्गामुळे विमान प्रवाशांसाठी शहरांदरम्यान प्रवास करणं सोपं होणार आहे. सध्या पुण्यातील एकमेव विमानतळावर थेट मेट्रो कनेक्टिव्हिटी नाही आहे. प्रवाशांना येरवाडा मेट्रो स्थानकावरून लोहगाव विमानतळापर्यंत प्रवास करावा लागतो. मेट्रो स्थानकावरून प्रवासाचा दुसरा पर्याय शोधावा लागतो. खाजगी कॅबने प्रवास करणं महाग पडतं आणि वाहतूक कोंडीची समस्याही वाढते. यामुळे गेल्या वर्षी मोहोळ यांनी महा मेट्रोला पुणे विमानतळाला जोडणारी मेट्रो मार्गिका तयार करण्यासाठी पर्याय शोधण्याचे आदेश दिले होते.

सध्या पुणे मेट्रोचा फेज २ अंतर्गत विस्तार सुरू आहे. या विस्ताराच्या योजनेतून विमानतळापर्यंत कनेक्टिव्हिटीचा पर्याय वगळण्यात आला होता. पण आता या नव्या मार्गाला मंजुरी मिळाल्यानंतर नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. पुणे मेट्रो सध्या दोन मार्गांवर धावते. लाइन १ (पीसीएमसी ते स्वारगेट) लाइन २ (वनाझ ते रामवाडी) या मार्गांवर मेट्रोसेवा उपलब्ध आहे. कल्याणीनगर स्थानक लाइन २ वर आहे. सिविल कोर्ट स्थानकावर लाइन १ आणि २ साठी इंटरचेंज उपलब्ध आहे. तसेच, नवीन सुरू होणाऱ्या मेट्रो लाइन ३ (हिंजवडी ते शिवाजीनगर) लाही जोडणार आहे. त्यामुळे या तिन्ही मार्गांवरील प्रवाशांना लोहगाव विमानतळापर्यंत प्रवास करता येणार आहे. शिवाय प्रस्तावित मेट्रो लाइन ४ (खडकवासला ते खराडी)सुद्धा कल्याणीनगर स्थानकाशी जोडलेलं असेल. त्यामुळे शहरातील सर्व चार मेट्रो मार्गांवरील प्रवास विमानतळापर्यंत सहजपणे पोहोचू शकतात.

या बैठकीत मोहोळ यांनी पौड फाटा ते वनदेवी मंदिरापर्यंत डबल डेकरउड्डाणपूलबांधण्याचेही निर्देश दिले. या मार्गामुळे पाच सिग्नल जंक्शनच्या बॉटलनेक परिसरात वाहतूक कोंडी फुटण्याची शक्यता आहे. याशिवाय त्यांनी कचरा डेपोपासून चांदणी चौक मेट्रो स्थानकापर्यंत डबल डेकर उड्डाणपूल बांधण्याचेही निर्देश दिले. मेट्रो लाइन २ चा वानझ ते चांदणी चौकापर्यंत विस्तार होत आहे. या पुलावरील खालच्या भागत वाहनांची वाहतूक आणि वरील भागावरून मेट्रो मार्गिका तयार केली जाणार आहे.

तसेच, शेवळेवाडी-हडपसर-कात्रज मेट्रो मार्गाचाही चांदणी चौक-वाकडपर्यंत विस्तार करण्याचे निर्देश दिले. या मार्गासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यास सांगितले आहे.

# प्रसिद्ध व्यापारी देवेंद्र खंडेलवाल यांचा पाण्यात बुडून मृत्यू; आत्महत्या केल्याचा संशय

तभा वृत्तसेवा

**पैठण दि ०२ :-** पैठण येथील नाथसागर धरणाच्या पाण्यात शहरातील किराणा मालाचे व्यापारी बुडाल्याची घटना गुरुवारी दि.२ रोजी सकाळी ९ वाजता घडली असून सदरील व्यापाऱ्याचा शोधकार्य छत्रपती संभाजीनगर अग्निशमन दल तसेच पैठण न.प अग्निशमनदल करीत असतांना सायंकाळी ६ वाजे दरम्यान त्यांची डेडबॉडी सापडली.

अधिक माहिती अशीही पैठण शहरातील प्रभू किराणा मालाचे व्यापारी देवेंद्र कमलनारायण खंडेलवाल वय ४५ वर्ष रा. रामनगर पैठण हे नाथसागर धरणावर गेले होते. धरणात जोरदार वारे व मोठ्या प्रमाणावर लाटा असल्याने खंडेलवाल पाण्यात बुडत असल्यामुळे मला वाचवा मला वाचवा असे ओरडत



असताना परिसरात असलेल्या काही तरुणांनी घटनेची माहिती धरण कक्षात दिली. यावर तात्काळ जायकवाडी धरणाचे सहाय्यक अभियंता गणेश खराडकर यांनी सुरक्षा रक्षकांसह बचाव साहित्य घेऊन घटनास्थळी धाव घेतली परंतु खंडेलवाल यांचा तपास लागला नाही. यावर सुरक्षा विभागाकडून ही माहिती पैठण पोलीस ठाण्यात दिल्यामुळे तात्काळ पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांनी छत्रपती संभाजीनगर अग्निशमन दल, पैठण नगरपरिषद अग्निशमन दल व पोलीस पथक घटनास्थळ पाठवून शोध कार्य सुरू केले, सायंकाळी ६ वाजे दरम्यान त्यांचा मृतदेह सापडला आहे . या घटनेमुळे व्यापाऱ्यात चांगलीच खळबळ उडाली असून नाथसागर धरणावर व्यापाऱ्यांनी गर्दी केली होती .

मोबाईल मिळाला पाण्यात

व्यापारी देवेंद्र खंडेलवाल हे सकाळी नाथसागर धरणावर गेले त्याठिकाणी त्यांनी एका कॅरीबॅग मध्ये टी शर्ट, नाईट पॅन्ट टॉवेल तसेच चप्पल काढून ठेऊन पाण्यात गेले यावर खोल पाणी असल्याने ते क्षणात पाण्यात बुडायला लागले यावेळी त्यांनी मदतीसाठी वाचावा वाचवा असा आवाज दिला परंतु पाण्याची खोली आणि लाटा जास्त असल्याने ते पाण्यात बुडाले. पाण्यात अग्निशमन दलाचे शोधकार्य सुरु असतांना दुपारी १ वाजता त्याचा मोबाईल पाण्यात सापडला.आणि सायंकाळी ६ वाजेदरम्यान त्यांचे मृतदेह सापडले. पाण्यात मोबाईल सापडल्याने हसतमुख व्यापारी देवेद खंडेलवाल यांनी आत्महत्या केल्याचा संशय निर्माण होत असून पोलीस निरीक्षक महादेव गोमारे यांच्या मार्गदर्शनाखाली घटनेचा सखोल तपास केला जात आहे.

## 2 निओ आणि नोव्हा 2 प्रोच्या पुढील विक्रीची घोषणा

**मुंबई :** एआय प्लस स्मार्टफोनने नोव्हा 2 निओ आणि नोव्हा 2 प्रोच्या पुढील विक्रीची घोषणा केली आहे. 26 जून रोजी फ्लिपकार्टवर झालेल्या पहिल्या विक्रीत दोन्ही स्मार्टफोन पूर्णपणे विकले गेले. आता या दोन्ही मॉडेल्सची पुढील विक्री 30 जून रोजी दुपारी 12 वाजता फ्लिपकार्टवर सुरू होईल. नोव्हा 2 निओमध्ये मीडियाटेक डायमेन्सिटी 6300 5जी प्रोसेसर, 120हर्ट्झ एचडी+ डिस्प्ले, 6000एमएएच बॅटरी आणि अँड्रॉइड 16-आधारित नेक्स्टक्वांटम ओएस आहे. नोव्हा 2 प्रोमध्ये डायमेन्सिटी 7100 प्रोसेसर आणि 144हर्ट्झ एफएचडी+ डिस्प्ले देण्यात आला आहे. दोन्ही फोनमध्ये 48एमपी सोनी कॅमेरा, जलद चार्जिंग आणि प्रीमियम डिझाइनचा समावेश आहे.

## लहू उघडे नेकेड अँड अफ्रेड: आदिमानव मध्ये विजयी

**मुंबई :** अनेक दिवस आव्हानात्मक दुर्गम भू-प्रदेश, मर्यादित साधनसंपत्ती आणि सतत बदलणाऱ्या परिस्थितीशी झुंज दिल्यानंतर लहू उघडे हे वॉर्नर ब्रदर्स डिस्कव्हरीच्या नेकेड अँड अफ्रेड: आदिमानव चे विजेते ठरले आहेत. आपल्या एव्हरेस्ट शिखर सर करण्यासाठी आणि वर्षानुवर्षांच्या निसर्गातील अनुभवासाठी ओळखले जाणारे लहू हे डिस्कव्हरीच्या या नावाजलेल्या आंतरराष्ट्रीय अॅडव्हेंचर सर्व्हायव्हल फ्रँचायझीच्या भारतीय आवृत्तीचे पहिले विजेते बनले आहेत. आशिया पॅसिफिक प्रदेशातील आपल्या पहिल्या पदार्पणासह, हा शो आदिमानव जीवनशैलीशी निगडित प्रवृत्ती, चिकाटी आणि सर्व्हायव्हल कौशल्यांने प्रेरित आहे.नेकेड अँड अफ्रेड: आदिमानव ने विविध पार्श्वभूमीतून आलेल्या सहा सहभागींना एकत्र आणले आणि त्यांना फिलिपाइन्समधील पालावानच्या आव्हानात्मक रानावनात ठेवले. या संपूर्ण प्रवासादरम्यान त्यांनी कठोर परिस्थितीला तोंड दिले, अनोळखी प्रदेशातून वाट काढली आणि जिथे प्रत्येक निर्णय महत्त्वाचा ठरतो अशा वातावरणाशी जुळवून घेतले.

## केकेसीएलने पहिले फॅमिली स्टोअर सुरु करत विस्ताराला दिली गती

**छत्रपती संभाजीनगर :** भारतातील आघाडीच्या स्वदेशी फॅशन कंपन्यांपैकी एक असलेल्या केवळ किरण क्लोदिंग लिमिटेड ने छत्रपती संभाजीनगर (पूर्वीचे औरंगाबाद) येथे आपले पहिले फॅमिली स्टोअर सुरू करून आपल्या किरकोळ व्यवसायाचा विस्तार केला आहे. किलर, क्रॉस आणि ज्युनिअर किलर हे तीनही ब्रँड एकाच छताखाली आणणारे हे नवे स्टोअर, डेनिम-केंद्रित व्यवसायातून संपूर्ण कुटुंबासाठी लाइफस्टाइल फॅशन डेस्टिनेशन बनण्याच्या केकेसीएलच्या धोरणात्मक प्रवासाचे प्रतीक आहे.या नव्या स्टोअरमध्ये पुरुष, महिला आणि मुलांच्या परिधानांच्या विविध श्रेणी उपलब्ध असून, संपूर्ण कुटुंबासाठी एकाच ठिकाणी आधुनिक फॅशनचा अनुभव मिळणार आहे. उच्च क्षमतेच्या बाजारपेठांमध्ये आपली उपस्थिती अधिक मजबूत करण्याच्या केकेसीएलच्या सुरू असलेल्या किरकोळ विस्तार धोरणातील हा आणखी एक महत्त्वाचा टप्पा आहे.या फॅमिली स्टोअरमुळे महिलांच्या फॅशनमधील क्रॉस आणि मुलांच्या परिधान क्षेत्रातील ज्युनिअर किलर या ब्रँडची वाढती भूमिका अधोरेखित होते. हे दोन्ही ब्रँड कॅज्युअलवेअर आणि डेनिम क्षेत्रातील किलरच्या मजबूत वारशाला पूरक ठरतात. या ब्रँड पोर्टफोलिओमुळे केकेसीएलला विविध ग्राहक गटांच्या गरजा पूर्ण करता येतात, ग्राहकांच्या खरेदीचे प्रमाण वाढवता येते आणि ग्राहकांशी अधिक मजबूत नाते निर्माण करता येते. सर्व वयोगट आणि लिंगांसाठी फॅशन उत्पादने उपलब्ध करून देणारे लाइफस्टाइल-केंद्रित फॅशन हाऊस बनण्याच्या कंपनीच्या व्यापक दृष्टीकोनाशी ही संकल्पना सुसंगत आहे.

## नेफ्रोप्लसने डायलिसिस केअर नेटवर्कचा विस्तार

**छत्रपती संभाजीनगर :** नेफ्रोप्लस या आशियातील आघाडीच्या डायलिसिस केअर नेटवर्कने आज महावीर हॉस्पिटल, बिझ झोन, कॉनॉट प्लेस, सिडको कॉनॉट, सिडको, छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र येथे आपल्या नवीन डायलिसिस सेंटरच्या शुभारंभाची घोषणा केली. ही नवीन सुविधा नेफ्रोप्लसचे या भागातील पहिले आणि शहरातील दुसरे सेंटर आहे, ज्यामुळे क्रॉनिक किडनी आजार असलेल्या रुग्णांसाठी जागतिक दर्जाच्या डायलिसिस उपचारांची उपलब्धता अधिक सुसाध्य होईल. नव्याने सुरू करण्यात आलेले हे सेंटर पाच प्रगत डायलिसिस मशिन्सनी सुसज्ज आहे, ज्यामध्ये चार निगेटिव्ह एचडी मशिन्स आणि एक पॉझिटिव्ह एचडी मशीनचा समावेश आहे. या सेंटरमध्ये दररोज प्रति मशीन सरासरी चार डायलिसिस सेशन्स देण्याची क्षमता आहे. तसेच, हे सेंटर एफएमसी ५००८ एस मशीनने सुसज्ज आहे, ज्यामुळे हेमोडियाफिल्ट्रेशन (एचडीएफ) करणे शक्य होते. एचडीएफ प्रगत डायलिसिस पद्धती आहे, जी पात्र रुग्णांच्या शरीरातून घातक विषारी द्रव्ये अधिक प्रभावीपणे बाहेर काढण्यास मदत करते.

## अदाणी ग्रीन एनर्जीने 20 गीगावॅट कार्यरत वीज निर्मिती क्षमतेचा टप्पा पार केला

**छत्रपती संभाजीनगर :** भारतातील सर्वात मोठी नवीकरणीय ऊर्जा कंपनी अदाणी ग्रीन एनर्जी लिमिटेड (एजीईएल) ने 20 गिगावॅट कार्यरत नवीकरणीय ऊर्जा क्षमतेचा टप्पा ओलांडला आहे. प्रामुख्यानेग्रीनफिल्ड प्रकल्पांच्या माध्यमातून हा टप्पा गाठणारी एजीईएल ही भारतातील पहिली नवीकरणीय ऊर्जा कंपनी ठरली आहे. कंपनी दरवर्षी 52 अब्ज युनिट्सपेक्षा अधिक स्वच्छ वीज निर्मिती करते. ही वीज भारताच्या एकूण वीज वापराच्या जवळपास 3 टक्के आहे. या ऊर्जेवर अमेरिकेतील न्यूयॉर्क शहराला वर्षभर वीजपुरवठा करता येईल किंवा मुंबई आणि नवी दिल्ली या दोन्ही शहरांच्या जवळपास संपूर्ण वीज गरजा भागवता येतील.

## 'प्रत्येक महिलेला स्वत:चे निर्णय घेण्याचा अधिकार मिळायलाच हवा' – प्रियांशी यादव

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** झी टीव्हीवरील 'तू ही रे दिल में' मालिकेने अल्पावधीतच प्रेक्षकांची पसंती मिळवली असून आगामी भागांमध्ये



कथानकाला नवे नाट्यमय वळण मिळणार आहे. वृंदाची सावत्र आई तिला घरासाठी भाग्यवान मानत तिच्या इच्छेविरुद्ध स्वत:पेक्षा जवळपास दुप्पट वयाच्या नरेंद्रशी लग्न लावण्याचा निर्णय घेते. या कथानकावर प्रतिक्रिया देताना वृंदाची भूमिका साकारणारी अभिनेत्री प्रियांशी यादव म्हणाली की, आजही अनेक महिला आणि तरुणींना त्यांच्या इच्छेविरुद्ध निर्णय स्वीकारावे लागतात. "वृंदाच्या भूमिकेत काम करताना तिच्या वेदना आणि संघर्ष जवळून अनुभवता आले. प्रत्येक महिलेला स्वत:च्या आयुष्याबाबत निर्णय घेण्याचा, संमती देण्याचा आणि अन्यायाविरुद्ध ठामपणे उभे राहण्याचा पूर्ण अधिकार आहे. या मालिकेद्वारे हाच महत्त्वाचा सामाजिक संदेश प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याचा आमचा प्रयत्न आहे," असे तिने सांगितले. 'तू ही रे दिल में' ही मालिका दररोज सायंकाळी ७ वाजता झी टीव्हीवर प्रसारित होते.

## जागतिक डॉक्टर दिनानिमित्त 25 डॉक्टरांचा जिल्हा परिषदेकडून गौरव

### उत्कृष्ट आरोग्य सेवेसाठी प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह प्रदान; ग्रामीण आरोग्य व्यवस्थेतील योगदानाचा गौरव

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** जागतिक डॉक्टर दिनानिमित्त जिल्हा परिषद आरोग्य विभागाच्या वतीने वेरूळ सभागृहात उत्कृष्ट व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी तसेच जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांचा प्रशस्तीपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. ग्रामीण भागात गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा देण्यासाठी योगदान दिल्याबद्दल एकूण २५ डॉक्टरांचा सन्मान करण्यात आला.



जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे पाटील व आरोग्य व शिक्षण सभापती अनिता ज्ञानेश्वर मोठे यांच्या अध्यक्षतेखाली, मुख्य कार्यकारी अधिकारी मिनू पी. एम. यांच्या हस्ते हा सन्मान सोहळा पार पडला.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी मिनू पी. एम. यांनी डॉक्टरांचे कार्य हे केवळ उपचारापुरते मर्यादित नसून त्यामागे प्रचंड ताण, भावनिक संघर्ष आणि त्याग दडलेला असतो, असे सांगत डॉक्टरांच्या मानसिक, शारीरिक व भावनिक आरोग्याची काळजी घेण्याची गरज अधोरेखित केली. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळंके यांनी आरोग्य सेवा हीच ईश्वरसेवा असल्याचे सांगत डॉक्टरांच्या सेवाभावाचे कौतुक केले.

कार्यक्रमास उपमुख्य कार्यकारी अधिकारी राघवेंद्र घोरपडे, प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. विशाल बेंद्रे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. छाया आवर्गावकर, तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी तसेच आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे नियोजन भगिनाथ थोरात, मनोज देशपांडे, चंदन गणोरे, नरेंद्र बावनथडे, काटे व भुमरे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. छाया आवर्गावकर यांनी केले. समारोपप्रसंगी डॉ. विशाल बेंद्रे यांनी अशा सन्मानामुळे डॉक्टरांना अधिक प्रेरणा मिळून आरोग्य सेवेचा दर्जा उंचावण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला.

## महापालिकेच्या मालमत्ता कर व पाणीपट्टी वसुलीत सातत्य; जूनअखेर ₹६७.७२ कोटींचा टप्पा पार

### मालमत्ता करातून ₹60.01 कोटी, पाणीपट्टीतून ₹7.72 कोटी वसूल; झोन-5 अव्वल, विशेष जप्ती मोहिमेमुळे वसुलीला गती

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** चालू आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या मालमत्ता कर व पाणीपट्टी वसुली मोहिमेला नागरिकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत असून, ३० जून २०२६ अखेर दोन्ही करांमधून एकूण ₹६७.७२ कोटींची विक्रमी वसुली करण्यात आली आहे. यंदा प्रथमच जून महिन्यात धडक जप्ती मोहीम राबवून थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त करण्यात आल्याने वसुलीला अधिक गती मिळाली.

महापालिकेच्या माहितीनुसार, ६४,४९७ मालमत्ताधारकांनी मालमत्ता करापोटी ₹६०.०१ कोटी, तर २० हजार नागरिकांनी पाणीपट्टीपोटी ₹७.७२ कोटी भरले आहेत. गतवर्षी याच कालावधीत ६०,८०० नागरिकांकडून ₹५९.९५ कोटींचा मालमत्ता कर जमा झाला होता.

केवळ ३० जून रोजीच मालमत्ता करातून ₹२.२४ कोटी आणि पाणीपट्टीतून ₹०.१३ कोटी, अशी एकूण ₹२.३७ कोटींची वसुली करण्यात आली. विविध क्षेत्रीय कार्यालयांच्या समन्वित प्रयत्नांमुळे ही कामगिरी शक्य झाल्याचे प्रशासनाने म्हटले आहे.

झोननिहाय वसुलीत झोन-५ ने ₹१२.०५ कोटींसह प्रथम, झोन-७ ने ₹१०.२१ कोटींसह द्वितीय, तर झोन-९ ने ₹८.१० कोटींसह तृतीय क्रमांक पटकावला. याशिवाय झोन-८ मध्ये ₹७.७४ कोटी, झोन-२ मध्ये ₹६.२९ कोटी, झोन-४ मध्ये ₹५.४९ कोटी, झोन-१ मध्ये ₹५.१४ कोटी, झोन-६ मध्ये ₹५.०४ कोटी, झोन-१० मध्ये ₹३.०२ कोटी आणि झोन-३ मध्ये ₹२.६२ कोटींची वसुली झाली.

गतवर्षीच्या तुलनेत वाढीच्या टक्केवारीत झोन-१० ने ४८.४४ टक्के आणि झोन-३ ने ४३.०५ टक्के वाढ नोंदवत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तसेच झोन-१, झोन-२ आणि झोन-६ यांनी अनुक्रमे १२.८६, ६.१९ आणि १.६१ टक्के वाढ नोंदवली.

महानगरपालिका प्रशासनाकडून थकीत कर वसुलीसाठी विशेष मोहीम राबविण्यात येत असून, करदात्यांना विविध माध्यमांतून कर भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. नागरिकांनी थकीत मालमत्ता कर व पाणीपट्टीचा तातडीने भरणा करून शहराच्या विकासकामांना सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त अमोल येडगे यांनी केले.

महापौर समीर राजूरकर यांनी सांगितले की, निर्धारित कर वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी सर्व झोन कार्यालयांमार्फत विशेष नियोजन करण्यात आले असून, आगामी काळात कर वसुलीत आणखी वाढ होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## देवगिरी अभियांत्रिकी महाविद्यालयाला नायलिटची (NIELIT) मान्यता

**छत्रपती संभाजीनगर:** देवगिरी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट स्टडीज ने आणखी एक मानाचा टप्पा गाठला असून, इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत कार्यरत नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ इलेक्ट्रॉनिक्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी (NIELIT) यांच्याकडून संस्थेला अधिकृत मान्यता प्राप्त झाली आहे. या मान्यतेमुळे देवगिरी अभियांत्रिकी महाविद्यालयाला नॅशनल स्किल्स क्वालिफिकेशन्स फ्रेमवर्क (NSQF) अंतर्गत कौशल्याधारित अभ्यासक्रम राबविण्यासाठी अधिकृत प्रशिक्षण केंद्र म्हणून मान्यता मिळाली आहे.



महाविद्यालयाचे संचालक डॉ. सुभाष लहाने यांनी सांगितले की "ही मान्यता संस्थेच्या गुणवत्तापूर्ण, उद्योगाभिमुख आणि कौशल्याधारित शिक्षणासाठीच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना मिळालेली राष्ट्रीय स्तरावरील दखल मानली जात आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना अत्याधुनिक तांत्रिक कौशल्यांचे प्रशिक्षण, राष्ट्रीय स्तरावरील प्रमाणपत्रे तसेच उद्योगाच्या गरजांनुसार रोजगारक्षम कौशल्ये आत्मसात करण्याची संधी उपलब्ध होणार आहे".

या यशाबद्दल म. शि. प्र. मंडळाचे सचिव मा. आ. श्री. सतीश चव्हाण यांनी समाधान व्यक्त करताना सांगितले की, "देवगिरी अभियांत्रिकी महाविद्यालयाला मिळालेली नायलिटची (NIELIT) मान्यता ही विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी महत्त्वाची पायरी आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना राष्ट्रीय दर्जाचे कौशल्य प्रशिक्षण मिळून त्यांची रोजगारक्षमता वाढेल आणि उद्योग क्षेत्रातील संधी अधिक व्यापक होतील. संस्था गुणवत्तापूर्ण शिक्षणाबरोबरच कौशल्य विकासावर सातत्याने भर देत आहे. नायलिटची ही मान्यता विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाधारित कौशल्ये आणि राष्ट्रीय स्तरावरील प्रमाणपत्रे मिळवून देण्यासाठी महत्त्वाची ठरेल."

इलेक्ट्रॉनिक्स व दूरसंचार अभियांत्रिकी विभागाच्या प्रमुख डॉ. आरती वाढेकर यांनी सांगितले की, "एनएसक्यूएफ अभ्यासक्रमांमुळे विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख प्रशिक्षण, प्रत्यक्ष कौशल्य विकास आणि रोजगाराच्या अधिक संधी उपलब्ध होतील. या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक युगात सक्षम बनविण्याचा संस्थेचा प्रयत्न अधिक बळकट होईल."

देवगिरी अभियांत्रिकी महाविद्यालयाने स्थापनेपासून गुणवत्तापूर्ण तांत्रिक शिक्षण, संशोधन आणि कौशल्य विकासाला प्राधान्य दिले असून, नायलिटची ही मान्यता संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेला आणि प्रतिष्ठेला अधिक उंचीवर नेणारी ठरणार असल्याचा विश्वास संस्थेच्या व्यवस्थापनाने व्यक्त केला. या उल्लेखनीय यशामागे इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभागाच्या प्रमुख, प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांनी घेतलेली मेहनत, नियोजन आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा महत्त्वाचा ठरला.

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. आ. श्री. प्रकाशदादा सोळुंके, सचिव मा. आ. श्री. सतीश चव्हाण, उपाध्यक्ष श्री. शेखसलीम शेख अहमद, कोषाध्यक्ष श्री. किरण आवरगावकर, कार्यकारिणी सदस्य श्री. विश्वास येळीकर व श्री. प्रदीप चव्हाण, महाविद्यालयाचे संचालक डॉ. सुभाष लहाने, तसेच महाविद्यालयाचे सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग व सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनीही विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## ईव्ही चार्जिंग स्टेशन सुरु करण्यासाठी 'अमृत' करणार मार्गदर्शन

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), पुणे यांच्या माध्यमातून राज्यभरात ईव्ही (Electric Vehicle) चार्जिंग स्टेशन व्यवसाय प्रोत्साहन उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून युवक, महिला उद्योजक, स्वयं सहाय्यता गट, एमएसएमई घटक तसेच ग्रामीण भागातील इच्छुक उद्योजकांना ईव्ही चार्जिंग स्टेशन व्यवसाय उभारण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण, तांत्रिक मार्गदर्शन, व्यवसाय सल्ला आणि आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे.

**ईव्ही चार्जिंग स्टेशन व्यवसायातील संधी:-** ईव्ही चार्जिंग स्टेशन उभारणी, संचालन व व्यवस्थापन, चार्जिंग उपकरणांची देखभाल, सौरऊर्जेवर आधारित चार्जिंग सुविधा, ग्रीन एनर्जी सेवा, ईव्ही संबंधित तांत्रिक सेवा, फ्रँचायझी मॉडेल व्यवसाय तसेच ग्रामीण भागामध्ये चार्जिंग हब उभारणी अशा विविध क्षेत्रांमध्ये व्यवसायाच्या संधी उपलब्ध होणार आहेत. भविष्यात ईव्ही क्षेत्र हे सर्वाधिक वेगाने वाढणाऱ्या उद्योग क्षेत्रांपैकी एक ठरणार असल्याने प्रशिक्षित उद्योजकांना मोठ्या प्रमाणावर लाभ मिळणार आहे.

**उपक्रमाचे वैशिष्ट्य:-** अमृतच्या या विशेष उपक्रमांतर्गत सहभागी लाभार्थ्यांना ईव्ही क्षेत्राविषयी मूलभूत ते प्रगत प्रशिक्षण, व्यवसाय नियोजन, प्रकल्प अहवाल तयार करणे, चार्जिंग स्टेशन स्थापनेसाठी आवश्यक तांत्रिक मार्गदर्शन, शासनाच्या विविध योजनांची माहिती, बाजारपेठेचा अभ्यास आणि व्यवसाय व्यवस्थापनाचे मार्गदर्शन दिले जाणार आहे. या क्षेत्रातील भारतीय स्वदेशी कंपन्या आणि तज्ज्ञ मार्गदर्शक यांच्या सहाय्याने हा उपक्रम यशस्वी केला जाणार आहे.

## वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

**छत्रपती संभाजीनगर :** वसंतराव नाईक हे हरित क्रांतीचे जनक असून महाराष्ट्राला दुष्काळमुक्त करण्यासाठी त्यांनी शेती आणि सिंचनाच्या क्षेत्रात क्रांतिकारक बदल घडवून आणले. त्यांनी प्रदीर्घ काळ मुख्यमंत्री म्हणून सेवा बजावत महाराष्ट्राच्या विकासाचा पाया रचला. असे प्रतिपादन अपर जिल्हाधिकारी डॉ.संभाजी अडकूणे यांनी वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमात केले.त्यांनी वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, सामान्य प्रशासन विभागाचे उपजिल्हाधिकारी संगीता राठोड उपविभागीय अधिकारी व्यंकट राठोड, जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते, त्यांनी वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस अभिवादन केले.

## नागरिकांनी वृक्ष लागवडीसाठी पुढाकार घ्यावा; जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी.

### सवलतीच्या दरातील रोपे विक्री केंद्रावर उपलब्ध

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणामध्ये सामाजिक वनीकरण विभाग अंतर्गत वन महोत्सवामधील सवलतीच्या दरातील रोप विक्री केंद्राचे उद्घाटन जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रादेशिक वनसंरक्षण अधिकारी श्री संदीप गिरी, वनविभागाचे अधिकारी तसेच निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते यांची उपस्थिती होती. प्रतिनिधिक स्वरूपामध्ये श्री जयेश शिंदे यांना जिल्हाधिकारी गौडा यांच्या हस्ते रोप वितरित करण्यात आले. जिल्ह्यातील तालुका निहाय विविध रोपवाटिकेच्या माध्यमातून रोपांची विक्री सवलतीच्या दरात करण्यात येणार आहे. नागरिकांनी, शेतकऱ्यांनी आपल्या शेतावर, बांधावर ,आणि परिसरात वृक्ष लागवड करण्यासाठी या सवलतीच्या दरातील रोपवाटिका मधून रोपे खरेदी करावेत आणि वृक्ष लागवडीच्या मोहिमेत पुढाकार घेऊन आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी यांनी यावेळी केले. आंबा, पेरू, चिकू, लिंब,वड, जांभूळ, बदाम. बोर.व इतर फळ झाड रोपे खरेदीसाठी ठेवली आहेत.

**रोप खरेदीसाठी संपर्क ठिकाण :** पंचायत समिती कार्यालय कन्नड, श्री.ए.एम.काटकर, ९४२१६८५५५७,पंचायत समिती कार्यालय खुलताबाद, श्री.आर.डी.वलथरे-९७६४७४११७३,पंचायत समिती कार्यालय गंगापूर, श्री.ए.बी.गायके- ७५८८५३८२०४,पंचायत समिती कार्यालय,पैठण,श्री.जी.एस.सातपुते, ९४२३४१७०८६

विभागीय वन अधिकारी सामाजिक वनीकरण कार्यालय अंतर्गत छत्रपती संभाजीनगर शहरातील सावंगी येथे एक लाख ८० हजार रोप विक्रीसाठी उपलब्ध असून, समीर इनामदार याविषयीचे समन्वय करीत आहे.संपर्क क्रमांक ९८६९१६०४०५ या वर रोपांसाठी संपर्क करावा. असे आवाहन सामाजिक वनीकरण विभागाचे प्रादेशिक अधिकारी संदीप गिरी यांनी केले आहे.

## संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात करिअर संसद स्थापना व शपथविधी संपन्न




तभा.वृत्तसेवा

**सोयगाव,दि.२ जुलै :** अजिंठा शिक्षण संस्था संचलित संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव तसेच करिअर कट्टा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने करिअर संसद स्थापना व शपथविधी कार्यक्रम सोमवार,दि.२९ जून २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता करिअर कट्टा अभ्यासिकेत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.कार्यक्रमात करिअर संसदेच्या नव्याने निवड झालेल्या सर्व पदाधिकाऱ्यांना शपथ देण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण,संघटन कौशल्य,सामाजिक जबाबदारीची जाणीव तसेच करिअरविषयक जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार, उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे,कार्यालयीन अधीक्षक पंकज साबळे,करिअर कट्टा समन्वयक डॉ.मनोज कुमार चोपडे व डॉ.संतोष पडघन यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.उपस्थित मान्यवरांनी करिअर संसदेच्या पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून त्यांना जबाबदारीची जाणीव ठेवून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे आयोजन करिअर कट्टा विभागामार्फत यशस्वीरीत्या करण्यात आले.

जा.क्र./नपंसो/नामांतर/२०२६/२०२७ कार्यालय नगर पंचायत सोयगांव
दिनांक : ०२-०७-२०२६

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, छायाबाई रविंद्र काळे यांनी मोहल्ला योगेश्वरी नगरी स.नं.----- मधील प्लॉट / घर क्रमांक 21 त्यांचे नांवे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. अर्जानुसार जागेची चतु:सीमा खालील प्रमाणे आहे.

पूर्व : 09 मी. चा रोड व वापर रस्ता — पश्चिम : लागून गट नंबर
दक्षिण : रो. हाऊस नं. 22 — उत्तर : रो. हाऊस नं. 20
आकार : पूर्व पश्चिम 58-720 चौ.मी. दक्षिणोत्तर.........

वरील नामांतराबाबतच्या कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसांचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे. मुदती नंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मुख्याधिकारी
नगरपंचायत सोयगाव

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# आषाढी वारीसाठी परभणी जिल्हा प्रशासन झाले सज्ज

## परभणी जिल्ह्यातून ४३ दिंड्यांचे मार्गक्रमण होणार

## वारकऱ्यांच्या सुरक्षितता, आरोग्य व सुविधांसाठी व्यापक नियोजन

**मोहन धारासूरकर**

**परभणी ,/प्रतिनिधी:-** आषाढी वारी पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर परभणी जिल्हा प्रशासनाने वारकऱ्यांच्या सुरक्षित, सुखकर आणि सुविधायुक्त प्रवासासाठी व्यापक नियोजन केले आहे. जिल्हाधिकारी नतिशा माथुर यांच्या मार्गदर्शनाखाली निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी यांनी विविध विभागांना समन्वयाने काम करून वारकऱ्यांना आवश्यक सर्व मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले आहेत. यासंदर्भात गुरुवारी (दि. २) जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक घेण्यात आली. बैठकीस विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.



यावर्षी जिल्ह्यातून तसेच जिल्ह्याबाहेरून पंढरपूरकडे जाणाऱ्या सुमारे ४३ दिंड्या परभणी जिल्ह्यातून मार्गक्रमण करणार आहेत. शनिवारपासून प्रमुख दिंड्यांचे जिल्ह्यात आगमन सुरू होणार असून १७ जुलैपर्यंत विविध दिंड्यांचा प्रवास सुरू राहणार आहे. श्रीक्षेत्र त्रिधारा, रोकडा हनुमान मंदिर (नवा मोंढा, परभणी), दैठणा आणि गंगाखेड येथे वारकऱ्यांच्या मुक्कामाची व्यवस्था करण्यात आली आहे.

श्री संत गजानन महाराज (शेगाव), श्री संत गुलाबराव महाराज (चांदूर बाजार) तसेच श्री विठ्ठल-रुक्मिणी संस्थान (कौंडिण्यपूर-तिवसा) यांच्या पालख्या परभणी जिल्ह्यातून मार्गक्रमण करणार असून त्यांच्या स्वागतासाठी प्रशासनाने विशेष नियोजन केले आहे. वारी सुरळीत आणि सुरक्षित पार पडावी यासाठी पोलीस, आरोग्य, सार्वजनिक बांधकाम, जिल्हा परिषद, महानगरपालिका, महावितरण, राज्य परिवहन महामंडळ, अन्न व औषध प्रशासन, आपत्ती व्यवस्थापन आणि महसूल विभागांना स्वतंत्र जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत.

दिंडी मार्गावर कडक पोलीस बंदोबस्त व वाहतूक नियोजन करण्यात येणार आहे. मुक्कामस्थळी स्वच्छ पिण्याचे पाणी, निवारा, वॉटरप्रूफ तंबू, महिला वारकऱ्यांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे व स्नानगृहांची व्यवस्था केली जाणार आहे. फिरती आरोग्य पथके, डॉक्टर, औषधे आणि रुग्णवाहिका सज्ज ठेवण्यात येणार आहेत. तसेच डास प्रतिबंधक फवारणी, स्वच्छता मोहीम, साथीच्या रोगांवर नियंत्रण, दिंडी मार्गावरील रस्त्यांची दुरुस्ती, खड्डे बुजविणे, तात्पुरता वीजपुरवठा व विद्युत सुरक्षेच्या उपाययोजनाही करण्यात येणार आहेत. एसटी महामंडळाकडून भाविकांसाठी विशेष बससेवाही उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

# संक्षिप्त वृत्त...

## परभणीच्या स्वरानंद परांडेची आंतरराष्ट्रीय संगीत स्पर्धेत दुहेरी कामगिरी : अभंग गायनात द्वितीय तर शास्त्रीय गायनात तृतीय क्रमांक; दोन पारितोषिके मिळवणारा एकमेव स्पर्धक

**परभणी,/प्रतिनिधी :** अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळ, मुंबई आणि जगद्गुरु संत तुकाराम महाराज संत पीठ, पिंपरी-चिंचवड यांच्या संयुक्त विद्यमाने जगद्गुरु संत तुकाराम संत पीठ, पुणे येथे आयोजित गांधर्व मंच भारतीय शास्त्रीय संगीत व संतरचित अभंग गायन आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत परभणी येथील चि. स्वरानंद व्यंकटेश परांडे याने उल्लेखनीय यश संपादन केले. २७ जून रोजी पार पडलेल्या या स्पर्धेत स्वरानंदने अभंग गायन स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावत १५ हजार रुपये, ट्रॉफी आणि प्रमाणपत्र मिळविले. तसेच भारतीय शास्त्रीय गायन स्पर्धेत तृतीय क्रमांक प्राप्त करून १० हजार रुपये, ट्रॉफी आणि प्रमाणपत्रावरही आपले नाव कोरले.

या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत दोन स्वतंत्र विभागांत पारितोषिके मिळवणारा स्वरानंद हा एकमेव स्पर्धक ठरला. त्याच्या या यशामुळे परभणी जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. पारितोषिक वितरण सोहळा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार, सुप्रसिद्ध गायक अवधुत गुप्ते तसेच संगीत क्षेत्रातील अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

स्वरानंदला त्याचे वडील गुरुवर्य प्रा. व्यंकटेश परांडे आणि आई प्रा. सौ. सविता परांडे (संगीत विभाग प्रमुख, शिवाजी महाविद्यालय, परभणी) यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्याच्या या यशाबद्दल संगीत क्षेत्रातून तसेच विविध स्तरांतून त्याचे आणि त्याच्या मार्गदर्शकांचे अभिनंदन होत आहे.

## डॉक्टर्स डे निमित्त स्नेह महिला वृद्धाश्रमात मोफत आरोग्य तपासणी शिबिर

### डॉ. प्रफुल्ल पाटील आयुर्वेदिक कॉलेज व रुग्णालयाचा उपक्रम; वृद्ध महिलांची आरोग्य तपासणी

**परभणी,/प्रतिनिधी :** डॉक्टर्स डेचे औचित्य साधून डॉ. प्रफुल्ल पाटील आयुर्वेदिक कॉलेज व रुग्णालय, परभणी यांच्या वतीने बुधवार ०१ जूलै रोजी येथील स्नेह महिला वृद्धाश्रम येथे मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबिर उत्साहात पार पडले. या उपक्रमातून वृद्धाश्रमातील महिलांना त्यांच्या राहत्या ठिकाणीच आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात आली.

शिबिरामध्ये वृद्ध महिलांची सर्वांगीण आरोग्य तपासणी करण्यात आली. विशेषतः डोळ्यांचे विकार, पोटाचे आजार, हात-पायांच्या समस्या तसेच इतर आरोग्यविषयक तक्रारींची तपासणी करून आवश्यक औषधोपचार आणि आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यात आले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी स्नेह महिला वृद्धाश्रमाचे कर्मचारी अहिरे साहेब, पाठक मॅडम तसेच अहिरे दांपत्य यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

या आरोग्य शिबिरात अशोक तळेकर, डॉ. राजकन्या भोसले, डॉ. सुप्रिया प्रधान, रवींद्र कोयलकर आणि प्रशांत कुलकर्णी यांनी सक्रिय सहभाग घेत रुग्णांना आरोग्य सेवा प्रदान केली. तसेच परिचारिका कु. पूजा तळेवार, कु. प्रियांका नंद आणि कु. मोहिनी धागे यांनी सेवाभावी वृत्तीने रुग्णांची काळजी घेत शिबिराच्या यशस्वीतेत महत्त्वपूर्ण योगदान दिले. या उपक्रमामुळे वृद्धाश्रमातील महिलांना वेळेवर आणि गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा मिळाल्याने त्यांनी आयोजकांप्रती समाधान व कृतज्ञता व्यक्त केली. सामाजिक बांधिलकी जपत राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

## कोल्हा येथील रेल्वे उड्डाणपुलावर कार आणि आयशरच्या जोरदार धडकेत दोघांचा जागीच मृत्यू

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी ते मानवत या महामार्गावरील कोल्हा



येथील रेल्वे उड्डाणपुलावर कार आणि आयशर या दोन वाहनांच्या जोरदार धडकेत कारमधील दोघांचा जागीच मृत्यू झाला. ही दुर्देवी घटना बुधवारी सायंकाळी ४ वाजेच्या सुमारास घडली. मानवत तालुक्यातील खरबा येथील ज्ञानेश्वर वैजनाथ निर्मळ व गणेश तानाजी निर्मळ हे दोघे युवक एम.एच.०६ बी.एम. ६११० या क्रमांकाच्या इर्टिका कारमधून जात होते. त्यावेळी कार चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्यामुळे कार उड्डाणपुलाच्या कठड्यावर आदळली आणि त्या पाठोपाठ समोरुन येणाऱ्या एम.एच.२६ ए.डी. १४०१ या आयशर वाहनावर धडकली. त्यात दोघेही जागीच मृत्यू पावले. कारमधील कोल्हा येथील दिनेश भिसे, मुंजाभाऊ भिसे, पुरुषोत्तम तारे, मधुकर ढाकरगे, युवराज भिसे, योगेश फड यांच्यासह ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेऊन कारमधून त्या दोघांना कसबसे बाहेर काढले. मानवत पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक अनिल खिल्लारे, शितल बोर्डे, राजू इंगळे, प्रकाश खंदारे, अविनाश डंबाळे यांच्यासह अन्य पोलिस कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. यावेळी पोलिसांनी पंचनामा केला. दरम्यान, या घटनेत मृत्यू पावलेले दोघेही तरुण पालकांचे एकुलते एक चिरंजीव होते. गणेश तानाजी निर्मळ हे विवाहित होते. त्यांच्या पश्चात पत्नी व मुलगा आहे.

## युको बँकेचे एटीएम फोडले; गुन्हा दाखल

**परभणी,/प्रतिनिधी :** शहरातील नवा मोंढा परिसरातील युको बँक शाखा परिसरातील एटीएमची अज्ञात चोरट्याने तोडफोड करून ५ लाख ५६ हजार १०० रुपये चोरून नेल्याची घटना बुधवारी (दि. १) पहाटे तीन ते साडेतीन वाजण्याच्या सुमारास घडली. या प्रकरणी शाखा व्यवस्थापकाच्या फिर्यादीवरून कोतवाली पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. येथील नवा मोंढा परिसरात युको बँक शाखा असून बँक इमारतीत बँकेचे एटीएम मशीन कार्यान्वित करण्यात आले आहे. या एटीएममध्ये बुधवारी पहाटे तीन ते साडेतीन या वेळात अज्ञात चोरट्याने प्रवेश करून सीसीटीव्ही कॅम-यासहीत एटीएम मशीनची तोडफोड केली. तसेच एटीएम मशीनमधील तब्बल ५ लाख ५६ हजार १०० रुपये चोरून नेले. या प्रकरणी शाखा व्यवस्थापक अरविंद कुमार पांडेय यांच्या फिर्यादीवरून कोतवाली पोलिसांत भारतीय न्याय संहिता कायद्यान्वये अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## ताडकळस पोलिसांची अवैध देशी दारूविरोधात धडक कारवाई

**परभणी ,/प्रतिनिधी:-** ताडकळस पोलीस ठाण्याच्या हद्दीतील धानोरा काळे, झाडगाव आणि उखळद येथे अवैध देशी दारू विक्रीविरोधात पोलिसांनी धडक कारवाई करत मोठ्या प्रमाणात देशी दारू जप्त केली. या कारवाईत चार आरोपींविरुद्ध ताडकळस पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, धानोरा काळे येथे आरोपी प्रकाश ग्यानु जाधव याच्याकडून मंगळवारी अवैध देशी दारूच्या ५० बाटल्या जप्त करण्यात आल्या. याप्रकरणी पोलीस अंमलदार विजय चव्हाण यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास शरद डोंबे करीत आहेत. दुसऱ्या कारवाईत झाडगाव येथील आरोपी प्रल्हाद बाबुराव सूर्यवंशी (देशमुख) याच्याकडून अवैध देशी दारूच्या १२ बाटल्या जप्त करण्यात आल्या. पोलीस कर्मचारी नामदेव सुजलोड यांच्या फिर्यादीवरून त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास नागेश पोते करीत आहेत.

उखळद येथे करण्यात आलेल्या दोन स्वतंत्र कारवायांमध्ये आरोपी प्रसाद बळीराजा हेंडगे याच्याकडून १२ देशी दारूच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या. याप्रकरणी पोलीस कर्मचारी भगवान चोरघडे यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास रणेर करीत आहेत. तसेच उखळद येथीलच आरोपी तुकाराम उत्तमराव बोकार याच्याकडून ११ देशी दारूच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या. त्याच्याविरुद्धही ताडकळस पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणाचा तपास पवार करीत आहेत.

ही कारवाई ताडकळस पोलीस ठाण्याचे ठाणेदार श्रीधर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सतीश तावडे, राहुल वडमारे, नामदेव सुजलोड, अतुल टेहरे, नागेश पोते, अमोल जाधव, विजय चव्हाण, संजय चाटे आणि शरद डोंबे यांच्या पथकाने केली. पोलिसांच्या या कारवाईमुळे परिसरातील अवैध देशी दारू विक्रेत्यांचे धाबे दणाणले असून अवैध व्यवसायाविरोधातील मोहीम अधिक तीव्र करण्यात आली आहे.




## व्हिजन स्कूल येथे वसंतराव नाईक जयंती व डॉक्टर्स डे उत्साहात साजरे

**सोनपेठ,/प्रतिनिधी-:** व्हीजन पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, सोनपेठ च्या वतीने बुधवारी हरितक्रांतीचे प्रणेते स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. तसेच राष्ट्रीय डॉक्टर्स डे निमित्त विद्यार्थ्यांनी शहरातील विविध दवाखान्यांना भेट देऊन डॉक्टरांचा सत्कार करत त्यांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या प्रारंभी शाळेचे प्राचार्य राजेंद्र प्रसाद, उपप्राचार्य सुरज गायकवाड व समन्वयक संदीप थोरे यांच्या हस्ते स्व. वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी प्राचार्य राजेंद्र प्रसाद, शिक्षक बाळू पवार व नारायण चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना स्व.वसंतराव नाईक यांच्या कार्याचा, कृषी विकासातील योगदानाचा व त्यांच्या दूरदृष्टीच्या नेतृत्वाचा परिचय करून देत त्यांच्या विचारांचा आदर्श जीवनात अंगीकारण्याचे आवाहन केले.यानंतर राष्ट्रीय डॉक्टर्स डे निमित्त विद्यार्थ्यांनी शिक्षक बाळू पवार व गीतांजली रंजवे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली सोनपेठ येथील विविध दवाखान्यांना भेट देऊन डॉक्टरांना पुष्पगुच्छ देत शुभेच्छा दिल्या. तसेच डॉक्टरांशी संवाद साधून त्यांच्या सेवाभावी कार्याची माहिती जाणून घेतली. विद्यार्थ्यांनी समाजात डॉक्टरांचे महत्त्व आणि आरोग्यसेवेतील त्यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

या दोन्ही उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांमध्ये समाजसेवा, कृतज्ञता आणि महान व्यक्तींच्या कार्यातून प्रेरणा घेण्याची भावना दृढ करण्याचा प्रयत्न करण्यात आला. कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उत्स्फूर्तपणे उपस्थित होते.

## भाजप जिल्हाध्यक्ष भरोसे यांच्या हस्ते उद्घाटन

## असोला गाव आता पांदणमुक्त; १२ किलोमीटर पांदण रस्त्यांचे लोकार्पण

**परभणी,/प्रतिनिधी-:** असोला गाव पांदणमुक्त होण्याच्या ऐतिहासिक टप्प्याचे औचित्य साधत असोला ते परभणी पांदण रस्त्याचे लोकार्पण भारतीय जनता पक्षाचे परभणी महानगर जिल्हाध्यक्ष शिवाजी भरोसे यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले. या विकासकामामुळे गावातील शेतकऱ्यांच्या अनेक वर्षांपासूनच्या पांदण रस्त्यांच्या समस्येला कायमस्वरूपी दिलासा मिळाला आहे.

या विकासकामांतर्गत असोला-परभणी, असोला-मुरुंबा, असोला-कारेगाव, मुरुंबा रोड ते गट क्रमांक २२७ तसेच तट्टूजवळील पांदण ते नागोराव भरोसे यांच्या शेतापर्यंतच्या मार्गांसह गावातील विविध पांदण रस्त्यांची कामे पूर्ण करण्यात आली. त्यामुळे असोला गाव अधिकृतपणे पांदणमुक्त झाल्याची घोषणा करण्यात आली. कार्यक्रमास सरपंच उमाकांत भरोसे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष दशरथ जावळे, माजी उपसरपंच व्यंकटी जावळे, पोलीस पाटील पंढरी रिक्षे, ग्रामपंचायत सदस्य पांडुरंग जावळे, बाळासाहेब जावळे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

असोला गावातील सुमारे १२ किलोमीटर लांबीच्या पांदण रस्त्यांची कामे पूर्ण झाल्यामुळे सुमारे ७५० शेतकरी बांधवांना थेट लाभ मिळणार आहे. शेतापर्यंत जाण्यासाठी सुरक्षित, कायमस्वरूपी आणि सुलभ मार्ग उपलब्ध झाल्याने शेतीमालाची वाहतूक अधिक सोयीची होणार असून शेती व्यवसायालाही चालना मिळणार आहे.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी हे काम ग्रामविकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे सांगितले. तसेच या विकासकामासाठी सहकार्य केल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे तसेच जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांचे आभार व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमात ग्रामस्थांनी समाधान व्यक्त करत शेतकरी हिताला प्राधान्य देणाऱ्या या उपक्रमामुळे असोला गावाच्या विकासाला नवी दिशा मिळाल्याची भावना व्यक्त केली.



# महात्मा फुले जनआरोग्य योजनेत आयव्हीएफ उपचारांचा समावेश; आ. डॉ. राहुल पाटील यांच्या मागणीला यश

## पावसाळी अधिवेशनात आरोग्यमंत्र्यांची घोषणा; गरजू दांपत्यांना मिळणार मोठा दिलासा

**परभणी,/प्रतिनिधी-:** पावसाळी अधिवेशनातील प्रश्नोत्तराच्या तासात राज्यातील गरजू व आर्थिकदृष्ट्या दुर्बल दांपत्यांना आयव्हीएफ उपचारांचा लाभ शासकीय योजनेतून मिळावा, अशी महत्त्वपूर्ण मागणी आमदार डॉ. राहुल पाटील यांनी सभागृहात केली. त्यांच्या या मागणीची दखल घेत आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी आयव्हीएफ उपचारांचा महात्मा फुले जनआरोग्य योजनेत समावेश करण्याची घोषणा केली.

प्रश्नोत्तराच्या तासात बोलताना आमदार डॉ. राहुल पाटील म्हणाले की, सध्याच्या काळात अनेक कुटुंबांसाठी आयव्हीएफ उपचार ही गरज बनली आहे. मात्र या उपचारांचा खर्च अत्यंत मोठा असल्याने सर्वसामान्य व आर्थिकदृष्ट्या दुर्बल दांपत्यांना तो परवडत नाही. परिणामी अनेकांचे पालकत्वाचे स्वप्न अपूर्ण राहते. त्यामुळे शासनाने अशा दांपत्यांना शासकीय



योजनेतून आयव्हीएफ उपचार उपलब्ध करून द्यावेत, अशी मागणी त्यांनी केली. यावर उत्तर देताना आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी सकारात्मक भूमिका घेत आयव्हीएफ उपचारांचा महात्मा फुले जनआरोग्य योजनेत समावेश करण्यात येणार असल्याची घोषणा केली.

राज्य शासनाच्या या निर्णयामुळे अपत्यप्राप्तीसाठी उपचार घेऊ इच्छिणाऱ्या हजारो गरजू दांपत्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच आर्थिक अडचणींमुळे उपचारांपासून वंचित राहणाऱ्या कुटुंबांना आधार मिळणार असून सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या दिशेने हे महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे.

दरम्यान या मागणीसाठी आ.राहुल पाटील यांनी सभागृह दणाणून सोडला होता.त्यामुळेच अध्यक्ष महोदयांनी त्यांच्या या मागणीची गांभीर्याने दक्षता घेतली होती.

## अग्रलेख

# कोवळ्या पावलांची दशा आणि दिशा

काही वर्षांपूर्वी नागपुरात घडलेल्या युग चांडक अपहरण आणि खून प्रकरणात मुख्य सूत्रधाराला मदत करणारा अल्पवयीन मुलगा होता. अमरावती, छत्रपती संभाजीनगर येथे वर्चस्वाच्या वादात चक्क मुलांच्या टोळ्यांनी एकमेकांवर प्राणघातक हल्ले केले. अलिकडे मुंबई आणि ठाण्याच्या उपनगरांमध्ये चोऱ्या आणि घरफोड्या करणाऱ्यांच्या झुंडी पोलिसांनी उद्ध्वस्त केल्या. त्यांचे संपूर्ण जाळे केवळ १४ ते १७ वयोगटातील मुलांच्या बळावर चालत होते. लॉरेन्स बिश्नोई वा तत्सम 'गँगस्टर्स'च्या नावाचा वापर करून खंडणी मागण्याच्या गुन्ह्यांमध्येही शाळकरी मुलांचा सहभाग दिसला. एवढेच नव्हे, तर दोन वर्षांपूर्वी चंद्रपूरनजीकच्या दुर्गापूर रस्त्यावर गुन्हेगारांच्या टोळीने एका तरुणाचे शिर धडावेगळे केले होते. ते भयाण दृश्य बघणाऱ्यांना एकीकडे घाम फुटला असताना, गुन्हेगारांना सोबत करणारी कोवळी मुले त्या मुंडक्याचा फुटबॉल करून खेळली! अगदी असेच चित्रण नुकत्याच प्रदर्शित 'धुरंधर-२' मध्ये पाहायला मिळाले. समाजात जे घडते ते चित्रपटातून उमटते की, सिनेमात जे दिसते ते करण्याचा प्रयत्न आजची तरुणाई करते, हा वाद बाजूला सारला तरी दृक्-श्राव्य माध्यमांनी गुन्हेगारीचे असे किळसवाणे चित्रण केलेच पाहिजे का, असा प्रश्न पडतोच. चित्रपटांचा मोठा प्रभाव कोवळ्या वयावर होतो हे सत्यच. चित्रपटांतील पात्रांचा आणि त्यांच्या वर्तन-वाणीचा मोठा पगडा तरुण पिढीवर आहे. 'शोले' चित्रपटातील 'गब्बर सिंग'चे 'कितने आदमी थे...' हा संवाद आत्ताच्याही पिढीला पाठ आहे. अलिकडच्या काळातील 'पुष्पा', 'ॲनिमल' यासारख्या चित्रपटांतील नायक गुन्हेगारीशी जुळलेला, उद्धट बोलणारा, वागणारा, मारहाण करणारा आणि मादक पदार्थांचे सेवन करणारा दिसला. अनेक चित्रपटांतील रक्तबंबाळ हाणामारी या मिसरूड न फुटलेल्या मुलांसमोर कोणता आदर्श ठेवणार आहे, हा मुद्दा आहेच.

या पृष्ठभूमीवर, महाराष्ट्र विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात, बालगुन्हेगारी आणि तिच्या भविष्यासंदर्भात अत्यंत दूरगामी परिणाम करू शकेल असा निर्णय जाहीर करण्यात आला. संघटित गुन्हेगारी करणाऱ्यांकडून किंवा ड्रग्ज तस्करांकडून अल्पवयीन मुलांचा वापर केला गेल्यास थेट 'मकोका'सारखा कडक कायदा लावण्याची ऐतिहासिक घोषणा झाली. सोबतच, बालगुन्हेगारांची वयोमर्यादा सध्याच्या १८ वर्षांवरून १६ वर्षे करण्याबाबतचा प्रस्ताव केंद्राकडे पाठवण्याचा मानस राज्य सरकारने व्यक्त केला. येणारे कायदे आपले काम करतीलच, परंतु समाज म्हणूनही जबाबदारी स्वीकारण्याची वेळ आली आहे. ज्या वयात मुलांच्या हातात पुस्तक, खेळणी आणि मनात उज्ज्वल भविष्याची स्वप्ने हवीत, त्याचवेळी त्यांची कोवळी पावले गुन्हेगारी विश्वाकडे वळत आहेत. काही वर्षांपूर्वी दिल्लीत घडलेले अत्यंत क्रूर निर्भया प्रकरण असो, की अलिकडच्या काळात पुणे शहरातील 'हिट ॲण्ड रन' प्रकरण असो; या घटनांमध्ये अल्पवयीन मुलांचा सहभाग आणि त्यानंतर कायद्यातील पळवाटा शोधण्याची वृत्ती थक्क करणारी आहे. नागपूर-पुणे आणि लातूर येथे गुंड टोळ्यांनी अल्पवयीन मुलांच्या हातात दिलेले कोयते आणि धारदार शस्त्र किंवा मुंबई-ठाणेसारख्या भागात अमली पदार्थांच्या तस्करीत वाहक म्हणून होणारा त्यांचा वापर समाजासाठी घातक आहे. 'नॅशनल क्राईम रेकॉर्ड्स ब्युरो'च्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्रात दरवर्षी खून, खुनाचा प्रयत्न, जबरी चोरी अशा गंभीर गुन्ह्यांमध्ये अल्पवयीन मुलांचा सहभाग सरासरी १० ते १२ टक्के वेगाने वाढत आहे. सराईत गुन्हेगार अगदी जाणीवपूर्वक अशा कोवळ्या मुलांचा वापर करतात. कारण बाल न्याय कायद्यानुसार, या मुलांना कठोर शिक्षा होणार नाही आणि ते सुधारगृहाच्या नावाखाली लवकर जामिनावर बाहेर येतील, हे त्यांना कळते. राज्य सरकारने या समस्येचे संपूर्ण वैज्ञानिक विश्लेषण करण्यासाठी उच्चस्तरीय समिती नेमण्याची घोषणा केली आहे, ती देखील स्वागतार्ह आहे.

निष्पाप भासणारी ही कोवळी मुले गुन्हेगारीच्या दलदलीत ओढली जातात. त्यांचा हा प्रवास अचानक घडत नाही, तर तो एका पद्धतशीर सामाजिक आणि मानसिक साखळीचा परिणाम असतो. गुन्हेगारी जगताच्या पहिल्या पायरीवर 'आकर्षण' आणि 'उदात्तीकरण' असते. अनेक सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सवर 'भाईगिरी'च्या चित्रफिती मोठ्या दिमाखात फिरतात. त्या छोट्या मुलांच्या मनावर गारुड करतात. महागड्या गाड्या, हातातली शस्त्रे, दागिन्यांचा लखलखाट, सोबतीला वाजणारे 'डॅशिंग' संगीत आणि शेकडो लोकांची उठबस पाहून संवेदनशील वयातील मुलांना 'इज्जत' आणि 'ताकद' मिळवण्याचा हाच सर्वांत सोपा मार्ग आहे, असे वाटू लागते. शाळा किंवा महाविद्यालयाबाहेरील टपऱ्या, पानपट्ट्या अथवा निर्जन कोपरे अशा मुलांचे अड्डे बनतात. सुरुवातीला फॅशन किंवा मित्रांच्या आग्रहास्तव सिगारेट ओढणे, गुटखा खाणे आणि पुढे ड्रग्ज, एमडीसारख्या अंमली पदार्थांचे व्यसन या मुलांना जडते. एकदा का या व्यसनाची चटक लागली की, ते पूर्ण करण्यासाठी रोज पैशांची गरज भासू लागते. या हतबलतेच्या टप्प्यावर गुन्हेगारी टोळ्यांचे सूत्रधार सक्रिय होतात. ते या मुलांना ड्रग्ज किंवा पैशांचे आमिष दाखवून त्यांच्याकडून पाकीटमारी, चोऱ्या करण्याचे, अंमली पदार्थांची पाकिटे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पोहोचवण्याचे काम देतात. अगदी सारीच मुले या मार्गावर जात नाहीत. पण, ज्या मुलांच्या घरात सततचे वाद असतात, आर्थिक चणचण असते किंवा पालकांचे मुलांच्या आयुष्याकडे पूर्णपणे दुर्लक्ष असते, त्यांच्या बाबतीत असे घडण्याची शक्यता अधिक असते. जी मुले मानसिकदृष्ट्या अधिक असुरक्षित असतात, घरातून प्रेम, कौतुक किंवा संवाद न मिळाल्यामुळे जी मुले बाहेर आपुलकी शोधत असतात, त्यांचे असे वाया जाणे स्वाभाविक ठरते. त्यांच्या भावनिक स्थितीचा गैरफायदा घेऊन गुन्हेगारी टोळ्या त्यांना लक्ष्य करतात. एकदा मुलाच्या हाताला गुन्हेगारीचा पैसा लागला आणि कायद्याची पहिली अटक किंवा बालसुधारगृहाची वारी झाली, की त्यांच्या मनातली पोलिसांची आणि कायद्याची भीती नष्ट होते. उलट, सुधारगृहातून बाहेर आल्यावर ते 'भाई' म्हणून मिरवतात. पुढच्या टप्प्यावर ही मुले केवळ वाहक न राहता, टोळीच्या लढाईत थेट कोयते, तलवारी चालवायला धजावत नाहीत.

बालगुन्हेगारी ही जन्मजात नसून, ती व्यवस्थेने निर्माण केलेली एक समस्या आहे. 'मकोका'चा बडगा उगारून त्यावर नियंत्रण येईलही. पण जोपर्यंत या गुन्हेगारी विश्वाच्या प्रवेशाची साखळी तोडली जात नाही, तोपर्यंत ही दलदल संपुष्टात येणार नाही. या विदारक परिस्थितीवर मात करण्यासाठी बहुआयामी आणि प्रतिबंधात्मक उपायांची गरज आहे. घरापासून सुरुवात करून शाळा आणि महाविद्यालयांमध्ये राबवावयाची जनजागृती मोहीम औपचारिक अधिक व्यापक झाली पाहिजे. प्रत्येक शिक्षण संस्थेत व्यावसायिक समुपदेशक नियुक्त केले जावेत, जे विद्यार्थ्यांच्या वर्तणुकीतील नकारात्मक बदल वेळेत ओळखून त्यांना मानसिक आधार देतील. पालकांनी आपल्या पाल्याच्या 'डिजिटल ॲक्टिव्हिटी'वर आणि मित्र परिवारावर लक्ष ठेवले पाहिजे. त्यांच्यात नैतिक मूल्य रुजवले पाहिजे. पोलिसांनी संवेदनशील आणि धोकादायक परिसरांमध्ये नियमित गस्त दिली पाहिजे. बालसुधारगृहांची सद्यःस्थिती बदलून तेथे पुनर्वसन, समुपदेशन आणि सकारात्मक कौशल्य विकास कार्यक्रम राबवले गेले पाहिजेत. एकूण काय तर, कौटुंबिक संस्कार, मूल्याधारित शिक्षण आणि सजग समाज या त्रिसूत्रीच्या बळावर आपण आपल्या लहानग्यांना गुन्हेगारीच्या या भीषण खाईत लोटण्यापासून वाचवू शकू. अन्यथा, ज्यांचे कोडकौतुक करायचे, त्यांना कोड्याचे फटके दिले जाताना आपल्याला हताशपणे पाहत राहावे लागेल. ■

## श्रद्धांजली

# रंगभूमीवरचा प्रयोगशील पडदा खाली

**प्रा. मधुकर कुलकर्णी**



साठच्या दशकात मराठी प्रायोगिक रंगभूमीचा उदय होत असताना विजया मेहता या चळवळीच्या अग्रभागी होत्या. 'रंगायन'च्या स्थापनेत त्यांनी विजय तेंडुलकर, डॉ. श्रीराम लागू, अरविंद देशपांडे यांसारख्या समकालीन रंगकर्मींबरोबर नवी वाट निर्माण केली. त्यांनी मराठी रंगभूमीला जागतिक नाट्यपरंपरेची ओळख करून दिली. भारतीय लोकपरंपरा, संस्कृत नाट्यपरंपरा आणि मराठी संस्कृती यांच्या आधारावर त्यांनी आधुनिक रंगभाषा उभी केली. म्हणूनच त्यांच्या प्रयोगांमध्ये जागतिकतेचा विस्तार आणि स्थानिकतेची ऊब एकाच वेळी अनुभवायला मिळते. दिग्दर्शिका म्हणून त्यांचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे कलाकारांवरील विश्वास. त्यांनी नेपथ्य, प्रकाशयोजना किंवा तांत्रिक चमत्कारांपेक्षा अभिनेत्याच्या अंतःशक्तीवर भर दिला. त्यांच्या तालमी कठोर असत; पण त्या कलाकाराला मोडण्यासाठी नव्हे, तर घडवण्यासाठी असत.

विजयाताईंना अनेकांनी 'बाई' म्हणून आदराने संबोधले. त्या गुरू होत्या; पण गुरुपदाचा गाजावाजा करणाऱ्या नव्हत्या. त्या कलाकारांवर स्वतःची छाप लादत नसत. प्रत्येक कलाकाराच्या व्यक्तिमत्त्वातून त्याची स्वतंत्र अभिव्यक्ती उमलावी यासाठी त्या प्रयत्नशील असत. म्हणूनच त्यांच्याबरोबर काम केलेल्या अनेक कलाकारांनी त्यांच्या निधनानंतर व्यक्त केलेली भावना सारखीच होती. त्या आवाज चढवत नसत, दर्जा उंचावत असत. त्यांनी स्त्रीपात्रांकडे पाहण्याची दृष्टीही बदलली. त्यांच्या कलाकृतींमध्ये स्त्री ही केवळ कथानकाला पूरक व्यक्ती नव्हती, तर स्वतःचे विचार असलेली, निर्णय घेणारी, संघर्ष करणारी आणि प्रश्न विचारणारी व्यक्ती होती. त्या काळात ही दृष्टी धाडसी होती. रंगभूमीपुरतेच नव्हे, तर चित्रपटांमध्येही त्यांनी वेगळी ओळख निर्माण केली. 'रावसाहेब' आणि 'पेस्टनजी'सारख्या चित्रपटांमधून त्यांनी मानवी नात्यांचे सूक्ष्म, वास्तववादी चित्रण केले. 'पार्टी'मधील त्यांच्या भूमिकेला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर उत्तम अभिनेत्रीचा गौरव प्राप्त झाला. दिग्दर्शिका, अभिनेत्री, निर्माती आणि प्रशिक्षक अशा विविध भूमिकांमध्ये त्यांनी आपली कलात्मक उंची कायम ठेवली. त्यांच्या कार्याला अनेक सन्मान लाभले. संगीत नाटक अकादमी पुरस्कार, राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार, टागोर रत्न यांसह अनेक प्रतिष्ठेचे गौरव त्यांच्या वाट्याला आले; पण त्यांचा खरा पुरस्कार कोणता, असा प्रश्न विचारला तर उत्तर पुरस्कारांच्या यादीत नाही, तर त्यांच्या विद्यार्थ्यांमध्ये, त्यांच्या प्रयोगांमध्ये आणि बदललेल्या रंगसंस्कृतीत आहे. विजयाबाईंचे आयुष्य आपल्याला आणखी एक महत्त्वाचा धडा देते. कला हा प्रसिद्धीचा शॉर्टकट नाही, तर आयुष्यभराची साधना आहे. रंगभूमीवर उभे राहण्यापूर्वी वाचन, चिंतन, निरीक्षण आणि शिस्त आवश्यक असते.

बाईंच्या प्रत्येक प्रयोगामागे अभ्यासाची वर्षानुवर्षांची मेहनत असे. त्यामुळे त्यांचे दिग्दर्शन कधीही वरवरचे वाटत नाही. त्यात आशयाची खोली आणि कलात्मक परिपक्वता कायम दिसून येते. विजयाबाई अशाच व्यक्तिमत्त्वांपैकी एक होत्या. त्यांनी रंगभूमीला आधुनिकता दिली; पण मुळांपासून तोडले नाही. त्यांनी कलाकार घडवले; पण व्यक्तिमत्त्वांवर स्वतःची सावली पडू दिली नाही. त्यांनी नाट्यकलेला प्रतिष्ठा दिली; पण कलेला कधीही अहंकाराचे रूप दिले नाही. त्यांच्या जाण्याने एक खुर्ची रिकामी झाली आहे; पण त्यांनी घडवलेली परंपरा अजूनही उभी आहे. विजयाबाईंनी केवळ नाटकांचे दिग्दर्शन केले नाही, तर रंगभूमीचा विचार बदलण्याचे काम केले. अभिनय, नेपथ्य, प्रकाशयोजना, संगीत, संवाद आणि रंगभाषा यांचा एकात्म विचार करून त्यांनी मराठी नाट्यविश्वाला आधुनिकतेची नवी दिशा दिली. त्यामुळे त्या केवळ यशस्वी दिग्दर्शक नसून मराठी रंगभूमीच्या वैचारिक परिवर्तनाच्या महत्त्वाच्या शिल्पकार ठरतात.

विजयाबाईंच्या रंगप्रवासाची सुरुवात नाटकावरील नितांत प्रेमातून झाली. पारंपरिक व्यावसायिक रंगभूमीच्या चौकटीत न अडकता त्यांनी जागतिक रंगपरंपरा, भारतीय लोकनाट्य आणि आधुनिक नाट्यशास्त्र यांचा सखोल अभ्यास केला. हा अभ्यास त्यांच्या प्रत्येक निर्मितीमध्ये जाणवतो. त्यांच्यासाठी नाटक म्हणजे केवळ मनोरंजन नव्हते तर सामाजिक वास्तव, मानवी मन आणि सांस्कृतिक मूल्यांचा शोध घेणारे प्रभावी माध्यम होते. त्यांच्या दिग्दर्शनाची सर्वांत मोठी वैशिष्ट्ये म्हणजे संयम आणि सूक्ष्मता. अनेक दिग्दर्शक भव्य नेपथ्य किंवा आकर्षक तांत्रिक साधनांवर भर देतात; परंतु विजयाबाईंनी कलाकाराचा अभिनय आणि कथानकाची अंतःशक्ती यांना केंद्रस्थानी ठेवले. त्यामुळे त्यांच्या नाटकांमध्ये बाह्य दिखाव्यापेक्षा आशय अधिक प्रभावी ठरतो. पात्रांच्या मनातील संघर्ष, त्यांच्या नातेसंबंधांतील गुंतागुंत आणि सामाजिक परिस्थितीचे वास्तववादी चित्रण हे त्यांच्या दिग्दर्शनाचे ठळक वैशिष्ट्य मानले जाते. मराठीतील प्रायोगिक रंगभूमीच्या उभारणीत त्यांचे योगदान मोलाचे आहे. व्यावसायिक यशाच्या पलीकडे जाऊन प्रेक्षकांना विचार करायला भाग पाडणारी नाटके त्यांनी सादर केली. जगभरातील श्रेष्ठ नाटककारांच्या साहित्याचा अभ्यास करून त्यांनी त्यातील आशय भारतीय आणि मराठी संदर्भात समजावून सांगितला. त्यामुळे मराठी प्रेक्षकांना जागतिक नाट्यसाहित्याची ओळख झाली आणि रंगभूमीच्या अभिव्यक्तीला नवे परिमाण मिळाले.

दिग्दर्शक म्हणून विजयाबाईंची आणखी एक जमेची बाजू म्हणजे कलाकार घडवण्याची क्षमता. कलाकार अनुभवी असो किंवा नवोदित; प्रत्येकाच्या व्यक्तिमत्त्वातील वैशिष्ट्य ओळखून त्यातून सर्वोत्तम अभिनय कसा घ्यावा, हे त्यांना उत्तम प्रकारे अवगत होते. त्यांच्या तालमीत अभिनय हा केवळ संवाद म्हणण्याचा प्रकार राहत नाही, तर तो शरीरभाषा, आवाज, शांतता, हालचाली आणि भावविश्व यांचा समन्वित अनुभव बनतो. त्यामुळे त्यांच्या हातून घडलेले अनेक कलाकार पुढे मराठी आणि हिंदी रंगभूमी तसेच चित्रपटसृष्टीत उल्लेखनीय ठरले. प्रत्येक प्रयोगशील रंगकर्मीमध्ये, प्रत्येक जिज्ञासू विद्यार्थ्यामध्ये, प्रत्येक प्रामाणिक दिग्दर्शकामध्ये आणि प्रत्येक विचारशील प्रेक्षकामध्ये विजया मेहता जिवंत राहतील. रंगभूमीवरील पडदा खाली आला आहे; पण त्यांनी उजळवलेला प्रकाश अजूनही मंचावर पसरलेला आहे. ■

(लेखक रंगकर्मी असून राज्य नाट्य स्पर्धेत अभिनयाचे पारितोषिक पटकावले आहे.)

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# जवानांच्या पाठीवर शाबासकीची थाप!

गडचिरोलीचा उल्लेख झाला की, काही वर्षांपूर्वीपर्यंत डोळ्यासमोर यायचे ते नक्षलवादाचे भयावह चित्र. दाट जंगल, अधूनमधून होणारे स्फोट, सुरक्षा दलांवरील हल्ले आणि भीतीच्या छायेत जगणारे सामान्य नागरिक! जवळपास चार दशकांहून अधिक काळ माओवादी हिंसाचाराने गडचिरोलीसह संपूर्ण पूर्व विदर्भाच्या विकासाला खीळ घातली. विकासाच्या प्रत्येक उपक्रमाला विरोध, निरपराध नागरिकांची हत्या, सरकारी मालमत्तेची नासधूस व आदिवासी समाजाची दिशाभूल करून माओवाद्यांनी या परिसराला अस्थिर ठेवण्याचा प्रयत्न केला. मात्र आज परिस्थिती बदलत आहे. गडचिरोलीची ओळख आता नक्षलग्रस्त जिल्हा म्हणून नव्हे, तर नक्षलवादावर प्रभावी मात करणारा जिल्हा म्हणून निर्माण होत आहे.

या परिवर्तनामागे केवळ शस्त्रबळ नाही, तर दूरदृष्टी, संयम आणि लोकाभिमुख पोलिस व्यवस्था आहे. सुरुवातीच्या काळात नक्षलवाद्यांच्या बंदुकीला उत्तर देण्यासाठी सुरक्षा दलांनाही कठोर कारवाया कराव्या लागल्या. परंतु काळानुसार गडचिरोली पोलिसांनी एक वेगळी वाट स्वीकारली. परिणामी अनेक माओवादी कार्यकर्त्यांनी हिंसाचाराचा मार्ग सोडून आत्मसमर्पणाचा पर्याय स्वीकारला. बंदुकीपेक्षा विश्वास अधिक प्रभावी ठरतो, हे गडचिरोली पोलिसांनी कृतीतून दाखवून दिले.

अलिकडेच गडचिरोली पोलिस आणि केंद्रीय राखीव पोलिस दलाने संयुक्त कारवाईत माओवाद्यांचा शस्त्रनिर्मिती कारखाना उद्ध्वस्त केला. गुप्त माहितीच्या आधारे राबविण्यात आलेल्या या धाडसी मोहिमेत मोठ्या प्रमाणावर लेथ मशीन, रायफल बॅरल, बीजीएल पाईप्स, लोखंडी साहित्य आणि शस्त्रनिर्मितीसाठी वापरले जाणारे साहित्य जप्त करून नष्ट करण्यात आले. ही कारवाई केवळ साहित्य जप्त करण्यापुरती मर्यादित नाही; तर माओवादी संघटनेच्या भविष्यातील हिंसक कारवायांच्या कण्यावरच घाव घालणारी आहे. या उल्लेखनीय यशाची दखल स्वतः मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली, ही बाब विशेष महत्त्वाची आहे. राज्याच्या सर्वोच्च नेतृत्वाने सार्वजनिकपणे गडचिरोली पोलिस आणि केंद्रीय सुरक्षा दलाच्या जवानांचे अभिनंदन केले. प्रत्यक्ष जीव धोक्यात घालून जंगलात रात्रंदिवस काम करणाऱ्या जवानांसाठी ही शाबासकी केवळ औपचारिक नव्हती, तर त्यांच्या कर्तव्यनिष्ठेचा सन्मान करणारी होती. मुख्यमंत्री म्हणून राज्याच्या सुरक्षेची जबाबदारी पार पाडताना आणि गृहमंत्री म्हणून पोलिस दलाचे नेतृत्व करताना जवानांच्या पाठीवर कौतुकाची थाप मारणे, त्यांच्या मनोबलात मोठी भर घालणारे ठरते. खरे तर कोणत्याही सुरक्षा दलासाठी शस्त्रसामग्री, प्रशिक्षण आणि तंत्रज्ञान जितके महत्त्वाचे असते, तितकेच महत्त्वाचे असते वरिष्ठ नेतृत्वाकडून मिळणारे प्रोत्साहन. गडचिरोलीसारख्या दुर्गम भागात कुटुंबापासून दूर राहून कठीण परिस्थितीत सेवा बजावणाऱ्या जवानांसाठी मुख्यमंत्री आणि गृहमंत्र्यांनी व्यक्त केलेले कौतुक ही मोठी प्रेरणा आहे. अशा शब्दांमुळे केवळ एका कारवाईचा गौरव होत नाही, तर संपूर्ण पोलिस दलाला अधिक जोमाने काम करण्याची ऊर्जा मिळते. त्यामुळे या अभिनंदनाचे महत्त्व केवळ राजकीय नाही, तर प्रशासकीय आणि मानसिकदृष्ट्याही मोठे आहे. केंद्र सरकारने देश नक्षलमुक्त करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. त्या दिशेने गडचिरोली पोलिसांनी सातत्याने केलेले प्रयत्न आता यशस्वी होताना दिसत आहेत. अनेक कुख्यात नक्षलवादी ठार झाले, अनेकांनी आत्मसमर्पण केले आणि उरलेल्या संघटनात्मक जाळ्यावर सातत्याने प्रहार सुरू आहेत. यामध्ये स्थानिक नागरिकांचे सहकार्य आणि पोलिसांवरील वाढता विश्वास ही सर्वांत मोठी जमेची बाजू ठरली आहे. हीच खरी गडचिरोलीच्या यशोगाथेची ताकद आहे.

हिंसाचाराच्या सावटातून विकासाच्या प्रकाशाकडे वाटचाल करणाऱ्या गडचिरोलीने संपूर्ण देशासमोर एक आदर्श निर्माण केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गडचिरोली पोलिसांच्या या कामगिरीची घेतलेली दखल आणि जवानांच्या पाठीवर मारलेली कौतुकाची थाप ही केवळ अभिनंदनाची औपचारिकता नाही; तर राज्य शासन आपल्या सुरक्षा दलाच्या पराक्रमामागे ठामपणे उभे असल्याची ठोस ग्वाही आहे. अशा गौरवामुळे जवानांचे मनोबल निश्चितच उंचावते आणि गडचिरोलीला कायमस्वरूपी शांतता, सुरक्षितता आणि विकासाच्या दिशेने नेण्याचा निर्धार अधिक बळकट होतो. अशा धाडसी जवानांना आणि त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहणाऱ्या नेतृत्वाला मनापासून सलाम. ■

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

# खडगे आणि विरोधी पक्षनेतेपद

**श्यामकांत जहागीरदार**



राज्यसभेचे सदस्य म्हणून काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनी सोमवारी शपथ घेतली आणि लगेच त्यांची राज्यसभेतील विरोधी पक्षनेते म्हणून फेरनियुक्ती झाली. खडगे यांच्याआधी काँग्रेसचेच गुलाम नबी आझाद राज्यसभेतील विरोधी पक्षनेते होते. राज्यसभा सदस्य म्हणून आझाद यांचा कार्यकाळ संपल्यानंतर खडगे यांची राज्यसभेतील विरोधी पक्षनेते म्हणून निवड झाली. १६ फेब्रुवारी २०२१ ला खडगे पहिल्यांदा विरोधी पक्षनेते झाले. विरोधी पक्षनेते म्हणून त्यांचा पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण झाला आहे. खडगे यांच्याकडे काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेतेपद अशी दोन प्रमुख पदे आहेत. त्यामुळे यावेळी काँग्रेस राज्यसभेतील विरोधी पक्षनेते म्हणून नव्या नेत्याची निवड करेल, असे सर्वांना वाटत होते. राज्यसभेत विरोधी पक्षनेतेपदावर डोळा ठेवून असलेले किमान अर्धा डझन नेते आहेत. पण या सर्वांची पुन्हा एकदा निराशा झाली. काँग्रेसने खडगे यांच्या नेतृत्वावरच विश्वास दाखवला. याचा अर्थ काँग्रेसच्या नेतृत्वाने राज्यसभेतील काँग्रेसच्या अन्य नेत्यांवर अविश्वास दाखवला आहे. काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्ष सोनिया गांधी या पहिल्यांदाच राज्यसभेत आल्या आहेत. त्यामुळे काँग्रेसला राज्यसभेत कोणताही धोका पत्करायचा नव्हता, असे दिसते. त्यामुळे पक्षाने खडगे यांचीच विरोधी पक्षनेते म्हणून फेरनिवड केली.

राज्यसभा सदस्य म्हणून कार्यकाळ संपल्यानंतर गुलाम नबी आझाद यांना काँग्रेस आपल्याला पुन्हा राज्यसभेवर पाठवेल, असे वाटत होते. पण तसे झाले नाही. काँग्रेस पक्षाने त्यांना राज्यसभेवर पाठवले नाही. त्यामुळे ते दुखावले गेले. त्यातूनच त्यांनी काँग्रेसचा राजीनामा देत जम्मू-काश्मीरमध्ये आपल्या नव्या पक्षाची स्थापना केली. काँग्रेसमधील असंतुष्टांच्या जी २३ गटाने राहुल गांधींच्या कार्यपद्धतीबद्दल नाराजी व्यक्त करणारे पत्र सोनिया गांधींना पाठवले होते, त्याचे कर्तेधर्ते आझादच होते. काँग्रेसच्या नेतृत्वाने आझाद यांना राज्यसभेवर न पाठवण्यामागे हेच एक कारण होते, असे म्हणतात. मल्लिकार्जुन खडगे यांच्या राजकीय अनुभवाबद्दल आणि क्षमतेबद्दल बोलण्याचे कारण नाही. मात्र त्यांचे आता वय झाले आहे, तसेच काही शारीरिक अडचणीही आहेत. वाढते वय आणि वाढत्या वजनामुळे शारीरिक हालचाली करण्यात त्यांना त्रास होतो. त्यामुळे काँग्रेस नव्या दमाच्या नेत्याची निवड करेल, असे वाटत असताना काँग्रेसने राज्यसभेतील विरोधी पक्षनेतेपद दम लागणाऱ्या नेत्याकडे सोपवले, याचे अनेकांना आश्चर्य वाटले.

राज्यसभेतील विरोधी पक्षनेते म्हणून आझाद यांचा कार्यकाळ सर्वांत मोठा म्हणावा लागेल. दोन टप्प्यात मिळून ६ वर्ष २५२ दिवस ते विरोधी पक्षनेते होते. ८ जून २०१४ ते १० फेब्रुवारी २०१५ या काळात ते पहिल्यांदा विरोधी पक्षनेते झाले. दुसऱ्या म्हणजे २३ फेब्रुवारी २०१५ ते १५ फेब्रुवारी २०२१ असा त्यांचा विरोधी पक्षनेते म्हणून जवळपास सहा वर्षांचा कार्यकाळ होता. मोदी सरकार सत्तेत आल्यानंतर गुलाम नबी आझाद हे काँग्रेसचे राज्यसभेतील पहिले विरोधी पक्षनेते म्हणावे लागतील.

खडगे विरोधी पक्षनेतेपदी आणखी एक वर्ष राहिले तर ते गुलाम नबी आझाद यांचा विक्रम सहज मोडू शकतात. खडगे यांच्या विरोधी पक्षनेतेपदाच्या कार्यकाळात पीयूष गोयल आणि जे. पी. नड्डा सत्तापक्षाचे नेते होते. आझाद विरोधी पक्षनेते असताना अरुण जेटली आणि थावरचंद गहलोत सत्तापक्षाचे नेते होते. संपुआ सरकारच्या दुसऱ्या कार्यकाळात भाजपाचे अरुण जेटली विरोधी पक्षनेते होते. ३ जून २००९ ते २६ मे २०१४ या काळात जेटली विरोधी पक्षनेते होते. जेटली जवळपास पाच वर्ष विरोधी पक्षनेते होते. संपुआ सरकारच्या पहिल्या कार्यकाळात भाजपाचे जसवंतसिंह यांनी विरोधी पक्षनेते पद भूषवले. जसवंतसिंह यांना विरोधी पक्षनेते म्हणून पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करण्यात १८ दिवस कमी पडले.

पंतप्रधान व्हायच्या आधी डॉ. मनमोहन सिंग यांनीही राज्यसभेतील विरोधी पक्षनेते पद भूषवले. ६ वर्ष ६४ दिवस मनमोहन सिंग विरोधी पक्षनेते होते. त्यांच्या काळात सिकंदर बख्त आणि जसवंतसिंह हे सत्तापक्षाचे नेते होते.

सत्तापक्षनेते होण्याच्या आधी सिकंदर बख्त यांनी विरोधी पक्षनेतेपदही सांभाळले. १ वर्ष २९१ दिवस ते या पदावर होते. त्यांना दुसऱ्यांदा विरोधी पक्षनेतेपद सांभाळण्याची संधी मिळाली. त्याआधी १९९२ ते १९९६ या काळात बख्त विरोधी पक्षनेते होते. काँग्रेसचे शंकरराव चव्हाण सर्वांत कमी काळ म्हणजे फक्त ९ दिवस विरोधी पक्षनेते होते. चव्हाण यांच्यानंतर एम. एस. गुरुपदस्वामी आपल्या दुसऱ्या कार्यकाळात फक्त २३ दिवस विरोधी पक्षनेते होते. त्याआधी २४ मार्च १९७१ ते २ एप्रिल १९७२ असे जवळपास वर्षभर ते विरोधी पक्षनेते होते. पहिल्यांदा गुरुपदस्वामी यांनी संघटन काँग्रेसचे तर दुसऱ्यांदा जनता दलाचे नेते म्हणून विरोधी पक्षनेते सांभाळले. भोला पासवान शास्त्री २७ दिवस विरोधी पक्षनेते पदावर होते.

भाजपाचे लालकृष्ण अडवाणी ७७ दिवस राज्यसभेत विरोधी पक्षनेते होते. पण या काळात ते भाजपाचे नाही तर जनता पक्षाचे नेते म्हणून या पदावर होते. अडवाणी यांनी अनेक वर्ष राज्यसभेतील सत्तापक्षनेतेपद सांभाळले आहे. काँग्रेसचे कमलापती त्रिपाठी दोनवेळा राज्यसभेतील विरोधी पक्षनेते झाले. विरोधी पक्षनेते म्हणून त्यांचा पहिला कार्यकाळ ३२२ दिवसांचा तर दुसरा कार्यकाळ १ वर्ष २९१ दिवसांचा होता.

संघटन काँग्रेसचे श्यामनंदन प्रसाद मिश्रा हे राज्यसभेतील पहिले अधिकृत विरोधी पक्षनेते म्हणावे लागतील. १८ डिसेंबर १९६९ ते ११ मार्च १९७१ या काळात ते विरोधी पक्षनेते होते. १३ मे १९५२ ते १७ डिसेंबर १९६९ या काळातील विरोधी पक्षनेतेपदाबाबत कोणतीही अधिकृत माहिती उपलब्ध नाही. पुंजला शिवशंकर आणि जयपाल रेड्डी या दोघांनीही विरोधी पक्षनेते सांभाळले. शिवशंकर काँग्रेसचे तर रेड्डी जनता दलाचे नेते होते.

विशेष म्हणजे राज्यसभेत विरोधी पक्षनेतेपदासोबत उपनेताही असतो. भाजपातर्फे आतापर्यंत एस. एस. अहलुवालिया आणि रविशंकरप्रसाद, तर काँग्रेसतर्फे आनंद शर्मा, पी. चिदंबरम् आणि प्रमोद तिवारी हे उपनेते झाले. आनंद शर्मा तर सर्वाधिक काळ म्हणजे ७ वर्ष २९८ दिवस उपनेते होते, तर प्रमोद तिवारी यांनी तीन वर्ष ११० दिवस हे पद उपभोगले, तर चिदंबरम् ३४४ दिवस उपनेते होते. भाजपाचे अहलुवालिया २ वर्ष ३०४ दिवस तर रविशंकर प्रसाद १ वर्ष ३१० दिवस या पदावर होते. पण गंमत म्हणजे भाजपामधील असो की, काँग्रेसमधील एकही उपनेता आतापर्यंत राज्यसभेतील विरोधी पक्षनेता झाला नाही. या सर्वांना उपनेतेपदावरच समाधान मानावे लागले. विरोधी पक्षनेते म्हणून दुसऱ्या कार्यकाळात खडगे यांची कामगिरी कशी राहणार, याकडे आता सर्वांचे लक्ष राहणार आहे. ■

९८८१७१७८१७

## वाचक पत्रे

### उबाठाने सन्मानाने राजकारण संन्यास घ्यावा

'अहिरांच्या प्रवेशाने तांत्रिक चुकांची हॅट्ट्रिक' ही बातमी वाचली. 'ठाकरे घराण्याशी निष्ठा म्हणजे महाराष्ट्रावर निष्ठा', हे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हयात असेपर्यंत शक्य झाले होते. पण नंतरच्या काळातही तसेच राहिले पाहिजे अशी अपेक्षा करणे बालिशपणाच आहे. भारतातील काँग्रेससह बहुतेक सगळे विरोधी पक्ष आजच्या घडीला सरंजामशाहीच्या काळात वावरत आहेत. गेल्या काही काळात केंद्रासह महाराष्ट्र, बिहार, उत्तरप्रदेश, तामिळनाडू, पश्चिम बंगाल, राजस्थान अशा अनेक राज्यांमध्ये, सत्तेला एकाधिकारशाही समजून, आपल्याच परिवाराच्या हातात सत्ताकेंद्र ठेवण्यासाठी साम, दाम, दंड आणि भेद यांचा अनिर्बंध वापर केला जात होता. आपण करतो ते राज्यघटना आणि लोकशाहीचा सन्मान राखण्यासाठी करत आहोत, अशी जनतेची पद्धतशीरपणे दिशाभूलही केली जात होती. मात्र सर्व लोकांना सर्वकाळ मूर्ख बनवणे कोणालाही शक्य होत नाही, या नैसर्गिक सत्याला धरून अशा घराणेशाहीचा वारसा जपणाऱ्या पक्षांना जनताजनार्दनाने खड्यासारखे बाजूला केले आहे.

उबाठांनी भाजपची ३० वर्षांपासून असलेली युती २०१९ मध्ये मुख्यमंत्री पदाच्या लालसेने तोडली. जनादेश पायदळी तुडवला. ते काँग्रेस, शरद पवार यांच्याबरोबर गेले. मुलाला घरातून थेट कॅबिनेट मंत्री बनवले. थोडक्यात सांगायचे झाले तर, शिवसेना नावाच्या चंदनी महालाला संजय राऊत नावाची धस लागली आणि त्या 'वाळवी'ने तो महाल पोखरून त्याची धुळधाण उडवली. आता तर महायुतीत जाण्याचा मार्गही पूर्णपणे बंद झाला आहे. त्यामुळे आणखी अपमानास्पद परिस्थिती येण्यापूर्वी आणि मुळात राजकारण हा त्यांचा प्रांतच नसल्यामुळे, त्यांना राजकारण संन्यास हाच पर्याय आहे.

**शिवराम वैद्य**/पुणे. ९८५०५१८०१८

■■■

### पालखी मार्गावर अन्नपदार्थ तपासणी योग्यच

येणाऱ्या आषाढी एकादशीत उपस्थित राहून पांडुरंगाला पावसाचे साकडे घालण्यासाठी व समृद्ध, संपन्न, निरोगी महाराष्ट्र व देशासाठी राज्याच्या विविध भागातून निघालेल्या पालख्या पंढरपूर मार्गावर आहेत. पावसाळ्याचे दिवस आहेत. या पालख्यांसोबत ज्येष्ठ पुरुष व महिला मोठ्या संख्येने आहेत. त्यांच्या आरोग्याची सर्वांनीच काळजी घेणे गरजेचे आहे. पालखी मार्गावर जागोजागी मुक्काम, चहापाणी, नाश्ता, जेवण, फराळ व अन्य खाद्यपदार्थ पुरविले जातात. ही मोठी सेवा आहे. पालखीतील भाविकांची सेवा हा मोठा धर्म मानला जातो. गावोगावीचे नागरिक पुढाकार घेतात. पालखी मार्गावर, हॉटेल्स, चहा टपऱ्या व फळफळावर व फराळाची दुकाने असतात. या ठिकाणच्या अन्नपदार्थांची तपासणी करणे हे पालखीतील ज्येष्ठ नागरिक व इतर सर्व सहभागी यांच्या आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक आहे. याबाबत हॉटेलचालक किंवा प्रसाद वा नाश्ता देणारे किंवा फळ विक्रेते यांनी गैरसमज करून घेऊ नये. अन्नदान मंडळे किंवा ग्रामस्थ तसेच संस्था यांनीही याबाबत गैरसमज न करता अन्न प्रशासन विभागाला तपासणी करण्यास सहकार्य करावे.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

■■■

### हवामान बदलाचे आव्हान



आज जगभरात सर्वत्र जगातील हवामान बदलाचे परिणाम मानवजातीस भोगावे लागत आहेत. खरं पाहता बहुतांशी ही सगळी आपल्याच कर्माची फळे आहेत. अनेक संकटे ही मानवनिर्मित आहेत. सारखे यावर चर्चा, इमेज आणि बातम्या वैगरे टाकून काही फरक पडणार नाहीये. आणि निसर्ग कोपला आहे म्हणून त्याला दोषी ठरवणे म्हणजे निव्वळ मूर्खपणा ठरेल. ज्या निसर्गाने पिढ्यान् पिढ्या मानवी आयुष्य जगवले, जगण्यासाठी लाखो करोडो वर्ष भरभरून दिले, त्याच्यावरच कुऱ्हाड घालण्याचे अहोरात्र काम आजही सर्वत्र चालूच आहे. आणि कोणतीही नैसर्गिक दुर्घटना घडली की पुन्हा तोच गुन्हेगार, दोषी म्हणून त्याच्याकडेच बोट आणि आरोप! निसर्ग कोपण्याची प्रक्रिया काय काल परवा घडली नाही. याचे सर्व संकेत जगभरातील शास्त्रज्ञ किती तरी वर्षांपासून भाकीत करत होते. निसर्गास इतके वर्ष हलक्यात घेतल्याचे परिणाम आज जगभरात अनेकांना भोगावे लागत आहेत ही वस्तुस्थिती नाकारता कामा नये. जगभरातील सरकारने तसेच समस्त नागरिकाने एकत्र येऊन आता प्रत्यक्ष कृतीतून दाखवून देत निसर्गाचा ऱ्हास रोखणे आणि संवर्धन करणे अत्यावश्यक आहे. ■

**लोकेश बापट**/पुणे

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस **tbedit2016@gmail.com** तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# सिडको नवनगर प्रकल्पाची रखडलेली भूसंपादन प्रक्रिया पूर्ण करून तातडीने प्रकल्पाचे काम हाती घ्या

## अ.अर्जुनराव खोतकर यांची विधानसभेत मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याकडे आग्रही मागणी

तभा वृत्तसेवा
जालना । प्रतिनिधी

जालना शहरासाठी प्रस्तावित असलेल्या खरपुडी येथील सिडको नवनगर प्रकल्पाची रखडलेली भूसंपादन प्रक्रिया तातडीने पूर्ण करून प्रकल्पाला गती द्यावी, अशी आग्रही मागणी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी गुरुवारी विधानसभेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली.

सभागृहात बोलताना आमदार खोतकर यांनी सांगितले की, जालना शहरातील सर्वसामान्य नागरिकांना परवडणारी घरे उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने खरपुडी येथे सुमारे २८७ हेक्टर क्षेत्रावर सिडको नवनगर प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेतला होता. याबाबत ७ फेब्रुवारी २०२३ रोजी अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली असून त्यानंतर काही जमिनींचे संपादनही करण्यात आले आहे.

या प्रकल्पासाठी १२० हेक्टर जमिनीचा अवॉर्ड मंजूर झाला असून त्यापैकी ७३.६५ हेक्टर जमिनीची संपादन प्रक्रिया पूर्ण झाली आहे. मात्र उर्वरित ४७.९० हेक्टर जमिनीची संपादन प्रक्रिया अद्याप प्रलंबित आहे. तसेच सुमारे १२६ हेक्टर क्षेत्रासाठी मूल्यांकन व अवॉर्डची प्रक्रिया देखील रखडलेली असल्याने संपूर्ण प्रकल्प विलंबित झाला आहे, असे त्यांनी निदर्शनास आणून दिले.गेल्या तीन ते चार वर्षांपासून प्रकल्प रखडल्यामुळे संबंधित परिसरातील शेतकरी मोठ्या मानसिक तणावाखाली असून त्यांच्या जमिनींवर कोणतेही विकासकाम,व उत्पन्न करता येत नाही. त्यामुळे उर्वरित भूसंपादन, मूल्यांकन व अवॉर्डची प्रक्रिया तातडीने पूर्ण करून पात्र शेतकऱ्यांना मोबदला त्वरित वितरित करावा, अशी मागणी आमदार खोतकर यांनी केली. तसेच प्रकल्पाच्या कामाला तातडीने सुरुवात करण्याचीही त्यांनी आग्रही मागणी केली.



» यावर उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री एकनाथ शिंदे यांनी जालना शहराच्या विकासासाठी खरपुडी सिडको नवनगर प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा असल्याचे सांगितले. सध्या सिडको प्रशासनाकडून सुरू असलेली प्रक्रिया अत्यंत संथ गतीने होत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली असून प्रकल्पाला गती देण्यासाठी संबंधित यंत्रणांना आवश्यक सूचना देण्यात येतील. भूसंपादनाची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करून सिडको नवनगर प्रकल्पाचे काम तातडीने सुरू करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी सभागृहात दिले.



## कालिका स्टील अलॉयज ठरले मराठवाड्यातील अग्रणी करदाते; जीएसटी विभागाकडून गौरव

तभा वृत्तसेवा
जालना । प्रतिनिधी

केंद्रीय वस्तू व सेवा कर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने ९व्या ऋड्ढ वर्धापन दिना निमित्त आयोजित कार्यक्रमात मराठवाडा विभागातील अग्रणी करदाता म्हणून मे. कालिका स्टील अलॉयज प्रा. लि. या कंपनीचा गौरव करण्यात आला.

आर्थिक वर्ष सन २०२५-२६ मध्ये उत्कृष्ट कर अनुपालन व योगदानाबद्दल कंपनीचे संचालक श्री. घनश्यामदासजी गोयल यांचा स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. हा सन्मान विभागीय आयुक्त मा. श्री. प्रदीप गुरुमूर्थी, अतिरिक्त आयुक्त मा. श्री. राजकुमार केंद्रे तसेच सह आयुक्त मा. श्री. रोहित निगवेकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी मान्यवरांनी कालिका स्टील अलॉयजच्या पारदर्शक व्यवहारांचे व वेळेवर कर भरण्याच्या शिस्तीचे कौतुक केले. श्री. गोयल यांनी ऋड्ढ विभागाच्या सहकार्याबद्दल आभार मानले व भविष्यातही कर अनुपालनात अग्रेसर राहण्याची ग्वाही दिली.

## संक्षिप्त

### जिल्हाधिकारी कार्यालयात वसंतराव नाईक यांना अभिवादन



तभा वृत्तसेवा
जालना । प्रतिनिधी

राज्याचे माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

यावेळी उपजिल्हाधिकारी मनिषा दांडगे, तुषार निकम, सतीश तायडे, दिपाली राऊत (वानखडे), शिल्पा मगरे,संपदा कुलकर्णी, प्रिती चौधरी, रीना नगरकर, ज्योती वाघ, स्वाती राठोड,अतुल केदार, डी.गोरे, आर.बी.कलगुंडे, एस के सहाने, सुनिल काळुंके व इतर तसेच प्रशासकीय इमारतीमधील विविध कार्यालयाचे अधिकारी-कर्मचारी यांची उपस्थिती होती.

### महानगरपालिका ते नीलम टॉकीज दरम्यान पुलाचे काम तातडीने करा

शरद पवार गट राष्ट्रवादी युवक शहराध्यक्ष राजेंद्र जाधव यांची मागणी



तभा वृत्तसेवा
जालना । प्रतिनिधी

जालना शहरातील महानगरपालिका ते नीलम टॉकीज, म्हसोबा मंदिरासमोरील पुलाची तातडीने दुरुस्ती व पुनर्बांधणी करण्यात यावी, तसेच लगतच्या नाल्याची साफसफाई करावी, अशी मागणी शरद पवार गट राष्ट्रवादी युवक शहराध्यक्ष राजेंद्र जाधव यांनी केली आहे.

मागील वर्षी झालेल्या मुसळधार पावसामुळे या परिसरातील अनेक दुकाने व व्यावसायिकांच्या आस्थापनांमध्ये पावसाचे पाणी शिरून मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले होते. मात्र, त्यानंतरही पुलाच्या दुरुस्तीचे काम रखडले असून संबंधित प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप राजेंद्र जाधव यांनी केला आहे. याशिवाय, पुलालगतच्या नाल्याची नियमित साफसफाई होत नसल्याने आगामी पावसाळ्यात पुन्हा पाणी तुंबून दुकानदारांना मोठ्या नुकसानाला सामोरे जावे लागू शकते. मागील वर्षी झालेल्या नुकसानीची भरपाईही अनेक दुकानदारांना अद्याप मिळालेली नसल्याचे त्यांनी नमूद केले. या संदर्भात अनेक वेळा महानगरपालिकेला निवेदने देऊनही कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे प्रशासनाने तातडीने पुलाच्या दुरुस्तीचे काम हाती घेऊन नाल्याची साफसफाई करावी, अन्यथा नागरिकांच्या व व्यापाऱ्यांच्या हितासाठी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही राजेंद्र जाधव यांनी दिला आहे.

## लोकमत सरपंच अवॉर्ड २०२६ (विजव्यवस्थापन) ने सरपंच गजानन सुनीलराव लोणीकर व ग्रामपंचायत लोणीचा राज्यस्तरीय गौरव

तभा वृत्तसेवा
परतुर । प्रतिनिधी

येथील यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या प्रतिष्ठित लोकमत सरपंच अवॉर्ड २०२६ सोहळ्यात ग्रामपंचायत लोणीचे सरपंच श्री. गजानन सुनीलराव लोणीकर यांना 'विजव्यवस्थापन' या विभागातील राज्यस्तरीय लोकमत सरपंच अवॉर्ड प्रदान करून गौरविण्यात आले.

हा मानाचा पुरस्कार महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सौ. सुनेत्रा अजितदादा पवार, ग्रामविकास मंत्री श्री. जयकुमार गोरे, कृषी मंत्री श्री. दत्तामामा भरणे, गृह राज्यमंत्री श्री. योगेश कदम तसेच लोकमत परिवाराचे सर्वेसर्वा पद्मश्री श्री. विजयजी दर्डा आणि श्री. राजेंद्रजी दर्डा यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. ग्रामविकास, पारदर्शक प्रशासन, लोकसहभाग, स्वच्छता, विविध शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी तसेच विकासकामांमध्ये केलेल्या उल्लेखनीय कार्याची राज्यस्तरावर दखल घेत ग्रामपंचायत लोणीला हा प्रतिष्ठेचा पुरस्कार बहाल करण्यात आला. यावेळी पुरस्कार स्वीकारल्यानंतर बोलताना सरपंच श्री. गजानन सुनीलराव लोणीकर म्हणाले, गावाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी माजी मंत्री तथा परतूर-मंठा मतदारसंघाचे आमदार श्री. बबनराव लोणीकर साहेब तसेच भाजप



प्रदेश सचिव मा. श्री. राहुल भैया लोणीकर साहेब यांचे सातत्याने मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या माध्यमातून ग्रामपंचायत लोणीसाठी भरीव विकासनिधी उपलब्ध झाला. त्यांच्या प्रेरणा, सहकार्य आणि ग्रामस्थांच्या विश्वासामुळेच मला हा प्रतिष्ठेचा 'लोकमत सरपंच अवॉर्ड २०२६' प्राप्त झाला असून, हा पुरस्कार माझा नसून संपूर्ण ग्रामपंचायत लोणी, ग्रामस्थ, ग्रामपंचायत सदस्य, अधिकारी व कर्मचाऱ्यांचा आहे, असे त्यांनी प्रतिपादन केले. या राज्यस्तरीय सन्मानामुळे ग्रामपंचायत लोणीच्या कार्याचा गौरव संपूर्ण महाराष्ट्रात झाला असून, ग्रामस्थ, लोकप्रतिनिधी, अधिकारी तसेच विविध सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी सरपंच श्री. गजानन सुनीलराव लोणीकर यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## काही लाडक्या बहिणी आनंदात, काही केवायसीच्या कचाट्यात! केवायसी त्रुटींमुळे लाडकी बहीण योजनेत हजारो महिला अडकल्या

तभा वृत्तसेवा
पारध। प्रतिनिधी

राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत सुरुवातीला नियमित अनुदान मिळालेल्या अनेक महिलांचे हप्ते अचानक बंद झाल्याने राज्यभरात नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. महाराष्ट्रातील सुमारे ९८ लाख महिला विविध कारणांमुळे योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्याची चर्चा असून, भोकरदन तालुक्यातील पारध येथील अनेक महिलांनाही याचा फटका बसला आहे.

लाभार्थी महिलांच्या म्हणण्यानुसार, योजनेचे सुरुवातीचे पाच ते सहा हप्ते नियमितपणे त्यांच्या खात्यावर जमा झाले. मात्र त्यानंतर अचानक अनुदान येणे बंद झाले. चौकशी केली असता केवायसी अपूर्ण असल्याचे किंवा कागदपत्रांमध्ये त्रुटी असल्याचे कारण सांगण्यात आले. यामुळे अनेक महिलांना वारंवार सीएससी केंद्र, सेतू सुविधा केंद्र आणि संबंधित कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागत आहेत. विशेष म्हणजे काही कुटुंबांमध्ये एकाच रेशनकार्डवर दोन महिलांना लाभ मिळत असताना, इतर अनेक महिलांचे लाभ विविध तांत्रिक कारणांमुळे बंद करण्यात आल्याची तक्रार आहे. त्यामुळे योजनेच्या निकषांबाबत संभ्रम आणि असंतोष वाढत आहे. सुरुवातीला सर्व पात्र महिलांना लाभ देण्याचा उद्देश असलेल्या योजनेत आता अटी-शर्ती अधिक कठोर होत असल्याची भावना महिलांमध्ये निर्माण झाली आहे. अनुदान बंद झालेल्या महिलांनी शासनाकडे तीव्र नाराजी व्यक्त करत, केवायसी प्रक्रिया पुन्हा सुरू करून प्रलंबित त्रुटी तत्काळ दूर करण्याची मागणी केली आहे. तसेच पात्र असूनही लाभापासून वंचित राहिलेल्या महिलांचे अर्ज पुन्हा तपासून त्यांचे थकीत व नियमित हप्ते त्वरित सुरू करण्यात यावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. भाग्यश्री तबडे यांनी आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना सांगितले की,मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे सुरुवातीचे काही हप्ते मला नियमितपणे मिळाले होते. मात्र अचानक माझे अनुदान बंद झाले. चौकशी केल्यानंतर केवायसीमध्ये त्रुटी असल्याचे सांगण्यात आले. त्यासाठी मी अनेक वेळा घधउ आवश्यक प्रक्रिया पूर्ण केली, तरीही आजपर्यंत अनुदान पुन्हा सुरू झालेले नाही. आमच्यासारख्या अनेक महिलांना या योजनेचा मोठा आधार होता. त्यामुळे शासनाने केवायसीतील त्रुटी तातडीने दूर करून बंद झालेल्या सर्व पात्र महिलांचे हप्ते पुन्हा सुरू करावेत. तसेच थकीत अनुदानही एकरकमी देण्यात यावे. शासनाने आमच्या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देऊन न्याय द्यावा. राज्यातील लाखो महिलांसाठी आर्थिक आधार ठरलेली ही योजना अधिक पारदर्शक व सुलभ पद्धतीने राबवून कोणतीही पात्र महिला लाभापासून वंचित राहणार नाही याची काळजी शासनाने घ्यावी, अशी मागणी भोकरदन तालुक्यासह राज्यभरातील महिलांकडून होत आहे. शासनाने केवायसीसंदर्भातील अडचणी तातडीने दूर करून लाभार्थींना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील केवायसीची प्रक्रिया ज्या पात्र महिलांची प्रलंबित आहे, त्यांच्यासाठी बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय, पंचायत समिती यांनी तातडीने विशेष मोहीम राबवून सर्व त्रुटी दूर कराव्यात. केवळ तांत्रिक कारणांमुळे एकही पात्र महिला योजनेच्या लाभापासून वंचित राहू नये. केवायसी पूर्ण करून बंद झालेले तसेच थकीत सर्व हप्ते त्वरित लाभार्थी महिलांच्या खात्यात जमा करण्यात यावेत अशी मागणी सागर देशमुख यांनी केली आहे.

## मंठा तहसीलदारांच्या बदलीच्या मागणीला वेग!

### » उपविभागीय अधिकारी व विभागीय आयुक्तांनी मागविला अहवाल!

तभा वृत्तसेवा
मंठा । प्रतिनिधी

महाराष्ट्र नवनिर्माण सेना, जालना जिल्हाध्यक्ष प्रकाश सोळंके यांनी मंठा तहसीलदार सौ. सुमन मोरे यांच्या बदलीची मागणी करत केलेल्या तक्रारीची गंभीर दखल प्रशासनाने घेतली आहे. या संदर्भात विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर तसेच उपविभागीय अधिकारी कार्यालय, परतूर यांनी संबंधित तक्रारीवर चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत. मनसे जिल्हाध्यक्ष प्रकाश सोळंके यांनी विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी जालना यांच्याकडे दिलेल्या निवेदनात मंठा तहसीलदार सौ. सुमन मोरे यांच्यावर यापूर्वी बदनापूर येथे तहसीलदार म्हणून कार्यरत असताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) सापळा रचून कारवाई केल्याचा उल्लेख केला होता. अशा परिस्थितीत त्यांना मंठा येथे नियमित तहसीलदार म्हणून नियुक्ती न देता जिल्हाधिकारी कार्यालयात साईड पोस्टिंग देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली होती.

या तक्रारीची दखल घेत विभागीय आयुक्त कार्यालयाने जिल्हाधिकारी जालना यांना तक्रार अर्जातील मुद्द्यांची चौकशी करून नियमानुसार आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच उपविभागीय अधिकारी, परतूर यांनी मंठा तहसीलदार यांना नोटीस बजावत तक्रारीतील आरोपांबाबत आपली बाजू मांडून तात्काळ खुलासा सादर करण्यास सांगितले आहे. मात्र, प्रशासनाने चौकशीची प्रक्रिया सुरू केली असली तरी अद्याप तहसीलदारांची बदली करण्यात आलेली नाही. त्यामुळे संबंधित प्रकरणात प्रशासन कोणता निर्णय घेते, याकडे मंठा तालुक्यासह जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## रोटरी क्लब रेनबोची जालन्याची नूतन कार्यकारणी जाहिर



मधुलता भक्कड अध्यक्ष | डॉ. अतुल जिंतूरकर सचिव | केतन शाह कोषाध्यक्ष

तभा वृत्तसेवा
जालना । प्रतिनिधी

रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोची नूतन कार्यकारणी जाहीर करण्यात आली असून, अध्यक्षपदी मधुलता भक्कड, सचिवपदी डॉ. अतुल जिंतूरकर तर कोषाध्यक्षपदी केतन शाह यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. या नवनियुक्त कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा रविवार, दि. ५ जुलै रोजी सायंकाळी ६:३० वाजता हॉटेल सॅफ्रनमध्ये अत्यंत आयोजित करण्यात आला आहे.

या सोहळ्याला मुख्य अतिथी वक्ते म्हणून ठाण्याचे प्रख्यात बालरोग तज्ज्ञ डॉ. लक्ष्मीकांत कासट हे उपस्थित राहणार आहेत. प्रमुख अतिथी रोटरीचे सहाय्यक प्रांतपाल प्रतीक नानावटी हे नूतन पदाधिकाऱ्यांना पदभार सोपवतील. याप्रसंगी रोटरी परिवारातील सदस्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मावळत्या अध्यक्षा डॉ. प्रतिभा श्रीपत आणि मावळते सचिव पंकज लड्डा यांनी केले आहे.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी दिलासा

तभा वृत्तसेवा
जालना । प्रतिनिधी

मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त जिल्ह्यांपैकी एक असलेल्या जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा देणारा निर्णय म्हणून 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' कडे पाहिले जात आहे. सततची नापिकी, वाढता उत्पादन खर्च, अनियमित पाऊस, अवकाळी पावसाचे संकट आणि शेतीमालाच्या अस्थिर बाजारभावामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना या योजनेमुळे नवसंजीवनी मिळण्याची अपेक्षा आहे.

जालना जिल्ह्याची अर्थव्यवस्था प्रामुख्याने शेतीवर आधारित आहे. जिल्ह्यात सोयाबीन, कापूस, मका, तूर, ज्वारी आदी प्रमुख पिकांची लागवड मोठ्या प्रमाणावर केली जाते. मात्र गेल्या काही वर्षांपासून बदलत्या हवामानाचा सर्वाधिक फटका या पिकांना बसत आहे. कधी दुष्काळ, तर कधी अतिवृष्टी व अवकाळी पावसामुळे उत्पादनात घट होत आहे. त्यातच बियाणे, खते, औषधे, मजुरी आणि सिंचनाचा वाढलेला खर्च यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले. परिणामी अनेक शेतकरी पीककर्जाची नियमित परतफेड करू शकले नाहीत. याच पार्श्वभूमीवर राज्य शासनाने जाहीर केलेली पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ ही आर्थिक संकटातून बाहेर पडण्यासाठी महत्त्वाची संधी मानली जात आहे. या योजनेअंतर्गत शासनाने निश्चित केलेल्या निकषांनुसार पात्र शेतकऱ्यांच्या पीककर्जाची माफी अथवा कर्जातून दिलासा देण्यात येणार आहे. त्यामुळे थकीत कर्जाचा बोजा कमी होऊन शेतकऱ्यांना नव्या हंगामासाठी पुन्हा बँकांकडून कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

### जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांना लाभाची अपेक्षा

जालना जिल्ह्यातील हजारो शेतकरी सहकारी तसेच राष्ट्रीयीकृत बँकांकडून पीककर्ज घेतात. गेल्या काही वर्षांत प्रतिकूल परिस्थितीमुळे अनेकांची कर्जे थकीत झाली आहेत. शासनाच्या या निर्णयामुळे मोठ्या संख्येने शेतकरी कर्जमुक्तीच्या कक्षेत येणार आहे. त्यामुळे शेतीतील गुंतवणूक वाढण्याबरोबरच ग्रामीण अर्थ व्यवस्थेलाही चालना मिळू शकेल.

### कागदपत्रे अद्ययावत ठेवण्याचे आवाहन

योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी आधार कार्ड, सातबारा उतारा, बँक खाते, पीककर्जाची माहिती आणि इतर आवश्यक कागदपत्रे अद्ययावत ठेवावीत, असे आवाहन करण्यात आले आहे. पात्र लाभार्थ्यांची पडताळणी बँका, सहकारी संस्था आणि महसूल विभागाच्या नोंदींच्या आधारे केली जाणार असल्याने नोंदी अचूक असणे आवश्यक ठरणार आहे.

### बँका आणि कृषी विभागाकडे वाढली चौकशी

योजनेची घोषणा झाल्यानंतर जालना जिल्ह्यातील कृषी विभाग, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक तसेच विविध राष्ट्रीयकृत बँकांच्या शाखांमध्ये शेतकऱ्यांची चौकशी वाढली आहे. अनेक शेतकरी पात्रतेचे निकष, लाभाची मर्यादा आणि अर्ज प्रक्रियेबाबत माहिती घेत आहेत. शासनाकडून अधिकृत मार्गदर्शक सूचना जाहीर झाल्यानंतर प्रत्यक्ष अंमलबजावणीला वेग येणार आहे.

### अफवांपासून दूर राहण्याचे प्रशासनाचे आवाहन

दरम्यान, योजनेबाबत सोशल मीडियावर विविध प्रकारची माहिती प्रसारित होत असल्याने शेतकऱ्यांनी कोणत्याही अप्रमाणित संदेशांवर विश्वास ठेवू नये, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. योजनेची पात्रता, लाभ, अर्ज प्रक्रिया आणि इतर बाबींबाबतची माहिती केवळ शासनाच्या अधिकृत आदेश, संबंधित बँका, कृषी विभाग किंवा जिल्हा प्रशासनाकडूनच घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

### शेतकऱ्यांसाठी आशेचा किरण

मराठवाड्यातील शेती सातत्याने नैसर्गिक संकटांना सामोरे जात असताना 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' ही जालना जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासा ठरू शकते. प्रभावी आणि पारदर्शक अंमलबजावणी झाल्यास ही योजना केवळ कर्जमुक्तीपुरती मर्यादित न राहता शेतकऱ्यांना नव्याने उभारी देणारी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणारी ठरेल.

# मतदार पडताळणी मोहीमेची प्रभावी अंमलबजावणी करा– जिल्हाधिकारी

## एसआयआर कामाच्या जबाबदारीत कसूर केल्यास होणार कार्यवाही



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ जुलै**

विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत ३० जून २०२६ पासून जिल्ह्यात प्रत्यक्ष मतदार पडताळणी मोहिमेला सुरुवात झाली आहे. या मोहिमेअंतर्गत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) घरोघरी जाऊन मतदारांची पडताळणी करून आवश्यक अर्जांचे वितरण करीत आहेत. या मतदार पडताळणी मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी याप्रसंगी दिले.

भारत निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या प्रत्यक्ष मतदार पडताळणी मोहिमेच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल गुप्ता यांनी आज (दि. १) जिल्हाधिकारी कार्यालयात मतदार नोंदणी अधिकारी व सहायक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली.

यावेळी उपजिल्हाधिकारी (निवडणूक) प्रगती चोंडेकर, मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी विकास माने, श्रीमती प्रतिक्षा भुते, समाधान घुटुकडे तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत ३० जून २०२६ पासून जिल्ह्यात प्रत्यक्ष मतदार पडताळणी मोहिमेला सुरुवात झाली आहे. या मोहिमेअंतर्गत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) घरोघरी जाऊन मतदारांची पडताळणी करून आवश्यक अर्जांचे वितरण करीत आहेत. नागरिकांनी बीएलओंना आवश्यक माहिती व कागदपत्रे उपलब्ध करून देत या मोहिमेस सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले.

जिल्ह्यातील सर्व बीएलओंना या मोहिमेसंदर्भात प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले असून, मतदार पडताळणीचे काम अचूक, पारदर्शक व वेळेत पूर्ण करण्यासाठी आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमात दि. ३० जून ते २९ जुलै या कालावधीत घरोघरी जाऊन अर्जांचे वितरण, ५ ऑगस्ट रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करणे, ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर या कालावधीत हरकती व सूचना स्वीकारणे, ५ ऑगस्ट ते ३ ऑक्टोबरदरम्यान हरकतींवरील सुनावणी घेणे आणि ७ ऑक्टोबर रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. या कामकाजासाठी नियुक्त करण्यात आलेल्या अतिरिक्त सहायक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांनी आपल्या जबाबदाऱ्या काटेकोरपणे पार पाडाव्यात. या महत्त्वाच्या कामात कोणत्याही प्रकारची दिरंगाई अथवा टाळाटाळ केल्यास संबंधितांविरुद्ध कठोर कार्यवाही करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी बैठकीत दिला.

# वनाच्छादीत क्षेत्र वाढीसाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे– गुप्ता

## जिल्ह्यात ७.९८ लाख वृक्षलागवडीचे उद्दीष्ट

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ जुलै**

जिल्ह्यात वनाच्छादित व वृक्षाच्छादित क्षेत्र वाढविण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने सामूहिक प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले. येत्या पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्याच्या अनुषंगाने आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते.

या बैठकीस उपजिल्हाधिकारी (रोहयो) राजेश सरोदे, विभागीय वन अधिकारी पुष्पा पवार तसेच विविध विभागांचे कार्यालय प्रमुख उपस्थित होते.

राज्य शासनाने ३०० कोटी वृक्षारोपण मोहिम तसेच इतर हरित उपक्रमांचे नियोजन, अंमलबजावणी व संनियंत्रण करण्यासाठी 'हरित महाराष्ट्र आयोग' स्थापन करण्यास मान्यता दिली आहे. सन २०२६ ते २०४७ या कालावधीत राज्यातील हरित आच्छादन वाढविण्याचा शासनाचा निर्धार असून, त्याअनुषंगाने आवश्यक नियोजन, जागेची उपलब्धता, रोपे, मनुष्यबळ तसेच विभागनिहाय कृती आराखडा तयार करण्यात येत आहे.

ही मोहीम परिणामाधारित अंमलबजावणी आराखड्यानुसार राबविण्यात येणार असून, लागवड केलेल्या वृक्षांच्या दहा वर्षांच्या जतन व संवर्धनाची तरतूद करण्यात आली आहे. यामुळे वृक्षांचे दीर्घकालीन अस्तित्व व वाढ सुनिश्चित होण्यास मदत होणार असून, राज्यातील हरित आच्छादनाची गुणवत्ता, शाश्वतता आणि पर्यावरणीय मूल्य वाढविण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे.

हिंगोली जिल्ह्यास ७ लाख ९८ हजार वृक्षलागवडीचे उद्दिष्ट देण्यात आले असून, सर्व विभागांनी आपापल्या वाट्याचे उद्दिष्ट वेळेत पूर्ण करून वृक्षलागवडीचा अहवाल सादर करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी दिले.

ते पुढे म्हणाले की, जिल्ह्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी ३३ टक्के क्षेत्र वनाच्छादित व वृक्षाच्छादित असणे अपेक्षित आहे. हे प्रमाण वाढविण्यासाठी जिल्ह्यातील ५ हजार ८१५ हेक्टर पोटखराब जमिनीवर वृक्षलागवडीचे नियोजन करण्यात यावे.

सध्या विविध यंत्रणांकडे सुमारे ११ लाख रोपे उपलब्ध असून, त्यापैकी जास्तीत जास्त रोपे प्राधान्याने ग्रामपंचायतींना उपलब्ध करून द्यावीत. त्यानंतर जिल्हा परिषद बांधकाम विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि कृषी विभागास आवश्यकतेनुसार रोपांचे वितरण करण्यात यावे, अशा सूचना त्यांनी दिल्या. नदीकाठच्या पूरप्रवण गावांमध्ये पूरनियंत्रणाच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवडीचे नियोजन करण्याचे निर्देशही त्यांनी संबंधित विभागांना दिले. प्रत्येक शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याच्या नावाने एक झाड लावून त्या झाडाच्या संगोपनाची जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यावर सोपविण्याचे नियोजन करावे. तसेच 'एक पेड माँ के नाम' अभियानांतर्गतही मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करून जनसहभाग वाढविण्यात यावा, असे आवाहनही जिल्हाधिकारी गुप्ता यांनी यावेळी केले.

# वसमत पालिकेत लोकप्रतिनिधी, बीएओ यांची महत्वपूर्ण बैठक

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, २ जुलै**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सुरू असलेल्या ९२-वसमत विधानसभा मतदारसंघाच्या विशेष सखोल मतदार यादी पुनरिक्षण मोहिमेच्या पार्श्वभूमीवर गुरुवार (दि. २ जुलै २०२६) रोजी वसमत नगरपरिषद कार्यालयात महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले. ही बैठक उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

बैठकीत नगरपरिषदेच्या सर्व सदस्यांना डखठ मोहिमेचे उद्दिष्ट, कार्यपद्धती आणि नागरिकांची भूमिका याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. प्रत्येक नगरसेवकाने आपल्या प्रभागातील प्रत्येक पात्र मतदारापर्यंत ही माहिती पोहोचवून बीएलओ मार्फत देण्यात आलेले ईएफ फॉर्म भरून वेळेत जमा करण्यासाठी जनजागृती करावी, अशा सूचना देण्यात आल्या. यावेळी नगरसेवकांनी उपस्थित केलेल्या विविध शंकांचे निरसन करत मतदार नोंदणी, नाव समाविष्ट करणे, दुरुस्ती व आवश्यक कागदपत्रांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

बैठकीला उपस्थित असलेल्या सर्व बीएलओ व पर्यवेक्षकांनाही विशेष प्रशिक्षण देण्यात आले. एसआयआर प्रक्रिया अचूक, पारदर्शक आणि निर्धारित मुदतीत पूर्ण करण्यासाठी हे काम सर्वोच्च प्राधान्याने करण्याचे निर्देश उपविभागीय अधिकाऱ्यांनी दिले.

बैठकीनंतर भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त राबविण्यात येत असलेल्या हर घर संविधान अभियानांतर्गत समाज कल्याण विभाग, हिंगोली यांच्याकडून प्राप्त झालेल्या संविधान उद्देशिकेच्या प्रती उपविभागीय अधिकारी व नगरपरिषद अध्यक्षा सौ. सुनिता मनमोहन बाहेती यांच्या हस्ते नगरपरिषदेच्या सदस्यांना वितरित करण्यात आल्या.

या बैठकीस नगरपरिषदेच्या अध्यक्षा सौ. सुनिता मनमोहन बाहेती, मुख्याधिकारी आशुतोष चिंचाळकर, सय्यद इम्रान अली नासेर अली, राजेश पवार, काशीनाथ भोसले, डॉ. रेणुकाताई पंतगे, सचिन दगडु, संकेत नामपल्ली, राजकुमार एंगडे, प्रभाकर क्षीरसागर, नय्युम पाशा, स्नेहा मनोहरे, ज्योती वाहुळे, शेख हारुण शेख जाहिराबी जिलानी यांचे प्रतिनिधी जावेद खुरेशी तसेच नगरपरिषदेचे शहर अभियंता नागनाथ देशमुख, अरविंद शिकारी, दाजीबा भोसले, ज्ञानेश्वर जाधव, बालाजी सोनवणे यांच्यासह इडज, पर्यवेक्षक व इतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




**हिंगोली– वसमत नगर पालिकेत विशेष सखोल मतदार यांदी पुनरिक्षण संदर्भात पालिकेच्या नगराध्यक्षा सुनीता बाहेती, मुख्याधिकारी चिंचाळकर यांच्यासह लोकप्रतिनिधी व बीएलओ यांची महत्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती. छाया– श्रीधर वाळवंटे**

## संक्षिप्त वृत्त

### कृषी दिनी खोंडे दाम्पत्याचा गौरव



हिंगोली– शहरातील तिरुपती नगर भागात जल पुनर्भरण रेन वॉटर हार्वेस्टिंग बाबत स्व. लक्ष्मणराव पाटील सेवाभावी संस्थेच्या वतीने कृषी दिनानिमित्त भास्कर खोंडे व अश्विनी खोंडे यांचा सन्मान चिन्ह व वृक्ष रोप देऊन गौरव करण्यात आला. दि ०१ जुलै २०२६ रोजी कृषी दिनाचे औचित्य साधून तिरुपती नगरवाशी व स्व. लक्ष्मण पाटील सेवाभावी संस्थेच्या वतीने जल पुनर्भरण व रेनवॉटर हार्वेस्टिंग यावर काम करणाऱ्या कुटुंबांचा गौरव व सन्मान सोहळ्याचे ओमप्रकाश देवडा को-ऑपरेटिव्ह बँक लि.हिंगोली येथे आयोजन केले होते. या कार्यक्रमांमध्ये जिल्हयाचे उपजिल्हाधिकारी श्री कांबळे साहेब यांच्या हस्ते भास्कर खोंडे व सौ आश्विनी खोंडे त्यांनी जल पुनर्भरण बाबत केलेल्या कार्याचा गौरव म्हणून सन्मान चिन्ह व वृक्ष भेट देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी बँकेचे अध्यक्ष प्रकाशचंद्र सोनी, माजी नगराध्यक्ष दिलीपराव चव्हाण,विभागीय वनाधिकारी पवार मॅडम, संस्था अध्यक्ष गजाननराव सावके,यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गजानन सावके यांनी केले तर गवळी यांनी आभार मानले. कार्यक्रमाला तिरुपती नगर मधील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

### मागील २४ तासांत सरासरी २६ मिमी पाऊस

हिंगोली–जिल्ह्यात गेल्या २४ तासात सरासरी २६.३ मिलीमीटर पावसाची नोंद झाली असून, औंढा नागनाथ तालुक्यात सर्वात जास्त ४१.७ मि.मी. पाऊस झाला आहे. तर सेनगाव तालुक्यात सर्वात कमी ४.३ मि.मी. पाऊस पडला आहे. जिल्ह्यात आज सकाळपर्यंत नोंदला गेलेला तालुकानिहाय सरासरी पाऊस पुढीलप्रमाणे असून कंसातील आकडेवारी १ जूनपासून आजपर्यंत झालेल्या पावसाची आहे. हिंगोली ३२.४ (२०५.८), कळमनुरी २९ (१४५.९), वसमत २८ (११८.३), औंढा नागनाथ ४१.७ (१३६) आणि सेनगाव तालुक्यात ४.३ (१०४.६) मि. मी. पाऊस पडला आहे. सर्व आकडेवारी मिलीमीटर परिमाणात आहे. हिंगोली जिल्ह्यात दिनांक १ जून २०२६ ते ०१ जुलै, २०२६ पर्यंत सरासरी १४३.६ मिलीमीटर पाऊस पडला आहे. त्याची टक्केवारी १८.१ अशी आहे. हिंगोली तालुक्यातील नरसी (७७.८ मिमी) व वसमत तालुक्यातील आंबा (६५ मिमी)या दोन मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली आहे.

### हिंगोलीत दुपारी पावसाच्या सरी

हिंगोली– शहरासह परिसरात गुरूवारी दुपारनंतर हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडला. मागील आठवडाभरापासून हिंगोली शहरासह परिसरात पावसाने दमदार आगमन केल्यामुळे शेतकरी पेरणीच्या कामाला लागला असून शेतीसाठी लागणारे बी बियाणे व खते तसेच औषधी करण्यासाठी कृषी केंद्रावर शेतकऱ्यांची गर्दी पहायला मिळत आहे.

# औंढा तालुक्यातील फुलदाभा परिसरात भूकंपाचे धक्के

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ जुलै**

औंढा नागनाथ तालुक्यातील फुलदाभा परिसरात बुधवारी मध्यरात्री १.२० वाजता भूकंपाचे धक्के जाणवले असून भूकंप मापकावर ३.६ रिश्टर स्केलची नोंद झाली आहे. या भूकंपामुळे परिसरातील ग्रामस्थांनी रात्र जागून काढली. कोठेही वित्त किंवा जीवीत हानी झाली नाही. मात्र वारंवार होणाऱ्या भूकंपामुळे नागरिकांच्या मनात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

औंढा नागनाथ तालुक्यातील फुलदाभा व जलालदाभा या परिसरात भूकंपाचे धक्के जाणवले. बुधवारी मध्यरात्री भूगर्भातून मोठा आवाज झाला. त्यानंतर घराची तावदाने तसेच टीनपत्रे हालू लागली होती. त्यामुळे भूकंप होत असल्याचे ग्रामस्थांच्या लक्षात आले. ग्रामस्थांनी सुरक्षित स्थळी आसरा घेतला. या भूकंपाची ३.६ रिश्टर स्केल नोंद झाली असून खोली ५ किमी नोंदविण्यात आली आहे. या भूकंपाचे धक्के वसमत तालुक्यातील पांगरा शिंदे, कुपटी, वापटी, कुरूंदा, गिरगाव, औंढा नागनाथ तालुक्यातील फुलदाभा, जलालदाभा, राजदरी, पिंपळदरी, सोनवाडी, निशाणा, असोंदा, काकडदाभा, पांगरा, मेथा, जडगाव, राजापूर, जांब भागात जाणवले आहेत. या भूकंपामुळे परिसरातील ग्रामस्थांनी रात्र जागून काढली.

दरम्यान या भागात वारंवार भूकंपाचे धक्के का बसू लागले आहेत. याची नेमकी कारणे शोधली जात नसल्याने ग्रामस्थांमधून भितीचे वातावरण कायम आहे. भूकंप झाल्यानंतर प्रशासनाकडून भेटीचे सोपस्कार पूर्ण केले जात असून ग्रामस्थांमधून जनजागृती करून काय करावे अन काय करू नये असे सांगितले जाजे मात्र नेमके कारण काय आहे याचा शोध का घेतला जात नाही असा सवाल या परिसरातील नागरिक करीत आहेत. या भूकंपामुळे कुठलीही वित्त अथवा जीवीत हानी झाली नसली तरीही भूकंपाची तीव्रता वाढत आहे.

वसमत तालुक्यातील पांगरा शिंदे व कळमनुरी तालुक्यातील रामेश्वरतांडा परिसरातील केंद्रबिंदू असलेल्या भागात मागील काही दिवसांत वारंवार भूकंप होत आहेत.

# अनिल जाधव यांना राज्यस्तरीय वसंतराव नाईक पुरस्कार प्रदान




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ जुलै**

हिंगोली तालुक्यातील मौजे माळहिवरा येथील प्रगतिशील शेतकरी अनिल गंगाराम जाधव यांना कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल सन २०२३-२४ या वर्षासाठीचा 'वसंतराव नाईक शेतीनिष्ठ पुरस्कार-२०२४' (सर्वसाधारण गट) आज प्रदान करण्यात आला.

आज मुंबई येथील डोम, सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियम, वरळी येथे आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार वितरण समारंभात महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार तथा कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या हस्ते जाधव यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला.

अनिल जाधव यांनी आधुनिक, शाश्वत व नाविन्यपूर्ण शेती पद्धतींचा अवलंब करून कृषी क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना हा प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

या यशाबद्दल जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रदीप कच्छवे, तालुका कृषी अधिकारी शिवसंदीप रणखांब, मंडळ कृषी अधिकारी गणेश पवार तसेच कृषी विभाग, हिंगोलीच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी अनिल जाधव यांचे अभिनंदन केले.

# माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त कृषी दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ जुलै**

हरित क्रांतीचे प्रणेते तसेच माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्त अभिवादन करीत कृषी दिन साजरा करण्यात आला. यावेळी विविध कार्यक्रमांचे आयोजनही करण्यात आले होते.









सांदीपनी पब्लिक स्कूल तरोडा (बु) नांदेड येथील शाळेत एक जुलै रोजी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचा कृषी दिन म्हणून उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेच्या मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी यांच्या हस्ते वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर काही चिमुकल्या मुलांनी आपल्या भाषणाच्या माध्यमातून वसंतराव नाईक यांचे महत्त्व पटवून दिले. तसेच शाळेतील सहशिक्षक संग्राम पवार सर यांनी वसंतराव नाईक यांनी तत्कालीन परिस्थितीमध्ये केलेले परिवर्तन, शेती शिक्षण व मागासवर्गीय लोकांच्या विकासात्मक धोरणासाठी कोणकोणते उपाययोजना केल्या याबाबत सखोल मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाला शाळेचे संचालक सुनील राठोड, सहसंचालक मुकुल राठोड, सौ. माहेश्वरी मुकुल राठोड, मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी, उपमुख्याध्यापिका हरप्रीत कौर, प्रशासक मारुती मेखाले यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जोगदंड खंडू यांनी केले.

हिंगोली तालुक्यातील डिग्रस क-हाळे येथील स्वामी विवेकानंद माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात बुधवार १ जुलै रोजी हरितक्रांतीचे जनक,माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची ११३ वी जयंती. महाराष्ट्र कृषी दिन म्हणून साजरी करण्यात आली. यावेळी ज्ञानोबाराव क-हाळे, मुख्याध्यापक एस.ए.जगताप, क-हाळे ए डी, कवी शिवाजी क-हाळे, पर्यवेक्षक पाटील पी आर, लोणकर बि ए,राठोड एस यू, चव्हाण वा एम, क-हाळे आर एस, लोंढे एस पी, खिल्लारी आर एन, जुमडे एस बी, सुर्यवंशी पी एस, क्षिरसागर एम एम, क-हाळे एस जी, पटवे एस टी, क-हाळे एम एम, हलगे टी एम इ.सह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हरित क्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक जयंती व महाराष्ट्र कृषी दिनानिमित्त हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी तालुक्यात असलेल्या बालाजी विद्यालय वाई या ठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल सोळंके यांच्यासह केंद्रप्रमुख पांडुरंग शिंदे व शाळेचे शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

हरित क्रांतिचे प्रणेते, माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांना जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांच्या प्रतिमेस अपर जिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपजिल्हाधिकारी (सामान्य) अनिल माचेवाड, नायब तहसीलदार सचिन जोशी, संतोष बोथीकर, सी.आर.गोळेगावकर यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# शेतात पेरणी करणाऱ्या शेतमजुर आणि बैलाचा शॉक लागुन मृत्यू

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि. २ जुलै -**

तालुक्यातील मौजे निमटेक येथे दुसऱ्याच्या शेतात पेरणी करण्यासाठी गेलेल्या शेतमजूर व बैलाचा विद्यूत खांबात विद्युत प्रवाह उतरल्याने शॉक लागुन जागीच मृत्यू झाला. ही घटना दि २ जुलै रोजी सकाळी ९:३० च्या दरम्यान घडली असून विद्यूत महावितरणच्या गलथान कारभारामुळे हा प्रकार घडला असल्याचा अरोप करण्यात येत आहे.

उमरी तालुक्यात पेरणी योग्य पाऊस पडल्याने शेतकरी बी -बियाने खते घेवून पेरणी साठी सज्ज झाला आहे. अनेक शेतकरी यांची कापूस लावणी पेरणी पूर्ण झाल्या आहेत.काही शेतकरी मोठ्या पावसाची प्रतिक्षा करीत आहे तालुक्यात सध्या पेरणीची घाई सुरू झाली असुन तालुक्यातील निमटेक येथिल शेतकरी लक्ष्मण विठ्ठल चंदापुरे यांच्या शेतात पेरणी चालू होती त्यांच्या शेतातील विद्यूत खांबाच्या तणावात विद्यूत प्रवाह उत्तरल्याने पेरणीची तिफन हाकलत असणाऱ्या शेतमजुर शेख अस्लम जलालसाब वय २२ वर्ष यांचा शॉक लागुन जागीच मृत्यू झाला तर तिफनला लावून असलेला एक बैल ही जगीच ठार झाला. निमटेक परिसरात या घटने बदल हळहळ व्यक्त होत आहे त्यामुळे परिसरातील पेरण्या आज खोळंबल्या आहेत .



महावितरणच्या गलथान व हालगर्जी पणामुळे सदरची घटना घडली आहे अशी चर्चा व अरोप होत आहे .

उमरी तालुक्यात शेतातील विद्यूत खांब वाकले आहेत, विद्यूत तार ही लोंबकाळत आहेत. अनेक ठिकाणी तारा तुटून दुर्घटना घडल्या आहेत. शेतकरी यांचे पाळीव प्राणी दगावल्याचे चित्र असतांना विद्यूत बिले वसुल करून वीज पुरवठा बंद करणाऱ्यात पटाईत असणाऱ्या या खात्यात आकडे टाकणाऱ्या वर कार्यवाही नाही पण मिटर चालू असणाऱ्यानां तगादा लावून वसुली करण्यात येते. शेतकरी यांना कुठलीच सेवा मिळत नाही पण आकडेवाल्या कडून मेवा मिळतो तेवड्यातच धन्य आहेत .

निमटेक येथिल २२ वर्षीय शेतमजुर शेख अस्लम जलाल साब यांचा मृत्यू हा विद्युत महावितरण कंपनीत च्या हलगर्जी पणामुळे झाला हे विशेष आहे. प्रत्येक गावात शेतात विद्यूत तारे लोमकांळले दिसून येत आहे शेख अस्लम सारख्या शेतमजुराना किती जिवे गमवावे लागणार आहेत तर विघूत महावितरणचे अधिकारी यांचे डोके ठिकाणावर येईल . उमरी तालुक्यात जास्तीच्या तक्रारी विद्यूत महावितरण कंपनी विषयी अधिक आहेत पण त्याचा निपटारा होत नाही ये रे मागच्या प्रमाणे कारभार चालू आहे . शेतमजूर शेख अस्लम जलालसाब यांच्या कुंटुबाना न्याय द्यावे अशी मागणी होत आहे .

# सिडको कार्यालयातील अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे नागरिकांची हेळसांड

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. २ जुलै -**

नांदेड येथील सिडको कार्यालयात पूर्ण वेळ एकही अधिकारी व कर्मचारी नसल्यामुळे येथील नागरिकांना वारंवार कार्यालयाचे खेटे मारावे लागत आहेत. याकडे सिडको मुख्य प्रशासकाचे दुर्लक्ष असल्याने येथील नागरिकांची मोठ्या प्रमाणात कोंडी होऊन दलालाकडून मोठी लूट होत आहे. याकडे मुख्य प्रशासक व प्रशासक यांनी लक्ष देऊन नागरिकांचा प्रश्न मार्गी लावण्याची मागणी.

नांदेड सिडको कार्यालय येथे पूर्णवेळ अधिकारी तर नाहीतच पण या ठिकाणी लिपिक, सेवक, सहायक विकास अधिकारी हे देखील नसल्याने येथील नागरिकांचे प्रश्न प्रलंबित आहेत. सदरील कार्यालयात एकच कर्मचारी कार्यरत असून कार्यालयाची सर्व प्रकारच्या कामाची जिम्मेदारी एकाच कर्मचाऱ्यावर असल्याने नागरिकांची काम खोळंबली जात आहेत.व ती लवकर होत नाहीत. त्यामुळे नावीलाजाणे नागरिकांना आपल्या मालमत्ते विषयक काम करून घेण्यासाठी दलालांना वाटल ती मनमानी रक्कम देऊन काम करून घ्यावे लागते. सदरील कामासाठी औरंगाबाद येथे जावे लागते त्यासाठी गाडी भाडे व इतर खर्च मिळून एक मोठी रक्कम संबंधित नागरिकांना मोजावी लागते. तेव्हा ही नागरिकांची पिळवणूक थांबवण्यासाठी व वेळेवर काम होण्यासाठी या कार्यालयात पूर्ण वेळ अधिकारी व लिपिक, सेवक, यासारखे कर्मचारी देण्यात यावे अशी मालमत्ता धारकांची मागणी आहे. तसेच गेल्या काही वर्षापासून सिडको कार्यालयाचा फलक मुख्य रस्त्यावर नसल्याने हे कार्यालय शोधण्यासाठी नागरिकांची हेळसांड होते. ही बाब वारंवार अधिकारी यांच्या लक्षात आणून देऊन देखील याकडे दुर्लक्ष केलं जात आहे. यामुळे वरील बाब प्रशासक व मुख्य प्रशासक यांनी पूर्ण नाही केल्यास सिडको कार्यालयास टाळा लावण्याचा इशारा येथील नागरिकांनी दिला आहे.


# जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी महेश पाटील रुजू

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २ जुलै -**

जिल्हा परिषदेचे नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी आज पदभार स्वीकारला. प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी पदाची सूत्रे महेश पाटील यांच्याकडे सुपूर्द केली. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.

महेश पाटील हे यापूर्वी सारथी संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून कार्यरत होते. शासनाने त्यांची नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदी नियुक्ती केल्यानंतर त्यांनी आज जिल्हा परिषद कार्यालयात पदभार स्वीकारला.

पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी जिल्हा परिषदेतील सर्व खातेप्रमुखांची बैठक घेऊन विविध विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. शासनाच्या लोकाभिमुख योजना प्रभावीपणे राबविणे, विकासकामांना गती देणे, तसेच नागरिकांना दर्जेदार सेवा उपलब्ध करून देण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने काम करण्याच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी दिल्या.



यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी महेश देशमुख, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विभागाचे उपआयुक्त डॉ. डी. बी. खुणे, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन डॉ. प्रवीणकुमार घुले, प्रभारी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी, शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, समाज कल्याण अधिकारी सत्येंद्र आऊलवार, जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक मयूरकुमार आंदेलवाड, जिल्हा कृषी विकास अधिकारी डॉ. नीलकुमार ऐतवडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रशांत थोरात, कार्यकारी अभियंते खराडे, संजय शिंदे व बालाजी पवार, व्यंकटराव चव्हाण, दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी अवधूत गंजेवार, व सर्व खातेप्रमुख उपस्थित होते.

## नंदकुमार कोसबतवार यांचे निधन

**नांदेड** -नांदेड वाघाळा मनपाचे माजी नगरसेवक, स्थायी समितीचे माजी सभापती, ओबीसी चळवळीतील अग्रणी नेते, अखिल भारतीय संत नामदेव महाराज संघटनेचे राज्य नेते नंदकुमार पोशट्टी कोसबतवार यांचे अल्पशा आजाराने गुरुवार दि. २ जुलै रोजी सकाळी निधन झाले. ते ६५ वर्षांचे होते. त्यांची अंत्ययात्रा दि. ३ जुलै रोजी सकाळी ९ वाजता राहते घर के.लक्ष्मीसदन हनुमान मंदिरजवळ शिवाजीनगर नांदेड येथून निघणार आहे. त्यांच्या पार्थिवावर शांतीधाम स्मशानभूमी गोवर्धनघाट येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, २ मुली,सून,जावई,नातवंडे,नात, भाऊ सुभाष, अशोक, चंद्रकांत, भावजय, पुतणे असा मोठा परिवार आहे.



**उमरी- येथील माजी नगरसेवक प्रतिनिधी तथा वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष युवा कार्यकर्ते सोनुभाऊ वाघमारे यांना वाढदिवसाच्या निमित्ताने शुभेच्छा देताना वंचित बहुजन युवा आघाडीचे प्रदेश सदस्य अक्षय बनसोडे, सम्राट आढाव आदी.**

# कृषीदिनानिमित्त हरित नांदेड अभियानांतर्गत वृक्षारोपण

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २ जुलै -**

हरितक्रांतीचे प्रणेते तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त कृषी दिनाचे औचित्य साधून नांदेड-वाघाळा शहर महानगरपालिका, क्षेत्रीय कार्यालय क्र. ०१ (तरोडा-सांगवी) व वृक्षमित्र फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जिजाऊ नगरी, सांगवी येथे मोठ्या उत्साहात वृक्षारोपण अभियान राबविण्यात आले.

प्रत्येक घराच्या परिसरात किमान एक झाड आणि शेताच्या बांधावर वृक्षवल्ली लावून समृद्धी फुलवा, हा स्व. वसंतराव नाईक यांचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने पर्यावरण जनजागृती व वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विविध वृक्षांची लागवड करण्यात आली.

यावेळी महापौर कविता मुळे यांनी सांगितले की, ही वृक्षलागवड १०० दिवसांच्या विशेष अभियानाचा भाग असून पावसाअभावी हा उपक्रम पुढे ढकलण्यात आला होता. आता तो पूर्ण करण्यात येत आहे. लावण्यात आलेल्या प्रत्येक वृक्षाचे किमान एक वर्ष संगोपन करण्याची जबाबदारी सर्वांनी स्वीकारावी. वृक्षसंवर्धनामुळे भविष्यातील ग्लोबल वॉर्मिंगचे दुष्परिणाम कमी करण्यास निश्चितच मदत होईल, असे त्यांनी नमूद केले. या वर्षी लागवड करण्यात आलेल्या झाडांचे पुढील वर्षी वाढदिवस साजरे करू असे बोलताना महापौर यांनी सांगितले.

आयुक्त डॉ. महेश डोईफोडे यांनी 'हरित नांदेड'चा संकल्प व्यक्त करत महानगरपालिका क्षेत्रात किमान १८ हजार वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठेवण्याच्या सूचना दिल्या. तसेच सर्व क्षेत्रीय कार्यालयांनी स्थानिक लोकप्रतिनिधींच्या सहकार्याने महानगरपालिकेच्या मोकळ्या जागा, उद्याने व रस्त्यांच्या कडेला मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करून त्यांचे संवर्धन करण्याचे आवाहन केले.

प्रस्तुत कार्यक्रमात याही वर्षी जागतिक पर्यावरण दिनापासून शहरात मनपा व १८ सामाजिक संस्थांच्या संयुक्त विद्यमाने हरित नांदेड अभियान राबविले जात आहे.

या अभियानात इतर वृक्ष लागवडीसोबत लोकसहभागातून मनपा क्षेत्रातील वीस प्रभागात प्रत्येकी ५० मोठी पर्यावरण पूरक झाडे ट्री गार्ड सह लागवडीचे नियोजन करण्यात आले असून ट्री गार्ड लोकसहभागातून देणगी स्वरूपात घेण्यात येणार असून झाड व इतर सर्व व्यवस्था महानगरपालिकेमार्फत केली जाणार आहे. या उपक्रमाची संपूर्ण माहिती वृक्षमित्र फाऊंडेशनचे संतोष मुगटकर यांनी दिली.

उद्यान अधीक्षक तथा क्षेत्रीय अधिकारी मिर्झा फराहतुल्लाह बेग यांनी या वर्षी च्या वृक्ष लागवडीचे नियोजन बाबत सर्वांना माहिती दिली.

## गोदावरी कॉलेज ऑफ बँकिंगचा डंका १०० टक्के निकाल

**नांदेड** -गोदावरी कॉलेज ऑफ बँकिंगने यंदाही आपल्या शैक्षणिक उत्कृष्टतेचा झेंडा उंचावत बी.कॉम. बँकिंग तृतीय वर्षाचा तब्बल शंभर टक्के निकाल लावून अभिमानास्पद यश मिळवले आहे. केवळ निकालातच नव्हे, तर विद्यार्थ्यांना दिलेल्या १००% रोजगार हमीचे वचनही यशस्वीरित्या पूर्ण करत महाविद्यालयाने शिक्षणासोबत करिअर या संकल्पनेला प्रत्यक्षात उतरवले आहे. या दुहेरी यशामुळे परिसरात आनंद आणि अभिमानाचे वातावरण पसरले आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या यंदाच्या निकालात गोदावरी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी गुणवत्ता सिद्ध करत अव्वल स्थान पटकावले. शिवकन्या पावडे हिने ९.२६ सरासरी गुणांसह प्रथम क्रमांक मिळवून कॉलेजचा मान उंचावला. निलेश अडकिने ९.२४ द्वितीय, तर प्रतीक्षा वाठोरे ९.२३ हिने तृतीय क्रमांक मिळवत आपली प्रतिभा सिद्ध केली. या तिन्ही विद्यार्थ्यांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे. महाविद्यालयाने विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी घेतलेली दूरदृष्टीही तितकीच उल्लेखनीय आहे. बी.कॉम. बँकिंगमध्ये प्रवेश घेताना दिलेली नोकरीची हमी प्रत्यक्षात उतरवण्यासाठी विद्यार्थ्यांना निकाल जाहीर होण्यापूर्वीच इंटर्नशिपच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या. त्यानंतर आयोजित मुलाखतींमध्ये यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांना नामांकित वित्तीय संस्थांकडून ऑफर लेटरही प्रदान करण्यात आले. त्यामुळे शिक्षण पूर्ण होताच विद्यार्थ्यांच्या करिअरला ठोस दिशा मिळाली आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण, उद्योगाभिमुख प्रशिक्षण, प्रत्यक्ष अनुभव देणाऱ्या इंटर्नशिप आणि खात्रीशीर रोजगार या चौघांचा संगम साधत गोदावरी कॉलेज ऑफ बँकिंगने विद्यार्थ्यांचा विश्वास जिंकला आहे. सातत्यपूर्ण उत्कृष्ट निकाल आणि विद्यार्थीकेंद्री उपक्रमांमुळे महाविद्यालयाची विश्वासार्हता अधिक बळकट होत आहे. संस्थेच्या अध्यक्षा राजश्री पाटील यांनी या यशाबद्दल समाधान व्यक्त करत, विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणासोबत उज्ज्वल करिअर घडविण्यासाठी आम्ही कायम कटिबद्ध आहोत, असे सांगितले. दरम्यान, संस्थापक व आमदार हेमंत पाटील यांनी या भव्य यशाबद्दल अध्यक्षा राजश्री पाटील, संचालक अजय झरकर तसेच सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी संस्था सातत्याने प्रयत्नशील राहील, असा विश्वास व्यक्त करत त्यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.गोदावरी कॉलेज ऑफ बँकिंग शिक्षणासोबत करिअरची खात्री देणारे नाव म्हणून शैक्षणिक क्षेत्रात खात्रीने प्रवेश घेण्याचे महाविद्यालय म्हणून पालक व विद्यार्थ्यांच्या प्रथम क्रमांकाच्या पसंतीस उतरत असून प्रवेशासाठी भरभरून प्रतिसाद मिळत आहे .



## मनपाचे वरिष्ठ लिपिक संतोष जोशी सेवानिवृत्त

**नांदेड** -मनपाचे वरिष्ठ लिपिक संतोष जोशी हे आपल्या प्रदीर्घ सेवेतून आज निवृत्त झाले. जोशी यांनी लिपीक म्हणून २०१० ते २०२६ पर्यंतच्या निवडणूकीमध्ये काम केलेले आहे तसेच लोकसभा व विधानसभा निवडणूकीत देखील काम केलेले आहे. तसेच दरम्यानच्या कालावधीत पार पडलेल्या पोटनिवडणूकीतही काम केलेले आहे.

त्यांनी मनपाच्या विविध विभागात काम केलेले असून आपले कर्तव्य योग्यरित्या पार पाडलेले आहे तसेच निवडणूक कालावधीत त्या-त्या वेळेसच्या अधिकार्यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजन करुन व अथक परिश्रम घेऊन सर्व निवडणूकीमधील कामे चोखपणे व लिलया पार पाडलेले आहे.

# एस आय आर अमलबजावणीसाठी काँग्रेस मैदानात चित्रफितीच्या प्रक्षेपणातून कार्यकर्त्यांना प्रशिक्षण

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २ जुलै -**

विशेष मतदार यादीत पुननिरीक्षण (SIR) प्रत्येक गावात शासकीय स्तरावरुण प्रभावीपणे अमलबजावणीसाठी काँग्रेस पक्ष मैदानात उतरला असून भोकर विधानसभा मतदारसंघातील मुदखेड ,अर्धापूर ,भोकर तिन्ही तालुक्यात समन्वयक नियुक्त केले असून चित्रफितीच्या प्रक्षेपणातून बीएलओ यांना प्रशिक्षण देण्यात आले असून घर चलो अभियान राबविण्याचा निर्धार कार्यकर्त्यांनी केला आहे .

सन २००२ ची मतदार यादी पुनर्गठीत करण्यासाठी निवडणूक आयोगाच्या वतीने राज्यात दि. ३० जून पासून विशेष मतदार यादी सुधारणा (डखठ) अभियान प्रभावीपणे शासकीय स्तरावर राबविले जात आहे . यासाठी काँग्रेस पक्षाच्या वतीने गाव पातळीवर समन्वयक नेमून



नियोजन करण्यात आले आहे. दि.२९ जुन रोजी बारड येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालयात भोकर विधानसभा मतदारसंघातील मुदखेड, अर्धापूर ,भोकर काँग्रेस कार्यकर्त्यांसाठी विशेष मार्गदर्शन प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन लोकसभा खासदार रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी काँग्रेस उत्तर जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, काँग्रेस महानगर अध्यक्ष अब्दुल गफार अब्दुल सत्तार, भोकर विधानसभा बीएलओ १ प्रमुख पप्पू पाटील कोंडेकर , युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बालाजी गाढे, एसआयआर प्रशिक्षण निरीक्षक विवेक जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

निवडणूक आयोगाच्या वतीने नव्याने तयार करण्यात येणाऱ्या मतदार यादीतून कोणत्याही नागरिकांचे नाव वगळले जाऊ नये तसेच प्रत्येक मतदारास मतदानाचा हक्क मिळावा यासाठी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाने दक्षता घेण्यासाठी घर चलो अभियान राबविण्याचा निर्धार केला आहे .

बीएलओ प्रमुख पप्पू पाटील कोंडेकर यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यातील प्रत्येक गावात घर चलो अभियान राबविले जाणार आहे. काँग्रेसच्या या अभियानामुळे मतदारांमध्ये जनजागृती होणे आवश्यक आहे.

या अभियानासाठी समन्वयक प्रमुख पप्पू पाटील कोंडेकर, भोकर काँग्रेस तालुकाध्यक्ष गोविंद पाटील गोड , मुदखेड काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख, अर्धापूर काँग्रेस तालुकाध्यक्ष सुनील वानखेडे, युवक काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रशांत पाटील, युवक काँग्रेस शहराध्यक्ष मुजीब पठाण, सेवादल तालुकाध्यक्ष गंगाधर मगरे, भोकर काँग्रेसचे अध्यक्ष तोफिक इनामदार, बाळासाहेब आंबेगावकर, डॉ इंगळे, गिरीश कोत्तावार , विश्वनाथ पवार निवघेकर, महेश देशमुख बारडकर, श्रीनिवास महादवाड, गंगाधर डांगे , नगरसेवक अविनाश चौदंते, संजय बोकेफोड, बंडू पाटील शंकतीर्थकर, शंभुनाथ पवार, गणेश लखे , अनिल कल्याने, तेजस जाधव , गजानन संबोड, यांच्यासह बीएलओ , काँग्रेस कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते .

# जिल्हाधिकाऱ्यांनी स्वत: गणनापत्र भरून केली मोहिमेची पाहणी



**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २ जुलै -**

भारतातील लोकशाही अधिक सक्षम, पारदर्शक आणि विश्वासार्ह करण्याच्या उद्देशाने भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार नांदेड जिल्ह्यात विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण मोहीम सुरू झाली आहे. या मोहिमेअंतर्गत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्या माध्यमातून मतदाराचे गणनापत्र भरुन घेण्याची प्रक्रीया ३० जून पासून सुरू आहे. या मोहिमच्या अंमलबजावणीची पाहणी करण्यासाठी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी काल नांदेड येथील कौठा व विष्णुपूरी येथे भेट दिली. यावेळी त्यांनी स्वतः मतदारांचे गणनापत्र (एन्युमरेशन फॉर्म) भरुन पवर ऑनलाईन सादर केले.

यावेळी त्यांनी सर्व नागरिकांनी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांना अचूक माहिती देऊन या महत्त्वपूर्ण प्रक्रियेत सक्रिय सहकार्य करण्याचे आवाहन केले.

३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत नांदेड जिल्ह्यातील २७ लाख ७७ हजार ७३ एवढया मतदारांची घराघरांत जाऊन प्रत्यक्ष पडताळणी करण्यात येणार आहे. यासाठी ३ हजार ८८ मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ), ३१० बीएलओ पर्यवेक्षक, ९ मतदार नोंदणी अधिकारी आणि ९० सहायक मतदार नोंदणी अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत.

# अंडरब्रिजचे काम रखडल्याने नागरिक हैराण

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २ जुलै -**

शहरातील शिवाजीनगर रेल्वे अंडरब्रिजच्या दुरुस्तीचे काम २६ जूनपर्यंत पूर्ण होणार असल्याचे रेल्वे प्रशासनाने यापूर्वी जाहीर केले होते. मात्र जुलै महिना सुरू होऊनही काम पूर्ण झाले नसल्याने नागरिकांचा संयम सुटू लागला आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षक नेते संतोष दासरवार यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत संबंधित कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करून त्याला ब्लॅकलिस्ट करण्याची मागणी केली आहे.

संतोष दासरवार यांनी विविध प्रसारमाध्यमांशी दूरध्वनीद्वारे संवाद साधत अंडरब्रिजचे काम रखडल्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असल्याचे सांगितले. सध्या पावसाळ्याचे दिवस सुरू असून शिवाजीनगर अंडरब्रिज बंद असल्यामुळे सुमारे २२ गावांतील नागरिकांची वाहतूक प्रभावित झाली आहे. नागरिकांना पर्यायी मार्गाने मोठा फेरा मारून प्रवास करावा लागत असून वेळ आणि आर्थिक खर्चही वाढत आहे. याशिवाय शेतीच्या हंगामात खत, बियाणे, औषधे तसेच इतर शेतीविषयक साहित्याची वाहतूक करण्यास मोठ्या अडचणी निर्माण होत असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यामुळे शेतकरी आणि ग्रामीण भागातील नागरिकांना अनावश्यक मनस्ताप सहन करावा लागत आहे. दासरवार यांनी सांगितले की, स. वि. म. परिसर हा किनवट शहरातील मोठ्या नागरी वस्त्यांपैकी एक असून येथील नागरिकांना शिक्षण, नोकरी, व्यवसाय, बाजारपेठ, रुग्णालये तसेच शासकीय कार्यालयांच्या कामानिमित्त दररोज शहरात ये-जा करावी लागते. मात्र अंडरब्रिजचे काम महिनोनमहिने अपूर्ण असल्यामुळे प्रत्येक नागरिकाला अतिरिक्त अंतर पार करावे लागत असून त्याचा थेट परिणाम दैनंदिन जीवनावर होत आहे. यावेळी त्यांनी संबंधित कामाच्या दर्जावरही गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. नवीन बांधण्यात आलेला अंडरब्रिज अवघ्या दोन महिन्यांत खराब झाला. निकृष्ट दर्जाचे काम झाल्यामुळे त्याची दुरुस्ती करण्यासाठी तो बंद करण्यात आला. मात्र आता तब्बल सहा महिन्यांपासून हे काम रखडले आहे. ही बाब अत्यंत गंभीर असून यासाठी संबंधित कंत्राटदार आणि जबाबदार यंत्रणेलाच उत्तरदायी धरले पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले. नागरिकांना सातत्याने होत असलेला त्रास लक्षात घेता रेल्वे प्रशासनाने या प्रकरणाची चौकशी करून संबंधित कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करावी, त्याला ब्लॅकलिस्ट करावे आणि अंडरब्रिजचे उर्वरित काम तातडीने पूर्ण करून नागरिकांसाठी मार्ग खुला करावा, अशी ठाम मागणी शिक्षक नेते संतोष दासरवार यांनी केली आहे. दरम्यान, अंडरब्रिजचे काम लवकर पूर्ण होऊन वाहतूक सुरळीत व्हावी, अशी अपेक्षा शहरासह परिसरातील नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.



सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# "पद नव्हे... जबाबदारी! महाराष्ट्र भाजपला नवी दिशा देणाऱ्या रविंद्रदादा चव्हाण यांच्या नेतृत्वाचे यशस्वी वर्ष" : शंकर देशमुख

**बीड :** दि. १ जुलै २०२६ हा दिवस महाराष्ट्र भाजपासाठी विशेष आहे. कारण याच दिवशी महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष म्हणून आ. रविंद्र चव्हाण यांनी जबाबदारी स्वीकारून एक वर्ष पूर्ण होत आहे. हे केवळ एका पदाच्या कार्यकाळाचे वर्ष नाही, तर संघटन, शिस्त, कार्यकर्त्यांप्रती आत्मीयता आणि राष्ट्रहिताला सर्वोच्च प्राधान्य देणाऱ्या नेतृत्वाच्या प्रवासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे.

रविंद्रदादांचे व्यक्तिमत्त्व समजून घ्यायचे असेल, तर त्यांच्या एका वाक्यात त्यांचे संपूर्ण तत्त्वज्ञान सामावलेले दिसते – "पद हे प्रतिष्ठेचे नसते, ते जबाबदारीचे असते." हे वाक्य ते केवळ बोलत नाहीत, तर प्रत्येक कृतीतून जगतात. पक्षाने दिलेली जबाबदारी ही सन्मानाची नसून कर्तव्याची आहे, ही भावना त्यांच्या प्रत्येक निर्णयातून आणि प्रत्येक संवादातून दिसून येते.

रविंद्रदादा हे स्पष्टवक्ते आहेत. त्यांच्या स्वभावात कृत्रिमपणा नाही, दिखाऊपणा नाही. काम होणार असेल तर स्पष्ट "होईल" आणि शक्य नसेल तर तितक्याच स्पष्टपणे "होणार नाही" असे सांगण्याचे धैर्य त्यांच्यात आहे. अनेकांना हा स्वभाव कठोर वाटू शकतो; पण प्रत्यक्षात तो प्रामाणिकपणा आणि पारदर्शकतेचा आदर्श आहे. राजकारणात स्पष्ट बोलणारे नेते कमी असताना रविंद्रदादांनी ही ओळख कायम ठेवली आहे.

माझाही त्यांच्याशी अनेकदा कामाच्या निमित्ताने संपर्क आला. ते सार्वजनिक बांधकाम मंत्री असताना विविध विकासकामांसाठी अनेकदा त्यांची भेट झाली. प्रत्येक वेळी त्यांच्या निर्णयामागे वस्तुनिष्ठ विचार, नियमांची जाण आणि लोकहिताचा दृष्टिकोन दिसून आला. आज जिल्हाध्यक्ष म्हणून त्यांच्या नेतृत्वाखाली काम करताना त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची आणखी जवळून ओळख झाली. त्यांच्या नेतृत्वाबद्दल मनात आदर आहे, आणि त्याचबरोबर कामाबाबतची एक सकारात्मक शिस्तही आहे. ही भीती व्यक्तीची नाही; तर पक्षाच्या संस्कृतीची, शिस्तीची आणि जबाबदारीची आहे.

रविंद्रदादा नेहमी एक गोष्ट ठामपणे सांगतात – "भाजपनेच मला मोठं केलं. त्यामुळे या पक्षाच्या सन्मानासाठी वाटेल ते करण्याची ताकद आणि तयारी माझ्यात आहे." ही भावना त्यांच्या निष्ठेचे सर्वोच्च उदाहरण आहे. स्वतःपेक्षा पक्ष मोठा, पदापेक्षा विचार मोठा आणि वैयक्तिक स्वार्थापेक्षा राष्ट्रहित मोठे, हा भारतीय जनता पक्षाचा संस्कार त्यांनी आपल्या आचरणातून जपला आहे.



> आपले राष्ट्रभक्त, तत्त्वनिष्ठ आणि कार्यकर्तांकेंद्री नेतृत्व महाराष्ट्र भाजपला अधिक सक्षम, अधिक संघटित आणि अधिक प्रभावी बनवत राहो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.
> हार्दिक शुभेच्छा!
> – शंकर देशमुख
> जिल्हाध्यक्ष, भारतीय जनता पार्टी,

त्यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र भाजपमध्ये संघटन अधिक मजबूत करण्यावर विशेष भर दिला जात आहे. प्रत्येक जिल्हा, प्रत्येक मंडळ, प्रत्येक बूथ आणि प्रत्येक कार्यकर्ता यांच्याशी सातत्याने संवाद साधण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. कार्यकर्ता हा पक्षाचा कणा आहे, ही भावना त्यांच्या प्रत्येक कृतीतून जाणवते. कार्यकर्त्यांच्या अडचणी समजून घेणे, त्यांच्या कुटुंबाची विचारपूस करणे, पदाधिकाऱ्यांना वेळ देणे आणि संघटनेतील प्रत्येक घटकाला सन्मान देणे, हा त्यांचा स्वभाव आहे.

रविंद्रदादांमध्ये संघटन कौशल्याबरोबरच दूरदृष्टी आहे. बदलत्या राजकीय परिस्थितीचे अचूक आकलन, विकासाच्या मुद्द्यांवर असलेली पकड आणि पक्षाच्या विचारसरणीबद्दलची ठाम भूमिका यामुळे ते महाराष्ट्र भाजपचे प्रभावी नेतृत्व करत आहेत.

आज त्यांचा प्रदेशाध्यक्ष म्हणून एक वर्षाचा कार्यकाळ पूर्ण होत असताना, हा काळ कार्यकर्त्यांना विश्वास देणारा, संघटनेला बळ देणारा आणि पक्षाला नव्या उंचीवर नेणारा ठरला आहे. त्यांचे नेतृत्व, परिश्रम आणि कार्यकर्त्यांप्रती असलेली आत्मीयता पाहता, महाराष्ट्रात भारतीय जनता पक्षाला अधिक व्यापक जनाधार मिळेल, असा दृढ विश्वास वाटतो.

आदरणीय रविंद्रदादा, आपल्या प्रदेशाध्यक्षपदाच्या यशस्वी एक वर्षाच्या कार्यकाळाबद्दल मनःपूर्वक अभिनंदन!

# रोटरी क्लबच्या अध्यक्षपदी शकील शेख तर सचिवपदी राधेश्याम लोहिया





**अंबाजोगाई :** रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीच्या अध्यक्षपदी शकील शेख यांची तर सचिवपदी राधेश्याम लोहिया यांची निवड करण्यात आली आहे.

रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीची सन -२०२६-२०२७ या नवीन वर्षाची नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. अध्यक्ष - शेख शकील, उपाध्यक्ष - कल्याण काळे, सचिव - राधेश्याम लोहिया, सहसचिव - रुपेश रामावत, सल्लागार - प्रा. रोहिणी पाठक,क्लब प्रशिक्षक - प्रा.संतोष मोहिते,क्लब ॲडमिन - प्रदीप झरकर, टीआरएफ संचालक - धनराज सोळंकी, समाजसेवा संचालक - डॉ. निशिकांत पाचेगावकर, आंतरराष्ट्रीय सेवा संचालक - डॉ.नवनाथ घुगे,ग्लोबल ग्रॅण्ट संचालक मोईन शेख तर कार्यकारिणीत विविध महत्वपूर्ण पदांवर राजेंद्र घोडके, गोपाळ पारीख,बाळासाहेब कदम,अनंत लोमटे, स्वरूपा कुलकर्णी, स्वप्नील परदेशी,अजित देशमुख,भीमसेन लोमटे,डॉ. अनिल केंद्रे,प्रा. रमेश सोनवळकर,प्रवीण चोकडा, आनंद जाजू,डॉ.बाळासाहेब लोमटे,अक्षय मुंदडा, मंजुषा जोशी,बालाजी घाडगे, डॉ.प्रिया तिडके, प्रा. वसुधा गडसिंग यांची निवड करण्यात आली आहे. या वर्षभरात रोटरी क्लब समाजातील उपेक्षितांसाठी विविध उपक्रम राबविणार आहे. असे नवनिर्वातीत अध्यक्ष शकील शेख,सचिव राधेश्याम लोहिया यांनी सांगितले.

### स्वच्छंद गटाचा प्रवेशोत्सव उत्साहात

# प्रधान सचिव निखिलजी मुंडले यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा विद्यारंभ

**बीड, दि. १ जुलै :** चक्रधर नगर, बीड येथील नानाजी देशमुख विद्यामंदिर अंतर्गत गोकुळ शिशू वाटिका येथील स्वच्छंद गटातील (अडीच ते साडेचार वर्षे वयोगट) चिमुकल्यांचा प्रवेशोत्सव बुधवार, दि. १ जुलै रोजी आनंदी आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या प्रवेशोत्सवाला दुग्धशर्करा योग लाभत दीनदयाल शोध संस्थानचे प्रधान सचिव मा. निखिलजी मुंडले यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

कार्यक्रमास नानाजी देशमुख विद्यामंदिरच्या सचिव मा. सीमाताई जोशी, मा. गंगाधरजी देशमुख, मा. सुनंदाताई कुलकर्णी, शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. अर्चनाताई मोराळे, आरतीताई जोशी तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात नवागत विद्यार्थ्यांचे औक्षण करून, त्यांना आशीर्वाद व खाऊ देत उत्साहपूर्ण स्वागताने झाली. त्यानंतर विद्यार्थ्यांना वर्गात नेण्यात आले. सरस्वती पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे मा. निखिलजी मुंडले यांनी विद्यार्थ्यांकडून तांदळामध्ये 'श्री' गिरवून घेत विद्यारंभाची मंगल सुरुवात केली. त्यांनी चिमुकल्यांच्या उज्ज्वल शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देतानाच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असलेल्या शिक्षकांचेही कौतुक केले. प्रवेशोत्सवानिमित्त शाळेची आकर्षक सजावट करण्यात आली होती. विशेष आकर्षण म्हणून उभारण्यात आलेल्या सेल्फी पॉइंटवर पालकांनी आपल्या चिमुकल्यांसह आनंदाचे क्षण छायाचित्रांमध्ये टिपले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभ

# शिक्षण मंत्री दादा भुसे राजीनामा द्या - DYFI युवक संघटनेची निदर्शने



परळी / प्रतिनिधी

नुकत्याच झालेल्या टीईटी (शिक्षक पात्रता परीक्षा) परीक्षेचा पेपर फुटल्याचे प्रकरण उघडकीस आल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली आहे. या पार्श्वभूमीवर, भारताचा लोकशाहीवादी युवा महासंघ (DYFI) परळी वै. तालुका कमिटीच्या वतीने आज तीव्र निदर्शने करण्यात आली. प्रशासनाचा भोंगळ कारभार आणि भ्रष्टाचार यांविरोधात संपूर्ण विद्यार्थी वर्गात तीव्र असंतोष असून, या गैरप्रकाराची नैतिक जबाबदारी स्वीकारून शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी संघटनेने केली आहे. या संदर्भात DYFI युवक संघटनेच्या वतीने सिरसाळा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांच्यामार्फत महाराष्ट्राचे माननीय मुख्यमंत्री यांना एक जाहीर निवेदन सादर करण्यात आले.

या निवेदनात म्हटले आहे की, टीईटी परीक्षेचा पेपर फुटल्यामुळे महाराष्ट्रातील लाखो प्रामाणिक, कष्टकरी आणि वर्षानुवर्षे अभ्यास करणाऱ्या तरुण-तरुणींच्या भविष्यावर गदा आली आहे. पेपर फोडून विद्यार्थ्यांच्या व तरुणांच्या भविष्याशी खेळणाऱ्या गुन्हेगारांविरोधात कठोर कारवाई करून पेपर फुटीला कायमचा आळा घालणे अत्यंत आवश्यक आहे.यावेळी संघटनेचे जिल्हा सचिव विशाल देशमुख, तालुका अध्यक्ष विजय घुगे,प्रवीण देशमुख, मुंजा नवगरे, मनोज देशमुख, दामोदर घुगे, सिद्राम सोळंके, इस्माईल शेख, मदन वाघमारे, मदन राठोड, प्रकाश कावळे, आबा जाधव यांच्या सह युवक विद्यार्थी सहभागी झाले होते .

# परळीचे सुपुत्र किरण गित्ते IAS यांची नवी दिल्लीत महत्त्वाची भूमिका

### त्रिपुराच्या महामार्ग प्रकल्पांसाठी मंत्री नितीन गडकरींसोबत उच्चस्तरीय बैठक

**परळी वैजनाथ:** परळीचे सुपुत्र आणि त्रिपुरा सरकारचे विद्यमान सचिव मा. श्री. किरण गित्ते साहेब (IAS) यांच्या उपस्थितीत नवी दिल्ली येथे त्रिपुरा राज्याच्या दळणवळण क्षेत्राला मोठी गती देणारी एक अत्यंत महत्त्वाची बैठक पार पडली. नवी दिल्लीतील परिवहन भवनात केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री मा. श्री. नितीनजी गडकरी साहेब आणि त्रिपुराचे मुख्यमंत्री डॉ. माणिक सहा यांच्यात ही फलदायी चर्चा झाली.



प्रकल्पांना गती देण्यात गित्ते साहेब यांचे महत्त्वपूर्ण योगदान

त्रिपुरा राज्याचा कायापालट करण्यासाठी आणि तिथली संपर्क व्यवस्था (Connectivity) अधिक मजबूत करण्यासाठी सध्या अनेक राष्ट्रीय महामार्ग प्रकल्प सुरू आहेत. या प्रकल्पांना गती देणे आणि नवीन रस्ते पायाभूत सुविधांचे उपक्रम वेगाने पुढे नेणे यावर या बैठकीत मुख्य भर होता. त्रिपुरा सरकारचे सचिव म्हणून परळीचे भुमिपुत्र मा .किरण गित्ते साहेब यांनी या प्रकल्पांचे सादरीकरण आणि तांत्रिक बाजू अत्यंत प्रभावीपणे मांडली, ज्यामुळे या बैठकीत अनेक सकारात्मक निर्णय घेण्यात आले.

परळीकरांकडून कौतुकाचा वर्षाव

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि त्रिपुराचे मुख्यमंत्री माणिक सहा यांच्यासोबत थेट उच्चस्तरीय धोरणात्मक निर्णय प्रक्रियेत परळीच्या सुपुत्राचा असलेला सक्रिय सहभाग पाहून परळीकरांमधून सार्थ अभिमान आणि कौतुक व्यक्त केले जात आहे. IAS अधिकारी म्हणून किरण गित्ते साहेब यांनी देशाच्या विविध भागात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला असून, आता ईशान्य भारतातील त्रिपुरा राज्याच्या रस्ते विकासातही ते महत्त्वाची धुरा सांभाळत आहेत.

या महत्त्वपूर्ण बैठकीत केंद्र आणि त्रिपुरा शासनाचे इतर वरिष्ठ अधिकारीही उपस्थित होते.

# गेवराई पोलिसांनी गहाळ झालेले 20 महागडे मोबाईल मालकांना केले परत!

### शेगाव-गेवराई प्रवासात फोन हरवलेल्या वृद्ध अर्जदाराने पेढे वाटून मानले आभार



**गेवराई :** बीड जिल्हा पोलीस दलाचे आधुनिकीकरण आणि तांत्रिक सक्षमीकरणाला मोठे यश आले आहे. गेवराई पोलीस ठाण्यांतर्गत मागील दोन महिन्यांपासून गहाळ झालेल्या मोबाईलच्या प्राप्त अर्जांपैकी एकूण २० मोबाईलचा यशस्वी शोध घेऊन ते आज मूळ अर्जदारांना परत करण्यात आले आहेत. पोलिसांच्या या तत्परतेमुळे नागरिकांनी अत्यंत समाधान व्यक्त केले आहे.

बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनाथ धवळ यांच्या संकल्पनेतून जिल्हा पोलीस दलाचे आधुनिकीकरण करण्यात आले आहे. या आधुनिक प्रणालीचा एक भाग म्हणून, डिजिटल युगात प्रत्येकाच्या दैनंदिन गरजेचा बनलेला मोबाईल शोधण्यासाठी प्रत्येक पोलीस ठाणे स्तरावर 'सायबर डेस्क' स्थापन करण्यात आले आहेत. गहाळ मोबाईलची तक्रार ऑनलाईन झाल्यानंतर केंद्र सरकारच्या 'सी.ई.आय. आर.' (CEIR) पोर्टलद्वारे या मोबाईलचा शोध घेतला जातो. या तंत्रज्ञानाचा वापर करून गेवराई पोलिसांनी ही धडक कारवाई केली असून, वर्ष २०२६ मध्ये आतापर्यंत आयफोनसह एकूण ४० महागडे मोबाईल शोधून अर्जदारांना परत करण्यात आले आहेत.

या मोहीमेदरम्यान एक भावूक प्रसंगही पाहायला मिळाला. धोंडराई (ता. गेवराई) येथील ६७ वर्षीय वृद्ध अर्जदार प्रकाश सर्जेराव कुटे यांचा मोबाईल शेगाव ते गेवराई प्रवासादरम्यान गहाळ झाला होता. पोलिसांनी त्यांचा हा फोन शोधून त्यांच्या स्वाधीन केला. आपला हरवलेला फोन परत मिळाल्याच्या आनंदात त्यांनी चक्क पोलिसांना पेढे वाटून कृतज्ञता व्यक्त केली.

हा संपूर्ण उपक्रम पोलीस अधीक्षक मा. नवनाथ धवळ, अपर पोलीस अधीक्षक मा. समीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली उप विभागीय पोलीस अधिकारी श्री. अनिल कटके आणि गेवराईचे पोलीस निरीक्षक श्री. किशोर पवार यांच्या हस्ते पार पडला. मोबाईल गहाळ झाल्यानंतर त्याचे अर्ज स्वीकारणे आणि तांत्रिक तपास करून ते शोधून काढण्याचे अत्यंत महत्त्वपूर्ण काम पोलीस कॉन्स्टेबल/२१०४ ऋषिकेश पोटे यांनी चोखपणे पार पाडले.

# धारूरकरांना पोकळ आश्वासने नको, थेट काम हवे

### तहसीलदार श्रीकांत निळेंची खरी परीक्षा आता सुरू!



**किल्ले धारूर, ( प्रतिनिधी ) :** किल्ले धारूर नगर परिषदेचे मुख्य अधिकारी पद हे रिक्त असल्याने नगरपरिषदेचे प्रशासकीय कामकाज सुरळीत चालावे म्हणून किल्ले धारूर नगरपरिषदेचा अतिरिक्त कारभार तहसीलदार श्रीकांत निळे यांच्याकडे पुढील आदेशापर्यंत सोपवण्यात आला आहे. यामुळे नगर परिषदेचे काही प्रमाणात विस्कटलेली कामे सुरळीत होणार आहेत.

दि. १७ जून रोजी येथील नगर परिषदेचे मुख्यअधिकारी आशुतोष चिंचाळकर यांची बदली वसमत नगरपरिषद येथे झाल्याने किल्ले धारूर नगर परिषदेचे मुख्यअधिकारी पद हे रिक्त होते. त्यामुळे काही प्रमाणात येथील प्रशासकीय कामकाज मंदावले होते, तसेच प्रशासकीय काम करण्यास अडचण निर्माण होत होती. प्रशासकीय काम सुरळीत व्हावे म्हणून जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दि. ३० जून रोजी तहसीलदार श्रीकांत निळे यांना आदेश काढून किल्ले धारूर नगरपरिषदेचा मुख्याधिकारी पदाचा अतिरिक्त कारभार पुढील आदेश येईपर्यंत स्वीकारण्याचे सांगितले आहे.

आता तहसीलदार श्रीकांत निळे यांच्याकडे तहसील कार्यालयासोबतच नगरपरिषद कार्यालयाचाही कारभार आल्याने, नगरपरिषदेमधील रखडलेली व प्रलंबित कामे ते वेळेत पूर्ण करतील आणि शहरात चांगल्या सोयी-सुविधा उपलब्ध करून देतील, अशी रास्त अपेक्षा धारूरच्या जनतेकडून व्यक्त केली जात आहे. तहसीलदार निळे या सर्व अपेक्षा पूर्ण करतील, असा विश्वास नागरिकांमध्ये निर्माण झाला असून यामुळे येथील प्रशासकीय कामांना गती मिळून नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

# तुलसी महाविद्यालयात वसंतराव नाईक यांना अभिवादन

**बीड (दि. १):** देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालय, बीड येथे बुधवारी (दि. १) महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा 'हरित क्रांतीचे प्रणेते' स्व. वसंतराव नाईक यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला इंजि.दीपंकर रोडे, प्रा.अर्जुन राठोड, प्राचार्य प्रा. डी. जी. निकाळजे यांच्या हस्ते वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनीही प्रतिमेला पुष्प अर्पण करून त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन केले. या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बाबुराव सलगर यांना राज्यस्तरीय 'वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार'

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :** परळी तालुक्यातील मलनाथपूर येथील प्रगतिशील शेतकरी बाबुराव माणिकराव सलगर यांना सन 2024 चा राज्यस्तरीय 'वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्कार' आज, दिनांक 1 जुलै 2026 रोजी मुंबई येथे आयोजित राज्यस्तरीय सोहळ्यात सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या हस्ते, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि कृषिमंत्री दत्तात्रय (मामा) भरणे यांच्या प्रमुख उपस्थितीत सलगर यांचा सहकुटुंब गौरव करण्यात आला.



हा प्रतिष्ठेचा पुरस्कार मिळाल्याने केवळ बाबुराव सलगर यांच्या कार्याचा सन्मान झाला नसून, बीड जिल्हा आणि परळी तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार, नाविन्यपूर्ण प्रयोग, परिश्रम, नियोजन आणि सातत्यपूर्ण प्रगती यांच्या बळावर त्यांनी शेती क्षेत्रात एक वेगळा आदर्श निर्माण केला आहे.

बाबुराव सलगर यांच्या यशामुळे परिसरातील तसेच राज्यभरातील शेतकऱ्यांना नवी प्रेरणा मिळणार आहे. बदलत्या काळानुसार आधुनिक शेतीपद्धती स्वीकारून उत्पादनवाढ, शाश्वत शेती आणि आर्थिक समृद्धीकडे वाटचाल करण्यासाठी हा पुरस्कार अनेक शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल.

बीड जिल्ह्यासाठी आणि परळी तालुक्यासाठी हा अभिमानाचा क्षण असून, बाबुराव सलगर यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या कार्यातून राज्यातील अधिकाधिक शेतकरी आधुनिक, प्रयोगशील आणि प्रगत शेतीचा मार्ग स्वीकारून शेतीला नवी दिशा देतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# अंबाजोगाई शहर पोलिसांनी हरवलेले 15 मोबाईल शोधून मूळ मालकांच्या ताब्यात

अंबाजोगाई (त भा वृत्तसेवा)

नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास अधिक दृढ करणारी उल्लेखनीय कामगिरी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्याने केली आहे. हरवलेले एकूण १५ मोबाईल फोन तांत्रिक तपास, सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि समन्वयाच्या माध्यमातून शोधून काढत संबंधित मूळ मालकांना परत सुपूर्द करण्यात आले.



अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात विविध नागरिकांनी त्यांचे मोबाईल हरवल्याच्या तक्रारी दाखल केल्या होत्या. या तक्रारींची गांभीर्याने दखल घेत पोलिसांनी तांत्रिक तपास सुरू केला. मोबाईलचे लोकेशन, आयएमईआय क्रमांक आणि इतर तांत्रिक बाबींच्या आधारे सातत्याने शोधमोहीम राबविण्यात आली. अखेर १५ मोबाईल फोन शोधण्यात पोलिसांना यश आले.

आज संबंधित मोबाईल धारकांना अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात बोलावून आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करण्यात आली. त्यानंतर सर्व मोबाईल त्यांच्या मूळ मालकांच्या ताब्यात सुपूर्द करण्यात आले. अनेक दिवसांपासून हरवलेले मोबाईल पुन्हा मिळाल्याने नागरिकांच्या चेहऱ्यावर समाधानाचे भाव दिसून आले.

ही संपूर्ण कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कावत, मा. अपर पोलीस अधीक्षक सौ. चेतना तिडके तसेच मा. सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री. ऋषिकेश शिंदे पोलीस निरीक्षक शरद जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

या मोहिमेत अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार श्री. रविकुमार केंद्रे यांनी तांत्रिक तपास, सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि विविध स्तरांवरील समन्वय साधत महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या प्रयत्नांमुळे हरवलेले मोबाईल शोधण्यात यश मिळाले.

यावेळी पोलीस निरीक्षक श्री. शरद जोगदंड यांनी नागरिकांना महत्त्वाचे आवाहन केले. मोबाईल हरवल्यास वेळ न दवडता तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवावी. तसेच मोबाईलमध्ये स्क्रीन लॉक, मजबूत पासवर्ड, फिंगरप्रिंट किंवा फेस लॉकसारख्या सुरक्षा सुविधा वापरून वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवावी, असे त्यांनी सांगितले. नागरिकांच्या हरवलेल्या मालमत्तेचा शोध घेऊन ती मूळ मालकांना परत मिळवून देण्यासाठी अंबाजोगाई शहर पोलीस सदैव कटिबद्ध असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

हरवलेले मोबाईल परत मिळाल्याने संबंधित नागरिकांनी अंबाजोगाई शहर पोलिसांचे तसेच या मोहिमेत सहभागी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले. पोलिसांच्या या कार्यामुळे नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, अंबाजोगाई शहर पोलीस नागरिकाभिमुख कामकाजाचे उत्तम उदाहरण ठरत असल्याची भावना व्यक्त होत आहे.